मासिक वार्तापत्र • अंक ८ • जानेवारी २०१८ • सहयोग मूल्य - रु. ५ • १६ पाने



# कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक


पॅलेस्तिनी लोकांचा स्वातंत्र्यलढा चिरायू होवो! ४

अर्थव्यवस्थेची बिघडत चाललेली अवस्था ११

गोरक्षणाचे गौडबंगाल - फासीवादाचा खरा चेहरा १२


## नवीन वर्षाचा पहिला दिवसच जातीय तणावात!

## जात-धर्माच्या नावाने न झगडता खरे मुद्दे उचलायला हवेत !

नवीन वर्ष २०१८चा पहिला दिवसच यावेळी जातीय तणावात गेला. महाराष्ट्रातील भीमा कोरेगाव येथे एकत्र जमलेल्या दलितांवर दगडफेकीची घटना आणि त्यानंतर दोन दिवस महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागांमधील निदर्शनांनी सामान्य जनतेमधील जातीय भिंतींची उंची अजून वाढवली. या जातीय तणावाने एकाप्रकारे गेल्या वर्षाच्या घटनांनाच पुढे चालू ठेवले. गेल्या पूर्ण वर्षात मराठा मूक मोर्चा आणि बहुजन मोर्चे निघत राहिले. प्रत्येक मोर्चा जातीच्या नावाने लोकांना एकजूट करत गेला आणि लोकांचे खरे मुद्दे गायब झाले. गेल्या काही वर्षांमध्ये शेतीचे संकट, नोटबंदी आणि सतत चालू असलेल्या मंदीने बेरोजगारीला अभूतपूर्व रित्या वाढवले आहे. पण सामान्य लोकांना या मुद्यांवर एकजूट होण्यापासून रोखण्यासाठी शासक वर्गाने धर्म आणि जातीच्या राजकारणाचा खुबीने वापर केला आहे आणि ते यात यशस्वीही झाले आहेत. भीमा कोरेगाव मध्ये झालेली हिंसा सुद्धा शासक वर्गाचे असेच एक षडयंत्र आहे.

**भीमा कोरेगाव येथे काय झाले ?**

भीमा कोरेगावची लढाई इंग्रज आणि पेशव्यामध्ये १ जानेवारी १८१८ ला झाली. खरेतर पेशवे अगोदरच नोव्हेंबर १८१७ मध्ये पुण्यात लढाई हारले होते पण पुन्हा एकत्र होऊन हल्ला करण्याच्या त्यांच्या प्रयत्नाला भीमा कोरेगाव येथे धक्का लागला. इंग्रजांच्या सैन्यात महारांची संख्या बरीच होती. त्यामुळे पेशव्यांना हरवण्याच्या निमित्ताने दलितांची मोठी लोकसंख्या भीमा कोरेगाव येथे दरवर्षी १ जानेवारी रोजी एकत्र येते. भीमा कोरेगावच्या युद्धाने दलितांना काय मिळाले आणि हे युद्ध साजरे करण्यासारखे आहे का ? या विषयावर १ जानेवारी २०१८ रोजीच्या हिंसेअगोदर आम्ही एक लेख लिहीला

**संपादक मंडळ**

होता जो स्वतंत्ररित्या देत आहोत. (पहा पान १६) थोडक्यात आमचे मत आहे की इंग्रजांनी नेहमीच ब्राह्मणवादाशी संगनमत केले आणि जातीव्यवस्थेला कायदेशीर अंगरखा घालून अजून मजबूत केले. इंग्रजांनी शेतसाऱ्याची पद्धत आणि अन्य मार्गांनी दलितांच्या स्थितीला अजूनच रसातळाला पोहोचवले. त्यामुळे भीमा कोरेगावच्या युद्धाला या कारणाने साजरे करणे की त्याने पेशवाई (ब्राह्मणवादी व्यवस्था) संपली हे फक्त अस्मितेचे राजकारण आहे. परंतु असे असतानाही देशातील कोणत्याही ऐतिहासिक घटनेचे स्मरण करण्याचा आणि त्या निमित्ताने एकत्र येण्याचा अधिकार जनतेच्या प्रत्येक हिश्श्याकडे आहे आणि या अधिकाराचे आम्ही समर्थन करतो.

यावेळी भीमा कोरेगाव येथे लोक एकत्र आले त्याच्या बऱ्याच अगोदर पासून आर.एस.एस.शी जोडलेल्या दोन संघटनांनी मराठा लोकांना दलितांविरुद्ध भडकावणे चालू केले होते. या दोन संघटना होत्या संभाजी भिंडेच्या नेतृत्वाखालील शिवप्रतिष्ठाण आणि मिलिंद एकबोटे यांच्या नेतृत्वाखालील समस्त हिंदू आघाडी. त्यांनी प्रचार चालू केला की दलित पेशव्यांवर विजयाचा उत्सव साजरा करतात आणि पेशव्यांच्या सैन्यात तर मोठ्या संख्येने मराठे होते, त्यामुळे एका प्रकारे दलित मराठ्यांवर विजयाचा उत्सव साजरा करतात. त्यांच्या या प्रचाराने आणि सोबतच इतर अफवांनी काही तरूण लोकांना उन्मादित केले आणि १ जानेवारी रोजी दगडफेक आणि जाळपोळ झाली. संभाजी भिडे सांगलीचा तोच व्यक्ती आहेत ज्याच्याबद्दल नरेंद्र मोदींनी म्हटले होते की संभाजी भिडे मोदींना येण्याचे निमंत्रण नाही तर आदेश देतो. दोन्ही व्यक्तींचा संघाशी असलेला संबंध स्पष्टच करतो की त्यांच्यावर काहीही कारवाई होणार नाही. उलट मीडीयाच्या माध्यमातून असे वातावरण बनवले जात आहे की या हिंसेला ३१

पान २ वर

## गुजरात निवडणुक आणि त्यानंतर
## फासीवादापासून सुटका करून घेण्याच्या सोप्या मार्गांचे भ्रम सोडा!
## पुर्ण ताकदीने खऱ्या लढ्यासाठी सज्ज व्हा!!

डिसेंबर २०१७ ला गुजरात व हिमाचल प्रदेशातील विधानसभेची निवडणुक झाली व त्यात भाजपाने मैदान मारले. काही महिन्यांपासून सगळे मोदी सरकार गुजरात निवडणुका जिंकायच्या कामी लागले होते. इलेक्ट्रॉनिक मीडियाची सगळी ताकद सुद्धा याच कामाला जुंपली होतीआणि जोडीला संघ परिवाराच्या सर्व संघटना त्यांच्या विषारी प्रचारांत गुंतल्या होत्याच. पंतप्रधानांनी सुद्धा जनतेतील वाढता असंतोष पाहून, मंदिर-मशिद व पाकिस्तान चा राग आळवला होता आणि तेही रडी- चीडीचं नाटक करण्याच्या पातळी वर पोहचले होते. महिन्याभराच्या प्रचारानंतर व हर तऱ्हेची तिकडम करून भाजपा निवडणुकीत जिंकली, यात फार काही अनपेक्षित नव्हतंच. तिकडे हिमाचल मधील वीरभद्र सिंहाचे भ्रष्ट व निरर्थक सरकार पुन्हा येण्याची आशा तर खुद्द काँग्रेसला सुद्धा नव्हती.

पण पुन्हा हेही समजून घेणं गरजेचं आहे कि भाजपा संघ परिवाराची फक्त निवडणुकीची शाखा आहे. कुठल्या एखाद्या निवडणुकीत हरल्याने या सर्व संघटना आपले काम बंद करत नाहीत. त्यांचे विखारी राजकारण सतत चालू असतेच. सत्तेच्या प्रतिष्ठानापासून समाजातील बहुतेक सर्व संस्थामध्ये — सैन्य, पोलीस, न्यायपालिका, नौकरशाही पासून ते शिक्षण व सांस्कृतिक संस्थांमध्येही — त्यांची घुसखोरी योजनापूर्वक चालूच असते. २००४-२००९ च्या निवडणूकीतील पराभवानंतर पुन्हा ताकदीने भाजपाचे सत्तेत येण्यामागे हे सुद्धा महत्वाचे कारण आहे.

मोदी सरकारची मागील साडे तीन वर्षे जनतेला खोटे वायदे व नाटकबाजी करण्यात आणि कार्पोरेट घराण्यांच्या वतीने सरकारी लूट करण्यातच गेली आहेत. या नग्न लुटी पासून लक्ष विचलित करण्यासाठी व लोकांना विभाजित करण्यासाठी समाजात सातत्याने द्वेष पसरवला जात आहे आणि त्याचाच भाग म्हणून मुसलमान, दलित, स्त्रियांच्या विरुद्ध पाशवी हिंसक अपराधांना प्रोत्साहन दिले जात आहे. काही ठिकाणी तर हिंसाचाराच्या, अपराधिक घटना अगदी संघटीत रित्या घडवून आणल्या जाताहेत. कष्टकरी व गरिबांवर महागाई, बेरोजगारी, रोजंदारीत कपात व पावलोपावली सरकारी लुटीचा मार पडतोच आहे. या परिस्थिती विरोधात सामान्य नागरीकांमध्ये प्रचंड असंतोष आहे आणि ठिकठिकाणी हा असंतोष विभिन्न रुपात बाहेर पडताना दिसतो आहे. पण हेही खरंच आहे कि या खदखदणाऱ्या असंतोषाला संघटीत, लढाऊ व व्यापक आंदोलनात्मक रूप देणे कुणालाही शक्य झालेले नाही. प्रत्येक पाशवी हत्याकांडांनंतर शहरांमधून होणाऱ्या शांतीपूर्ण व शालीन विरोध प्रदर्शनांमधून या फासिस्तांची हिम्मत जराही डळमळीत झाली नाही. राजस्थान मध्ये एका गरीब कामगार अफराजुलच्या हत्येनंतर उदयपूरच्या न्यायालयावर, त्याची हत्या करणाऱ्या शंभूच्या समर्थनात, आक्रमण करणारी व धिंगाणा करणारी गर्दी ही याच शहरांमधून तयार झाली आहे. त्यांचा मुकाबला कोण करणार? सरकारी यंत्रणा व न्यायपालिकेमध्ये फासिस्तांची हि घुसखोरी अगदी खालपासून वरपर्यंत आहे. न्यायालयाच्या आवारात बलात्कारी आसारामच्या पायाचा मुका घेणारे उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आता अपवाद राहिले नाहीत. गेल्या तीन दशकापासून सुरु असलेली नवउदारवादी धोरणे आणि भांडवलशाहीच्या संरचनागत संकटांनी संपूर्ण समाजात फासीवादास अनुकूल असे वातावरण तयार केले आहे. भांडवलशाहीच्या हल्ल्यामुळे लोकसंख्येच्या भिन्न भिन्न घटकांमध्ये वाढता असंतोष आणि असुरक्षितपणाच्या भावनेचा फायदा हिंदुत्ववादी फासिस्तांनी अतिशय कुशलतेने उचलला आणि भांडवलदार घराण्यांच्या पूर्ण समर्थनातून भाजप सत्तेचे शिखर गाठायला यशस्वी झाली.

पण आपल्याला गेल्या २७ वर्षांचा

पान ७ वर

# जात-धर्माच्या नावाने न झगडता खरे मुद्दे उचलायला हवेत!

पान १ वरून

डिसेंबर रोजी पुण्यात झालेल्या एल्गार परिषदेतील वक्तेच जबाबदार आहेत. खऱ्या गुन्हेगारांना अटक न करता निर्दोष लोकांना फसवणे, त्यांच्याविरोधात कुत्सार्थी प्रचार करणे याबाबतीत संघाचा जुना हातखंडा आहे. आता तर त्यांच्याकडे पूर्ण राज्यसत्ता आहे, मीडीया आहे आणि लाखो ट्रोल्सची फौज पण आहे. एका बाजूला ही भक्तमंडळी फोटोशॉप केलेले फोटो दाखवून या घटनेमागे कधी पाकिस्तानचा हात आहे सांगतात तर कधी नक्षलवाद्यांचा हात आहे सांगतात आणि दुसरीकडे फडणवीस सरकार खरे अपराधी भिडे आणि एकबोटे यांना अटक करत नाहीये. या घटनेनंतर महाराष्ट्रभर एक दिवस बंदचे आयोजन करण्यात आले आणि स्वत:स्फूर्त पद्धतीने दलित तरूणांची मोठी संख्या रस्त्यावर उतरली आणि होत असलेल्या अत्याचारांविरोधातील राग जाहीर केला.

### महाराष्ट्रातील दलित-मराठा तणावाचे खरे कारण काय आहे?

यावेळी तणाव वाढवण्यात फासिस्त आर.एस.एस.चा हात स्पष्ट दिसत होता. एका बाजूला केंद्र आणि राज्यामध्ये भाजपची सरकारं प्रत्येक मोर्चावर असफल होत आहेत आणि दुसरीकडे गल्लीगल्लीमध्ये अस्तित्वात असलेल्या त्यांच्या अफवांच्या मशिनरीच्या जोरावर संघाच्या लोकांनी जनतेमध्ये विविध अफवा आणि मिथके पसरवण्याचे काम चालूच ठेवले आहे. नंतर याच अफवा आणि मिथकांना सत्य म्हणून स्थापित केले जाते. परंतु जनतेला आपापसात लढवण्यासाठी फक्त अफवाच पुरेशा नसतात, तर त्याचा आर्थिक आधार सुद्धा असणे गरजेचे असते.

आज देशातील इतर राज्यांप्रमाणेच महाराष्ट्र सुद्धा आर्थिक संकटातून जात आहे. बेरोजगारी प्रचंड आहे. मराठ्यांमधीलही मुठभर श्रीमंतांना सोडले तर बाकी मराठा समुदायाची अवस्था वाईटच आहे. महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या आधारावर पाहिले तर लोकसंख्येच्या जवळपास एक तृतीयांश हिस्सा आणि काही आकड्यांनुसार ३५–३८ टक्के हिस्सा मराठा लोकसंख्येचा आहे. २७ टक्के इतर मागास जाती ज्यांच्यामध्ये कुणबी, धनगर इत्यादी जाती आहेत आणि १०–१२ टक्के लोकसंख्या दलितांची आहे. मराठा लोकसंख्येमध्ये २०० घरंदाज आणि अतिधनाढ्य मराठा परिवार असे आहेत ज्यांचा आज राज्यातील जवळपास सर्व प्रमुख आर्थिक साधनांवर आणि राजकीय सत्ताकेंद्रावर ताबा आहे. राज्यातील जवळपास ५४ टक्के शिक्षणसंस्थांवर यांचा ताबा आहे. जवळपास २३ सहकारी बँकांच्या चेअरमन पदी हेच खाते-पिते मराठा आहेत. विद्यापीठांमध्ये जवळपास ६०–७५ टक्के व्यवस्थापन मराठ्यांच्या ताब्यात आहे. जवळपास ७१ टक्के सहकारी समित्या यांच्याकडे आहेत. राजकीय शक्तीचा विचार केला तर १९६२ पासून २००४ पर्यंत निवडून आलेल्या २४३० आमदारांपैकी १३३६ (म्हणजे ५५ टक्के) मराठा होते, जे बहुतेक याच २०० घराण्यांमधून येतात. १९६० पासून आजपर्यंत झालेल्या १९ मुख्यमंत्र्यांपैकी १० यांच्यामधूनच आले आहेत.

यांच्या ठीक खाली आहे मराठा लोकसंख्येचा दुसरा वर्ग—धनिक शेतकरी किंवा “बागायती” वर्ग—जो नगदी पीक काढतो आणि गावातील भांडवलदार वर्ग आहे. महाराष्ट्रात जवळपास ८०–९० टक्के शेतीयोग्य जमिनीची मालकी मराठा जातीकडे आहे. यापैकी एक तृतीयांश पेक्षा जास्त याच धनिक शेतकरी वर्गाकडे आहे. या वर्गाकडे वरच्या धनिक घराण्यांसारखी आर्थिक शक्ती तर नाही, पण महाराष्ट्राच्या निवडणुकीच्या राजकारणातील हा एक प्रमुख राजकीय प्रभाव गट आहे आणि धोरणात्मक निर्णयांवर त्याचा प्रभाव असतो. यांच्या खालोखाल येतो मध्यम शेतकऱ्यांचा वर्ग ज्यांच्याकडे २.५ एकर ते १० एकर पर्यंत जमीन आहे. हे शेतकरी ना पूर्णत: सुखी आहेत ना नष्ट होण्याच्या मार्गावर. ते अनिश्चिततेमध्ये जगतात आणि आपल्या शेतीमध्ये बऱ्याच प्रमाणात हवामान-पावसासारख्या नैसर्गिक कारणांवर आणि सरकारी धोरणांवर अवलंबून असतात. ते धनिक शेतकरी होण्याची स्वप्न जोपासतात आणि जेव्हा असे केल्यावर आर्थिक दृष्ट्या अयशस्वी होतात तेव्हा हताश आणि कृद्ध होतात. सावकार आणि बँकांनी पिडल्यावर ते आत्महत्या करतात. मध्यम शेतकऱ्यांच्या या वर्गाचा एक चांगला हिस्सा गेल्या दशकांमध्ये भुमिहीन मजूरांच्या रांगेत सामील झाला आहे. याच्या खालोखाल चौथा वर्ग आहे गरीब मराठा लोकसंख्येचा जे फक्त शेतीतून जीविकोपार्जन करू शकत नाहीत आणि यांचा एक मोठा हिस्सा मोठ्या शेतकऱ्यांच्या शेतांवर मजूरी सुद्धा करतो. यांची स्थिती बऱ्याच प्रमाणात भूमीहीन मजुरांसारखी असते. हे आपल्या मुलांना चांगले शिक्षण देऊ शकत नाहीत. डिग्रीच्या अभावी शहरांपर्यंत पोहोचून रोजगार मिळवण्याची यांची स्थिती नसते. यांच्यामध्ये सांस्कृतिक आणि शैक्षणिक मागासलेपणा मोठ्या प्रमाणात आहे. पाचवा वर्ग आहे सर्वात गरीब मराठा लोकसंख्येचा म्हणजे भूमिहीन मजूरांचा जो दुसऱ्यांच्या शेतावर मजूरी करण्यासाठी किंवा सरकारी रोजगार हमी योजनेवर अवलंबून राहण्यासाठी मजबूर आहे. हा समुदाय सर्वात भयंकर गरीबीचे जीवन जगत आहे. काही नमुना सर्वक्षणांनुसार एकूण मराठा लोकसंख्येच्या ३५–४० टक्के हिस्सा भूमीहीन मजूरांचा आहे.

यापैकी विशेषत: खालच्या तीन वर्गांचा राग गरिबी, बेरोजगारी आणि विषमतेविरोधात बऱ्याच काळापासून साचत आलेला आहे. या रागाच्या निशाण्यावर मराठा जातीचे प्रतिनिधित्व करणारे राजकीय पक्ष असू शकतात जे खरेतर मराठ्यांमध्ये अस्तित्वात असलेल्या अतिधनाढ्य वर्गाचे प्रतिनिधित्व करतात. या वर्ग अंतर्विरोधात अशाप्रकारे स्वत:ला अभिव्यक्त करण्याची संभावना आहे. परंतु ही संभावना स्वत:च एका वास्तवात बदलेल याची शक्यता कमी आहे. गरीब कष्टकरी मराठा समुदायामध्ये सुद्धा जातीय पूर्वाग्रह खोलवर रुजलेले आहेत. ब्राह्मणवादी वर्चस्ववादी विचार त्यांच्यामध्येही वेगवेगळ्या प्रमाणात अस्तित्वात आहे. अशावेळी मराठ्यांमध्ये अस्तित्वात असलेला शासकवर्ग आणि त्याचे नेतृत्व करत मराठी अस्मितेचे राजकारण करणारे भांडवली पक्ष मराठी जातीतील व्यापक कष्टकरी वर्गाच्या वर्गीय संतापाला जातीय स्वरूप देऊ शकतात आणि देत आले आहेत. या समुदायाला असे सांगून भरकटवले जाऊ शकते की त्यांच्या गरिबी आणि बेरोजगारीचे मूळ कारण दलित आहेत जे राखीव जागांच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी हिरावून घेत आहेत. यासोबतच दलित समुदायामधून जो एक मध्यमवर्ग उदयाला आला आहे, तो सुद्धा अस्मितावादी राजकारण प्रभावी झाल्यामूळे स्वत:ला जातीय स्वरूपात ठामपणे अभिव्यक्त करत आहे, ज्यामुळे वर्गीय अंतर्विरोधांना जातीय स्वरूप देण्याच्या शक्यता बळावतात.

दलित लोकसंख्येचा मोठा हिस्सा शेतमजूर किंवा औद्योगिक मजूर आहे. शहरी दलित समुदायामध्ये इतर उच्च जातींच्या तुलनेत बेरोजगारीचा दर दुप्पट आहे. हे सांगण्याची गरज नाही की दलित कष्टकऱ्यांना आर्थिक शोषणासहीत पावलोपावली जातीय अपमान आणि अत्याचार सहन करावे लागतात. दुसरीकडे हे सुद्धा सत्य आहे की मधल्या आणि सवर्ण म्हणवल्या जाणाऱ्या जातींमधील एक बऱ्यापैकी मोठा हिस्सा गरिबांचा आणि कष्टकऱ्यांचा आहे. भांडवली विकासासोबत या जातींमध्ये सुद्धा वरचा एक छोटा समुदाय जास्त श्रीमंत आणि शक्तीशाली होत आहे आणि गरिबांची संख्या वाढत आहे. हेच कारण आहे की आज अनेक राज्यांमध्ये मध्यम शेतकरी जाती आरक्षणाची मागणी घेऊन रस्त्यावर आहेत, मग ते गुजरातचे पटेल असोत, महाराष्ट्रातील मराठा असोत किंवा हरियाणातील जाट. आज आरक्षणाची लढाई एक असे हत्यार बनले आहे ज्यात शासक वर्गाला काही खर्च करावा लागत नाही आणि लोकांमध्ये फूट पाडण्यात बरीच मदत मिळते. मध्यम शेतकरी जातींमध्ये असा प्रचार केला जातो की दलितांच्या आरक्षणामुळे तुम्हाला नोकऱ्या मिळत

पान १४ वर

सहकाऱ्यांनो

‘कामगार बिगुल’ आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लुट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.

•रूम नंबर १०४, हीरानंदानी बिल्डिंग, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई ४०००४३ मो. नं. ९६१९०३९७९३, ९१४५३३२८४९

• सोमनाथ, दिपनगर, केडगाव, अहमदनगर ४१४००५
मो. नं. ९१५६३२३९७६, ९६५७५९०४९१

## ‘कामगार बिगुल’चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

**1. ‘कामगार बिगुल’ व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांतींचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

**2. ‘कामगार बिगुल’ भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

**3. ‘कामगार बिगुल’ स्वतः अश्या चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य लाइनची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य लाइनच्या सत्यापानचा आधार तयार होऊ शकेल.**

**4. ‘कामगार बिगुल’ कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्याच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. ‘कामगार बिगुल’ सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतीकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

**5. ‘कामगार बिगुल’ हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.**



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वत: कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**
**लेनिन**

कामगार बिगुल
खाजगी वितरणासाठी

| | | |
|---|---|---|
| संपादक मंडळ | : | सोमनाथ केंजळे, सत्यनारायण |
| संपादकीय कार्यालय : | | रूम नंबर २०४, हीरानंदानी बिल्डिंग, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई ४०००४३ |
| संपर्क | : | ९१५६३२३९७६, ९६१९०३९७९३ |
| ईमेल | : | bigulakhbar@gmail.com |
| सहयोग राशी | : | रु. ५ (एका अंकासाठी) |
| वार्षिक | : | रु. १०० (टपाल शुल्कासह) |

# मुंबईमध्ये अग्नीतांडव : दुर्घटना नाही, भांडवली व्यवस्थेचे बळी

नागेश धुर्वे

आपण सगळ्यांनी नवीन वर्षाचे नेहमीप्रमाणे एकमेकांना शुभेच्छा देत उत्साहात स्वागत केले, पण मागच्या वर्षाचा विचार करता काही कटू आठवणी देऊनच २०१७ वर्ष सरले. कारण २०१७ हे वर्ष मुंबईसाठी, खास करून सर्वसामान्य गरीब कष्टकरी जनतेसाठी, खूपच वाईट गेले. मुंबईला गेल्या वर्षात अनेक दुर्घटनांनी घेरले. त्यात गेल्या डिसेंबरमध्ये दोन मोठ्या दुर्घटना झाल्या. त्यामध्ये जवळजवळ २६ लोकांना आपला जीव हकनाक गमवावा लागला. पहिली घटना म्हणजे दिनांक १८ डिसेंबरला अंधेरी (साकीनाका) येथील 'भानू फरसाण शॉप' या छोट्या कारखान्याला पहाटे लागलेल्या आगीत १२ कामगारांचा होरपळून मृत्यू झाला. त्यानंतर लगेच मुंबईला दुसऱ्या अग्नीतांडवाला तोंड द्यावे लागले. ही दुर्घटना दिनांक २९ डिसेंबरला घडली. कमला मिल कंपाउंडमध्ये ट्रेड हाऊस इमारतीच्या गच्चीवरील 'मोजोज बिस्ट्रो' आणि 'वन अबव्ह' या पब आणि रेस्टॉरंटला आग लागून त्यामध्ये १४ लोकांना आपला प्राण गमवावा लागला आणि ५४ लोक जखमी झाले.

अशा अनेक दुर्घटना व अपघात मुंबईत गेल्या वर्षी झाले. त्यानंतर नेहमीप्रमाणे समाज माध्यमातून या दुर्घटनांवर क्रिया प्रतिक्रिया आल्या, आरोप-प्रत्यारोप झाले, दुःख व्यक्त करण्यात आले. त्यामध्ये नेते अधिकारी, प्रशासन यांसह अगदी राष्ट्रपती व नेहमीच चर्चेचा केंद्रबिंदू असणारे आपले पंतप्रधान व मुख्यमंत्रीही सामील होते. पण गंमत अशी आहे की हे लोक प्रत्येक दुर्घटना-अपघातावर प्रतिक्रिया देत नसतात. कारण अशा दुर्घटनांचासुद्धा राजकारणात कसा फायदा घ्यायचा ते आपल्या नेत्यांसह अनेकांना चांगलेच जमते.

आता हेच बघा, फरसाण कारखाना आणि कमला मिल दुर्घटना एकाच स्वरूपाच्या होत्या म्हणजे दोन्हीकडेही आग लागून लोक मरण पावले. मरणाऱ्यांची संख्या बघितली तर जास्त फरक देखील नव्हता. पण एक फरक हा होता की, एकीकडे गरीब कष्टकरी कामगार मेले होते तर दुसरीकडे उच्चभ्रू श्रीमंत कुटुंबातील लोक मेले होते. फरसाण कारखान्याला लागलेल्या आगीत १२ कामगारांनी आपला प्राण गमावून देखील या दुर्घटनेवर ना राष्ट्रपती-पंतप्रधान यांनी दुःख व्यक्त केले, ना मुख्यमंत्री-महापालिका आयुक्तही घटनास्थळी गेले. एवढेच काय तर स्वतःला "लोकशाहीचा" चौथा आधारस्तंभ म्हणवणाऱ्या प्रसारमाध्यमांनी देखील या दुर्घटनेला (एक-दोन वर्तमानपत्रे वगळता) आपल्या बातम्यांमध्ये दुय्यम स्थान दिले. ज्या न्यूज चॅनल्सनी 'पद्मावती' सारख्या उथळ सिनेमावर वादळ उठवलं होतं, तसेच त्यावर चर्चांच्या फैरी झाडल्या होत्या, त्या न्यूज चैनल्सना १२ कामगारांचा दुर्घटनेत प्राण गेला याचे तर काहीही देणेघेणे नव्हते. अर्थात भांडवलदारांच्या जीवावर चालणाऱ्या मीडिया, वर्तमानपत्रे यांच्याकडून ही अपेक्षाच नाही; कारण ही वर्तमानपत्रे, न्यूज चॅनेल्स भांडवलदारांसाठी काम करतात हे आपल्याला चांगलंच ठाऊक आहे.

याउलट कमला मिल दुर्घटनेला माध्यमांनी अक्षरशः डोक्यावर घेतले, चर्चेच्या फैरीच्या फैरी झाडल्या गेल्या. टीव्ही चॅनलची ब्रेकिंग न्यूज हीच घटना होती. एवढेच काय तर या दुर्घटनेनंतर मुख्यमंत्री, महापालिका आयुक्त, अग्निशमन दल प्रमुख, पोलीस अधिकारी इत्यादी लोकांनी घटनास्थळी भेट दिली. तसेच आपले राष्ट्रपती, आणि नेहमी व्यस्त असलेले पंतप्रधान यांनी ट्वीट करुन कमला मिल दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केले. कमला मिल अग्नीकांडाची दखल एवढ्यावरच थांबली नाही. तर काही संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरून त्यांना तडकाफडकी निलंबित करण्यात आले. तसेच या अग्निकांडाची उच्चस्तरीय चौकशी करून १५ दिवसांत अहवाल देण्याचे आदेश दिले गेले आणि ते आदेश तंतोतंत पाळण्यात देखील आले. कमला मिलचे मालक, 'वन अबव्ह' आणि 'मोजोज बीस्ट्रो' चे मालक, वास्तुविशारद, अंतर्गत बदल करणारे सजावटकार या सर्वांमुळे अग्नितांडवात १४ जणांचा बळी गेला म्हणून या सर्वांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा अशी शिफारस करणारा अहवाल पालिका आयुक्त अजय मेहता यांनी दिनांक १८ जानेवारीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर केला. तसेच दोन सहाय्यक आयुक्त आणि अन्य दहा अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करण्यात येणार असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

एवढी तत्परता फरसाण दुकानाच्या दुर्घटनेत प्रशासनाने दाखवली नाही (अर्थात संबंधित विभागाचे महापालिका उपायुक्त 'भानू फरसाण शॉप' या कारखान्याला लागलेल्या आगीची चौकशी करणार आहेत असे समजते आहे, इतकेच). एवढेच नाही तर या दुजाभावात विरोधी पक्षातील नेते मंडळी देखील सामील होती. राहुल गांधीसह महाराष्ट्रातील राज ठाकरे यासारख्या छोट्या मोठ्या नेत्यांनीदेखील कमला मिल दुर्घटनेनंतर दुःख व्यक्त केलेच, आणि त्याचबरोबर राजकारणाची संधीदेखील दवडली नाही. खरेतर दुर्घटनेतील हकनाक मृत्यू कोणाचाही असो, ती दुःखद घटना असते. पण फरसाण दुकान किंवा गरीबांचे जीव घेणाऱ्या दुर्घटनांमध्ये ही मंडळी गप्प असतात. का? हा दुजाभाव का?

उत्तर सोपे आहे. पहिल्या दुर्घटनेत मेलेल्या कामगारांना या नफ्यातोट्याच्या भ्रष्ट भांडवलशाही व्यवस्थेत काडीची किंमत नाही. फक्त निवडणुका आल्या की त्यांचे मत मिळविण्यापुरते काही दिवस त्यांना किंमत येते. मात्र दुसऱ्या दुर्घटनेत उच्चभ्रू कुटुंबातील श्रीमंत लोक मेले. यांच्याबद्दल या व्यवस्थेला एवढा पुळका कशासाठी? कारण हे मध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय, उच्चभ्रू, श्रीमंत लोकच ही नफ्याची भ्रष्ट व्यवस्था टिकवण्यामध्ये राज्यकर्त्यावर्गाचे आधार असतात. त्यांचा ही व्यवस्था टिकवण्यामध्ये सिंहाचा वाटा असतो. हे लोक 'आहे रे' वर्गातील असल्यामुळे त्यांना या व्यवस्थेत कसलाही त्रास होत नाही. या वर्गाला सगळ्या सोयी सुविधा देखील कशा मिळतील, याची राज्यकर्ते नेहमी काळजी घेत असतात. म्हणूनच कमला मिल अग्निकांडानंतर प्रशासनासह नेते, विरोधी पक्षनेते, प्रसार माध्यमे यांनी या घटनेला डोक्यावर घेतले. आणि संबंधित लोकांवर तत्काळ कारवाई देखील केली. आज पर्यंत भांडवली मीडियात या घटनेचे पडसाद उमटत आहेत.

याचंच आणखी एक उदाहरण द्यायचं झालं तर मागे ऑगस्ट महिन्यात मुंबईत अतिवृष्टी झाली. त्यामुळे संपूर्ण मुंबई ठप्प झाली तेव्हा देखील काही लोकांना मृत्यूला सामोरे जावे लागले व त्यात काही लोकांचा मृत्यू देखील झाला. पण समाज माध्यमात चर्चेचा विषय होता मॅनहोलमध्ये पडून बॉम्बे रुग्णालयाचे डॉ. दीपक अमरापुरकर यांचा मृत्यू. त्यावेळी एवढी एकच महत्वाची बातमी प्रसारमाध्यमांमध्ये होती की, एका प्रसिद्ध डॉक्टरांचा मृत्यू अशा पद्धतीने होणे किती दुर्दैवी आहे वगैरे. पण सफाई कर्मचारी घाण साफ करण्यासाठी गटारात उतरतो आणि त्याचा गुदमरून मृत्यू होतो या चर्चेला परिघाबाहेरच ठेवले जाते, जेव्हा वस्तुस्थिती ही आहे की गटारात उतरुन सफाई करण्याच्या पद्धतीमुळे सफाई कर्मचारी खूप प्रमाणात मरतात. हे किती भयावह आहे, तरीदेखील यावर खूप कमी बोलले व लिहिले जाते. यावरून आपण समजून घेतले पाहिजे की ही व्यवस्था किती नागडी आहे. हा दुजाभाव, अर्थात गरिब व श्रीमंताला वेगवेगळा न्याय कसा दिला जातो ते अनेक वेळा आपल्याला व्यवहारात अनुभवायला मिळते. या बाबत एक फार प्रसिद्ध लोकोक्ति आहे: " गरिबाला वाली न्हाय".

खरेतर आज विज्ञानाने एवढी प्रगती केली आहे की एखाद्या माणसाला गटारात उतरून सफाई करण्याची बिलकुल गरज नाही; त्यासाठी मशिन्स उपलब्ध झाल्या आहेत. पण नफ्याच्या लालसेपायी ते या व्यवस्थेत केले जात नाही. कारण स्वस्तात काम करुन घेऊन भरमसाठ नफा मिळवणे हाच महत्वाचा उद्देश या व्यवस्थेचा आहे. या नफ्या-तोट्यावर आधारित व्यवस्थेत अशा आगीसारख्या दुर्घटनांची तात्कालिक कारणे काहीही असोत, मुख्य कारण अंदाधुंद नफा कमवणे व जीवघेणी स्पर्धा हेच आहे आणि त्यासाठी वाटेल ते केले जाते. हे समजून घेण्यासाठी या घटनांच्या जरा खोलात जाऊन आपण थोडी चर्चा करुयात.

कमला मिल कंपाउंडमध्ये तब्बल ४२ रेस्टॉरन्ट आणि पब आहेत. हे संकुल दक्षिण-मध्य मुंबईत लोअर परळ मध्ये आहे. इथे अनेक नियम कायदे धाब्यावर ठेवून ही हॉटेल्स चालवली जात आहेत. पालिकेतील अधिकारी, स्थानिक नेते, बिल्डर, आणि हॉटेलचे मालक यांच्या संगनमताने अशा स्वरूपाच्या अनेक व्यवसायाचे जाळे मुंबईत तयार झाले आहे. याच जागेवर पूर्वी कापड गिरण्या चालत होत्या. नियम धाब्यावर ठेवून या गिरण्यांची इंच न इंच जागा फायद्यासाठी नियमबाह्य बांधकाम करून मालकांनी वापरात आणली आहे. भांडवलशाहीत जास्तीत जास्त नफा आणि जीवघेणी स्पर्धा यामध्ये सुरक्षेच्या मुद्द्यांना बगल दिली जाते, त्यामुळे सुरक्षेची कोणतीही काळजी न घेता हे उद्योग उभारले गेलेत. कमला मिल कंपाउंडमध्ये बांधकाम, जागा वापरात बदल, उपहार गृह, अग्निसुरक्षा इ. सगळेच नियम धाब्यावर ठेवले गेले. 'कमला मिल कंपाऊंड' असो किंवा 'भानू फरसाणा शॉप 'सारखे छोटे उद्योग असो, यांनी देखील हेच केले. त्याचाच परिणाम या दुर्घटना आहेत. नफ्याच्या हव्यासापोटीच लोकांचे जीव गेले आहेत.

### गरिबांसाठी दुर्घटनांचे न संपणारे चक्र

मुंबईतील अलीकडील काही दुर्घटना बघितल्या तर लक्षात येते की यात बळी जाणारा वर्ग गरीबच असतो.

टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स या संस्थेच्या एका सर्वेनुसार गटारीत उतरून चेंबर साफ करणाऱ्या सरासरी वीस कामगारांचा मृत्यू होतो. एका माहिती अधिकाराच्या अहवालानुसार २०१६ मध्ये लोकल ट्रेनचा प्रवास करताना ८ लोकांचा रोज मृत्यू झाला. म्हणजेच संपूर्ण वर्षामध्ये ३३६३ लोकांचा मृत्यू झाला आणि ३२०२ लोक जखमी झाले. अशाच प्रकारे २०१७ मध्ये झालेल्या इतर काही प्रमुख दुर्घटना पुढीलप्रमाणे. (१) ३० जून रोजी अंधेरीच्या जुहू गल्लीतील वायरलेस रोडवरील 'मेस्त्री' चाळीतील' 'वफा'या औषधाच्या दुकानाला आग लागून त्यात नऊ जणांचा मृत्यू झाला (२) २६ जुलै रोजी घाटकोपर मधील सिध्दीसाई इमारत कोसळून त्यात १७ लोकांना हकनाक आपला जीव गमवावा लागला. त्याला कारण बेकायदा बांधकाम करून तेथील नर्सिंगहोम बंद करून तेथे बार सुरू करण्यात आला होता विशेष म्हणजे याचा मालक शिवसेनेचा लोकल नेता होता. (३) २९ सप्टेंबर रोजी एलफिस्टन रेल्वे पूल दुर्घटना झाली. त्यामध्ये २३ प्रवाशांचा चेंगराचेंगरीत मृत्यू झाला. (४) ३१ ऑगस्ट रोजी भेंडी बाजारातील शंभर वर्षे जुनी इमारत कोसळून त्यात जवळजवळ ३० लोकांना जीव गमवावा लागला.

या दुर्घटनांचा खोलात जाऊन विचार केला तर लक्षात येते की, अशा अनेक दुर्घटना टाळल्या जाऊ शकत होत्या. पण अशा जगात जिथे प्रत्येक गोष्ट नफ्याच्या दृष्टीकोनातूनच मोजली जाते तेथे सुरक्षिततेचे उपायही नफ्या-तोट्याच्या गणितातूनच होतात, आणि कणभर नफा वाढवण्यासाठी सुद्धा सुरक्षिततेच्या नियमांचा बळी दिला जातो. त्यामुळे गरीबांचा जीव घेणाऱ्या अशा दुर्घटना होत राहतील. या नफ्यातोट्याच्या जीवघेण्या व्यवस्थेत यापेक्षा वेगळे काहीही होऊ शकत नाही.

### मिलच्या जागांचे जमीन घोटाळे प्रकरण: कष्टकऱ्यांच्या जमिनींवर भांडवलदारांचा कब्जा

कमला मिल दुर्घटनेनंतर गिरण्यांचे वेगळे घोटाळे देखील आता समोर यायला लागलेत. गिरणी कामगारांसाठी लढा देणाऱ्या नीरा आडारकर यांच्यानुसार गिरण्यांच्या जागेमधील एक तृतीयांश जागा ही पालिकेकडे मोकळ्या जागा व सुविधांसाठी, एक तृतीयांश जागा ही निवासी घरांसाठी(गिरणी कामगारासाठी घरे) तर उर्वरित एक तृतीयांश जागा ही संबंधित मालकाकडे व्यवसायिक वापरासाठी देण्यात आली आहे. मात्र काही मालकांनी गिरण्यांच्या आधीच्या जागाच रंगरंगोटी करून भाड्याने वापरायला दिल्या. प्रत्येक गाळ्याला वेगळे दाखून त्याप्रमाणे 'चेंज ऑफ युझर' प्रमाणपत्र घेण्यासाठी परवानगी मागितली गेली. परवानगीबाबत कागदावरील नियम योग्य व पुरेसे असले तरीही त्याच्या अंमलबजावणीत मात्र मालकांना सोयीस्कर लवचिकता आणली गेली व ते गिरण्यांचे अतिरिक्त घोटाळे ठरले आहेत. आता हा घोटाळा कसा झाला आणि त्यामध्ये नुकसान कुणाचे झाले. ते थोडे इतिहासात जाऊन बघावे लागेल. तो इतिहास आपण संक्षिप्त स्वरूपातच बघुयात.

कमला मिल कंपाऊंड सारख्या गिरण्यांचा व्यावसायिक वापर होत आहे. त्या गिरण्या पूर्वी 'राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळ' (NTC) आणि खासगी मालकांच्या ताब्यात होत्या. या गिरण्या मुंबईत अत्यंत मोक्याच्या सहाशे एकर जागेवर वसल्या होत्या, खरेतर मूलतः ह्या गिरण्या कामगारांच्या जीवावर सुरू होत्या आणि या गिरण्यांना लागणारी जमीन ब्रिटिश सरकारने उद्योगधंद्याच्या वाढीसाठी संपादित केली होती. मुंबईत १८५६ साली पहिली कापड गिरणी सुरू झाली. पुढे या उद्योगाला भरभराट आली. परिणामतः गिरण्यांची संख्या देखील वाढली. पण मुळात भांडवलदार उद्योग नफ्यासाठी सुरू करतो आणि जास्तीत जास्त नफा मिळविण्यासाठी हर प्रकारे तो प्रयत्न करतो. त्यातून सुरू होते शोषणाची मालिका. त्यात पहिला बळी जातो तो कामगारांचा. कारण नफा हा आभाळातून पडत नाही तर तो श्रमाची चोरी

पान १० वर

# पॅलेस्तिनी लोकांचा स्वातंत्र्यलढा चिरायू होवो!
# पॅलेस्तिनी जनतेच्या संघर्षाला साथ द्या!

अभिजित

जगाच्या राजकारणात सर्वाधिक आर्थिक-राजकीय महत्व असणाऱ्या प्रश्नांपैकी एक आहे ‘पॅलेस्ताईन-इस्त्रायलचा प्रश्न’. ५ डिसेंबर २०१७ रोजी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी अमेरिकेचा दूतावास जेरूसलेम शहरात हलवण्याचा निर्णय घेऊन जेरूसलेम शहराला इस्त्रायलची राजधानी म्हणून मान्यता दिली आणि पॅलेस्तिनी लोकांच्या स्वातंत्र्यलढ्याचा प्रश्न, जो नेहमीच ऐरणीवर असतो, पुन्हा एकदा वर्तमानपत्रांमध्ये झळकला. अमेरिकेच्या या निर्णयाच्या विरोधात २१ डिसेंबर रोजी संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेमध्ये ९ विरुद्ध १२८ मतांनी अमेरिकेच्या निर्णयाचा जगातील बहुतेक सर्व देशांनी निषेध केला. भारताने ऐतिहासिकरित्या पॅलेस्तीनी स्वातंत्र्यलढ्याला नेहमीच पाठींबा दिला आहे, पण गेल्या काही दशकामध्ये आणि विशेषत: मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर भारताचे इस्त्रायलसोबत संबंध अतिशय जवळीकीचे होत आहेत. हिंदूत्ववादी फासिस्त विचारांच्या सरकारला समविचारी इस्त्रायलशी मैत्री अत्यंत जवळची वाटते यात काही आश्चर्य नाही.

***काय आहे इस्त्रायल-पॅलेस्ताईनचा प्रश्न आणि जगाच्या राजकारणात तो इतका महत्वाचा का आहे?*** जगभरातील भांडवलदारांच्या ताब्यातील मुख्य प्रसारमाध्यमे सतत इस्त्रायलच्या बाजूने लिहिण्याचा किंवा पॅलेस्तिनी बाजू लपवण्याचा प्रयत्न करत असतात. खरेतर जगातील सर्वाधिक हिंमती आणि चिवट असा स्वातंत्र्यलढा पॅलेस्ताईनमधील लोक गेली सात दशके लढत आहेत.

### पॅलेस्ताईनच्या प्रश्नाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

सध्या ज्या भागाला इस्त्रायल-पॅलेस्ताईन म्हणून ओळखले जाते, त्याला गेल्या २,००० वर्षांपेक्षा जास्त काळ (१९४९ पर्यंत) पॅलेस्ताईन या नावानेच ओळखले जात होते. आज इस्त्रायली ज्यू आणि पॅलेस्तिनी अरब (यांच्यामध्ये प्रामुख्याने मुस्लिम, आणि शिवाय ख्रिश्चन व ड्रुझे अशा तीन धर्मांचे लोक सामील आहेत) दोन्ही या भागावर आपला दावा सांगत आहेत. येथील सर्वात महत्वाचे असलेले जेरुसलेम (आणि बेथलहम सुद्धा) हे शहर ऐतिहासिकरित्या जगातील ख्रिश्चन, ज्यू आणि मुस्लिम या तीन एकेश्वरवादी धर्मांसाठी 'पवित्र भूमी' मानले जाते आणि तिन्ही धर्मांचे लोक या शहरावर दावा करतात. या दाव्याची धार्मिक बाजू अशी की बायबल मध्ये अब्राहम आणि त्याच्या वंशजांना दिलेल्या वचनाच्या आधारे आणि इस्त्रायल व ज्युडीया या प्राचीन ज्यू साम्राज्याची ही भूमी असल्याचा दाखला देत ज्यू लोक या जमिनीवर दावा सांगतात. पॅलेस्तिनी अरब शेकडो वर्षांपासून येथे रहात आलेत आणि १९४८ पर्यंत या भागात त्यांच्याच लोकसंख्येचे बहुमत होते, या आधारावर तेही आपला दावा सांगतात. अरबांचे असे म्हणणे आहे की अब्राहमचा मुलगा इश्माईल हा अरबांचा मूळ पुरुष आहे आणि त्यामुळे देवाने अब्राहमच्या मुलांना दिलेले वचन अरबांना सुद्धा लागू होते. धार्मिक बाजू असली आणि ज्यू धर्माचा उदय पॅलेस्ताईनच्या भूमीवर झालेला असला तरी ज्यू लोक व्यापार-उदिमामुळे गेल्या २,००० वर्षांमध्ये जगभरात विविध ठिकाणी पसरले आणि तेथेच स्थायिकही झाले. मोठ्या प्रमाणात ते युरोपातही गेले. पॅलेस्ताईनमध्ये बहुसंख्य अरबच गेली २,००० वर्षे रहात आले आहेत. तेथे राहणाऱ्या थोड्या ज्यू लोकांचा जमिनीशी असलेला लगाव हा धार्मिक होता, राष्ट्रीय नाही.

विसाव्या शतकात जेव्हा जगभरात ‘राष्ट्र’ संकल्पना विकसित होत होती, तेव्हा ज्यू लोकांचे स्वतंत्र राष्ट्र असावे या कल्पनेला धरून झायोनिस्ट चळवळीचा उगम युरोपात झाला. ज्यू धर्माचा उदय पॅलेस्ताईनमध्ये झाला त्यामुळे तेथेच हे राष्ट्र वसवले जावे अशी त्यांची मागणी बनली. झायोनिझमच्या विचाराला जगभरात पसरलेल्या ज्यू जनतेकडून खूप काळापर्यंत मोठा पाठींबा नव्हता.

### पॅलेस्ताईनमध्ये ब्रिटीश राज्य

पॅलेस्ताईनचे भौगोलिक स्थान पाहता, खनिज तेल बहुल अशा मध्यपूर्व आशियातील तेलाच्या साठ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी जगभरातील साम्राज्यवादी देशांचा या भागामध्ये नेहमीच स्वार्थी रस राहिला आहे. पहिल्या महायुद्धानंतर ब्रिटनने आपल्या साम्राज्यवादी धोरणांना अनुसरून ऑटोमन साम्राज्यातील अरबांच्या एका गटाला खोटे आश्वासन देऊन आपल्या बाजूने लढवले, पण युद्धानंतर फ्रांस सोबत हातमिळवणी करून पॅलेस्ताईनच्या भूमीवर आपला कब्जा स्थापित केला. याचवेळी आपल्या साम्राज्यवादी हितांसाठी फोडा आणि राज्य करा नितीचा अवलंब करत १९१७ मध्ये ब्रिटीश विदेशमंत्री लॉर्ड आर्थर बाल्फोर यांनी एक घोषणापत्र (बाल्फोर्ड घोषणापत्र) प्रकाशित केले. ज्यामध्ये 'पॅलेस्ताईनमध्ये स्वतंत्र ज्यू राष्ट्राची स्थापना' करण्यास समर्थन देण्यात आले. याच काळात युरोपातून ज्यूंचे हळूहळू पॅलेस्ताईनमध्ये स्थलांतर चालू झाले व जमिन खरेदी वाढत गेली. त्यांच्या स्थायिक होण्याला पॅलेस्ताईनमधील शेतकरी, पत्रकार आणि राजकीय व्यक्तींचा विरोध वाढत होता. यानंतर १९४८ पर्यंत लोकसंख्या वाढत असलेल्या ज्यू आणि पॅलेस्तिनी लोकांमध्ये काही संघर्ष चालूच राहिले, ज्यात दोन्ही बाजूच्या लोकांचे बळी गेले.

### इस्त्रायलची स्थापना

जर्मनीमध्ये १९३३ मध्ये हिटलर सत्तेवर आल्यानंतर त्याने ज्यूंचे हत्याकांड चालू केले. यामुळे ज्यूंचे पॅलेस्ताईनमध्ये देशांतर, जमीन खरेदी आणि स्थायिक होणे मोठ्या प्रमाणात वाढले. १९३६-३९ दरम्यान ब्रिटिश ताबा आणि झायोनिस्ट वसाहतींच्या विरोधात अरबांचा उठाव झाला. या उठावाला ब्रिटिशांनी झायोनिस्ट लोकसेनेच्या मदतीने आणि शेजारील अरब राष्ट्रांच्या निष्क्रियतेच्या सहाय्याने मोडून काढले. अरब बंडाला मोडून काढल्यानंतर, वाढत्या तणावाच्या वातावरणात व्यवस्था चालू ठेवण्यासाठी, ब्रिटिशांनी आपल्या धोरणांचा पुनर्विचार केला व १९३९ मध्ये एक श्वेतपत्रिका प्रकाशित केली. त्यांनी श्वेतपत्रिकेद्वारे भविष्यात ज्यूंचे देशांतर आणि जमिन खरेदीवर मर्यादा आणण्याची, तसेच दहा वर्षांमध्ये (पॅलेस्तिनी) स्वातंत्र्याची घोषणा केली. यामुळे अरब-बहुल स्वतंत्र पॅलेस्ताईन देश बनला असता.


१९४६ साली ब्रिटिश ताब्यातील पॅलेस्ताईनमध्ये १२,६९,००० अरब आणि ६,०८,००० ज्यू रहात होते. ज्यूंकडे खरेदीच्या मार्गाने एकूण जमिनीच्या ७% आणि शेतीयोग्य जमिनीच्या २०% जमिन होती. म्हणजे २/३ लोक अरब होते आणि ते बहुसंख्य जमिनीचे मालक होते. दुसऱ्या महायुध्दानंतर ब्रिटीशांनी पुन्हा एकदा धोका देत पॅलेस्ताईन वरचा अधिकार सोडून देण्याचे ठरवले आणि नुकत्याच बनलेल्या संयुक्त राष्ट्रांवर पॅलेस्ताईनचे भविष्य ठरवण्याची जबाबदारी सोपवली. संयुक्त राष्ट्रामध्ये तोपर्यंत जगातील महासत्ता बनलेल्या अमेरिकेचे वर्चस्व स्थापन झालेले होते आणि अमेरिकेला आपल्या साम्राज्यवादी हितांच्या रक्षणासाठी अरब राष्ट्रांवर नियंत्रण ठेवू शकेल अशा निष्ठावान सत्तेची गरज निर्माण झाली होती. या राजकारणातून २९ नोव्हेंबर १९४७ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेने पॅलेस्ताइनची ज्यू आणि अरब देशांमध्ये फाळणी करण्याचा निर्णय घेतला. फाळणी अशा पद्धतीने करण्यात आली की प्रत्येक देशात तेथील लोकांचे बहुमत असेल, परंतु अरब राष्ट्रामध्ये काही ज्यू वसाहती राहतील आणि प्रस्तावित ज्यू राष्ट्रामध्ये मात्र शेकडो हजार अरब राहतील. संयुक्त राष्ट्रांच्या योजनेनुसार जेरुसलेम आणि बेथलहम हे आंतरराष्ट्रीय प्रभाग बनणार होते. पॅलेस्तिनी अरबांकडून त्यांचा देश काढून घेण्याचाच हा ठराव होता आणि पॅलेस्तिनी जनतेला तो नक्कीच मान्य नव्हता.

झायोनिस्ट नेतृत्वाने सार्वजनिकरित्या तरी संयुक्त राष्ट्रांची योजना मान्य केली, परंतु काही करुन ज्यू राष्ट्राच्या सीमा वाढवता येतील अशी ते आशा ठेवून होते. पॅलेस्तिनी लोकांनी आणि आसपासच्या अरब देशांनी संयुक्त राष्ट्रांची योजना नाकारली आणि संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेतील मतदानाला आंतरराष्ट्रीय विश्वासघात मानले. संयुक्त राष्ट्रांची फाळणी योजना लागू झाल्याच्या काही दिवसातच पॅलेस्ताईनच्या अरब आणि ज्यू रहिवाशांमध्ये लढाई चालू झाली. अरबांच्या लष्करी शक्तीचे संघटन, प्रशिक्षण आणि शस्त्रसज्जता कमजोर होती. याउलट झायोनिस्ट लष्कर संख्येने लहान असले तरी अमेरिका आणि ब्रिटनच्या मदतीने सुसंघटीत, प्रशिक्षित आणि शस्त्रसज्ज होते. एप्रिल १९४८ पर्यंत झायोनिस्ट सेनेने संयुक्त राष्ट्रांनी दिलेल्या जवळपास सर्व भूमीवर कब्जा केला होता आणि अनेक ठिकाणी फाळणीने आखलेल्या सीमेपलीकडे जाऊन भूभाग ताब्यात घेणे त्यांनी चालू केले होते.

१५ मे १९४८ रोजी ब्रिटीशांनी पॅलेस्ताईन सोडले आणि झायोनिस्ट नेत्यांनी इस्त्रायल राष्ट्राची घोषणा केली. शेजारच्या अरब राष्ट्रांनी (इजिप्त, सिरिया, जॉर्डन आणि इराक) पॅलेस्ताईनचे झायोनिस्टांपासून "रक्षण" करण्याच्या नावाखाली इस्त्रायलवर हल्ला केला. यात त्यांचेही भू-आर्थिक स्वार्थ गुंतलेलेच होते. परंतु शस्त्रांच्या पुरवठ्याच्या जोरावर इस्त्रायली सैन्याने आपले प्रभुत्व स्थापन केले आणि संयुक्त राष्ट्रांच्या योजनेने आखून दिलेल्या सीमारेषेपलीकडे जाऊन भूभाग ताब्यात घेतला. १९४९ साली तह झाला आणि युद्ध संपले. पॅलेस्ताईनच्या प्राचीन भूमीचे आता तीन तुकडे झाले होते. इस्त्रायलकडे जवळपास ७७% भूभाग आला. जॉर्डनने पूर्व जेरुसलेम आणि मध्य पॅलेस्ताईनचा टेकडी प्रदेश म्हणजे वेस्ट बँक व्यापला. इजिप्तने गाझा शहराभोवतालच्या किनारी प्रदेशावर (गाझा पट्टी) नियंत्रण कायम केले. संयुक्त राष्ट्रांच्या योजनेत कल्पिलेले ‘पॅलेस्तिनी अरब राष्ट्र’ कधीच अस्तित्वात आले नाही. युद्धादरम्यान जवळपास ७ लाख पॅलेस्तिनी लोक शेजारील विविध अरब देशांमध्ये निर्वासित झाले.

१९४९ च्या शस्त्रसंधी मुळे इस्त्रायल, आणि ब्रिटीश ताब्यातील पॅलेस्ताईनचे वेस्ट बँक व गाझापट्टी हे भाग, राजकीय दृष्ट्या वेगळे झाले. १८४८-१९६७ दरम्यान जेरुसलेम सहीत वेस्ट बँकवर जॉर्डनचे राज्य होते. जॉर्डनने या भागाला १९५० मध्ये स्वत:मध्ये समाविष्ट केले आणि तेथे राहणाऱ्या पॅलेस्तिनी नागरिकांना जॉर्डनचे नागरिकत्व दिले. याच काळात गाझापट्टी इजिप्तच्या लष्करी प्रशासनाखाली होती.

**पॅलेस्ताईनच्या जमिनीचे हरण: 1946 ते 2009**




### जून १९६७ चे युद्ध

सिरिया, इजिप्त, लेबनन अशा अरब राष्ट्रांचा पॅलेस्तिनी लोकांच्या लढ्याला काही प्रमाणात पाठींबा राहिला आहे. यात काही प्रमाणात अरब राष्ट्रवादाचा प्रभाव आहे तर काही प्रमाणात या अरब राष्ट्रांचे स्वत:चे हितसंबंधही आहेत. १९५६ साली इजिप्तने (ब्रिटनच्या ताब्यातील) सुवेझ कालव्याचे राष्ट्रीयीकरण केल्यानंतर इस्त्रायलने ब्रिटनला साथ देत इजिप्तवर हल्ला केला आणि गाझापट्टी ताब्यात घेतली, पण आंतरराष्ट्रीय दबावामुळे इस्त्रायलला शस्त्रसंधी रेषेपर्य़ंत माघार घ्यावी लागली. १९६०च्या सुरुवातीच्या काळात मात्र अमेरिका आणि सोविएत रशियामधील जागतिक सत्ता आणि प्रभावाच्या स्पर्धेत हा भाग शितयुद्धाचे महत्वाचे केंद्र बनला होता.

सिरिया सोबत असलेला सैनिकी आणि राजनैतिक संघर्ष वाढत गेला आणि ५ जून १९६७ रोजी इस्त्रायलने इजिप्त व सिरियावर हल्ला

पान ५ वर

# पॅलेस्तिनी लोकांचा स्वातंत्र्यलढा चिरायू होवो!

पान ४ वरून

चढवला आणि काही तासातच त्यांच्या हवाई दलाचा जमिनीवरच नाश केला. थोड्या उशिराने जॉर्डन सुद्धा युद्धात सामील झाले आणि त्यामुळे इस्रायलने त्याच्यावर सुद्धा हल्ला चढवला. सहा दिवसांच्या युद्धात इजिप्त, जॉर्डन आणि सिरीयन सैन्याचा निर्णायक पराभव झाला आणि इस्रायलने पॅलेस्टाईनचा भाग असलेले वेस्ट बँक (जॉर्डनकडून ), सिनाई द्वीपकल्प व गाझा पट्टी (इजिप्तकडून), आणि गोलन हाईट्स (सिरीयाकडून) जिंकून घेतले.

**संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचा ठराव २४२**

१९६७ च्या युद्धानंतर संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेने ठराव २४२ मंजूर केला. या ठरावाने अतिशय संदिग्ध भाषेमध्ये इस्रायलला "ताकदीच्या जोराने भूमीवर कब्जा करण्यास मनाई" केली, इस्रायलने युद्धात बळकावलेल्या भूमीवरचा ताबा सोडावा अशी मागणी केली. पॅलेस्तिनी लोकांनी अनेक वर्षे ठराव २४२ नाकारला कारण या ठरावाने त्यांच्या राष्ट्रीय स्वनिर्णयाच्या अधिकाराला आणि मायदेशी परतण्याला मान्यता मिळत नाही. ठरावाने फक्त निर्वासितांच्या "योग्य पुनर्वसनाचे" आवाहन केले, म्हणजे पॅलेस्तिनी लोकांना निर्वासित ठरवले, एक वसाहतिक राष्ट्र नाही. ठराव २४२ने या भागातील सर्व देशांच्या अस्तित्वाला मान्यता देताना इस्रायलला पॅलेस्तिनी मान्यता असल्याचे तर मानले, परंतु पॅलेस्तिनी राष्ट्रीय हक्कांना मान्यता मात्र दिली नाही.

**१९६७ ते कँप डेव्हिड**

१९६७ नंतर, विविध राजकीय आणि सैनिक गटांनी बनलेल्या पॅलेस्टाईन स्वतंत्रता संघटनेच्या (पॅलेस्टाईन लिबरेशन ऑर्गनायझेशन, पीएलओ) रुपाने पॅलेस्तिनी राष्ट्रीय चळवळ एक प्रमुख शक्ती म्हणून समोर आली. यासर अराफत हे १९६८ पासून ते २००४ मध्ये मृत्यू होईपर्यंत पीएलओचे अध्यक्ष होते. ते फताह या सर्वात मोठ्या गटाचेही नेते होते. इतर मुख्य गटांमध्ये पॅलेस्टाईनच्या मुक्तीसाठी लोकप्रिय आघाडी(पॉप्युलर फ्रंट फॉर लिबरेशन ऑफ पॅलेस्टाईन , पीएफएलपी), पॅलेस्टाईनच्या मुक्तीसाठी लोकशाही आघाडी(डेमोक्रॅटीक फ्रंट फॉर लिबरेशन ऑफ पॅलेस्टाईन, डीएफएलपी), आणि इस्रायलने कब्जा केलेल्या प्रदेशामध्ये पॅलेस्टाईन जनता पक्ष (पॅलेस्टाईन पिपल्स पार्टी, पीपीपी, पूर्वीचा कम्युनिस्ट पक्ष) यांचा समावेश होतो.

१९६७ नंतर जवळपास २-३ दशके जॉर्डन, लेबनन, ट्युनिशिया येथून पीएलओने आपल्या कारवाया चालू ठेवल्या. १९९३ पर्यंत इस्रायलने पीएलओ सोबत बोलणी करण्यास नकार दिला. या दरम्यात १९७३ साली इजिप्त आणि इस्रायलमध्ये झालेल्या छोट्या युद्धानंतर गोलन हाईट्स व सिनाई द्वीपकल्पातून, अमेरिकेच्या मध्यस्तीने इस्रायलने माघार घेतली. यानंतर कँप डेव्हिड येथे चर्चा होऊन १९७९ साली शांतता तह झाला, ज्यात गाझापट्टीतील पॅलेस्तिनींना ५ वर्षे स्वायत्तत्ता देण्याचे व नंतर अंतिम बोलणी करण्याचे ठरले; पण यावर काही अंमलबजावणी झाली नाही. इजिप्तला दिलेली आश्वासने इस्रायलने पाळली, पण पॅलेस्तिनींच्या तोंडाला मात्र पाने पुसली.

**पहिला इंतिफादा**

डिसेंबर १९८७ मध्ये वेस्ट बँक आणि गाझापट्टीतील पॅलेस्तिनी लोकांनी इस्रायली कब्जाविरोधात प्रचंड मोठा उठाव केला. हा उठाव, किंवा इंतिफादा (ज्याचा अरबी भाषेतील अर्थ 'हलवून टाकणे' असा आहे) पीएलओने चालू केलेला किंवा घडवून आणलेला नव्हता. हा जनतेचा स्वत:स्फूर्त उठाव होता. इंतिफादा मध्ये आंदोलनाचा अनुभव नसलेले अनेक लोक, लहान मुलं आणि कुमारवयीनांसहित लाखो लोक सामील होते. लोकांनी मोठमोठी निदर्शने, सार्वत्रिक संप, कर भरण्यास नकार, इस्रायली उत्पादनांचा बहिष्कार, राजकीय भित्तीचित्रे आणि भूमिगत 'स्वातंत्र्य शाळांची' स्थापना (कारण चळवळीला प्रत्युत्तर म्हणून इस्रायलने नियमित शाळा बंद करुन टाकल्या होत्या), दगड फेकणे, पेट्रोल बाँब (मोलोटोव्ह कॉकटेल), आणि इस्रायली सैन्याच्या हालचालींना अडथळे निर्माण करणे असे मार्ग अवलंबले. व्यापक आधारावर उभ्या असलेल्या चळवळीमुळे वेस्ट बँक आणि गाझापट्टीतील पॅलेस्तीनींकडे अभूतपूर्व असे आंतरराष्ट्रीय लक्ष वेधले गेले आणि इस्रायलने केलेल्या कब्जाला अगोदर कधी नव्हे असे कडवे आव्हान उभे राहिले.

संरक्षण मंत्री यित्झाक राबीन यांच्या नेतृत्वाखाली इस्रायलने "सक्ती, शक्ती आणि हल्ले" यांच्या सहाय्याने इंतिफादाला चिरडून टाकण्याचे पूर्ण प्रयत्न केले. सैन्याच्या अधिकाऱ्यांनी जवानांना निदर्शकांची हाडं तोडण्याचे आदेश दिले. १९८७ ते १९९१ या



## दुभाजक कुंपण

काळात इस्रायली सैन्याने १,०००च्या वर पॅलेस्तिनींना ठार केले, ज्यामध्ये २०० जण १६ वर्षाखालील होते. इस्रायलने मोठया प्रमाणात अटकसत्रही आरंभले. या काळात जगातील दरमाणशी सर्वाधिक कैदी इस्रायलमध्ये होते. या दरम्यान इस्रायलने एकेका माणसाला हेरुन गुप्तपणे खून करण्याचेही मोठे सत्र चालवले.

इंतिफादाने हे तर स्पष्ट केले की 'जैसे थे' स्थिती चालणार नाही. यानंतर पॅलेस्टाईन राष्ट्रीय समितीने (पॅलेस्टाईन नॅशनल कौन्सिल, पीएलओचे नेतृत्व करणारा गट) अल्जिरियात १९८८ मध्ये बैठक केली, वेस्ट बँक आणि गाझापट्टीमध्ये पॅलेस्टाइनचे स्वतंत्र राष्ट्र घोषित केले, पण यासोबतच इस्रायलचे अस्तित्व मान्य केले आणि सशस्त्र लढ्याचा त्याग केला. पीएलओने द्विराष्ट्र सिद्धांत मान्य करून केलेली ही ऐतिहासिक तडजोड होती. यानंतर १९९१ साली झालेल्या आखाती युद्धात पीएलओने इराकला साथ दिली आणि इतर अरब राष्ट्रांना स्वत:पासून अजून दूर लोटत स्वत:ची स्थिती अधिक कमजोर करून घेतली.

यानंतर काही वॉशिंग्टन वाटाघाटी झाल्या, पण त्यातून काही निष्पन्न झाले नाही. याच काळात फताहच्या विरोधात इस्लामिक मूलतत्ववादी हमास या संघटनेचा उदय पॅलेस्टाईनमध्ये झाला, ज्यांनी आक्रमक भूमिका घेत आत्मघाती हल्ले चालू केले.

**ऑस्लो करार**

जहालमतवादी इस्लामची भिती आणि वॉशिंग्टन वाटाघाटींच्या अनिर्णायक वाटचालीमुळे राबीन सरकारने पीएलओ सोबत वाटाघाटी न करण्याचे अनेक वर्षांचे धोरण बदलले. सप्टेंबर १९९३ मध्ये वॉशिंग्टन येथे इस्रायल-पीएलओ तत्वांच्या घोषणापत्रावर सह्या झाल्या.

हा तत्वांचा जाहीरनामा इस्रायल आणि पीएलओने परस्परांना मान्यता देण्यावर आधारित होता. जाहीरनाम्यानुसार इस्रायलने गाझा पट्टी आणि जेरिको शहरातून माघार घेण्याचे कबूल केले आणि पाच वर्षांच्या अंतरिम काळात वेस्ट बँकच्या अनिर्देशित भागांमधून सुद्धा माघार घेण्याचे जाहीर केले. कळीचे मुद्दे — जसे इस्रायल किती भूभागावर कब्जा सोडेल, बनत असलेल्या पॅलेस्टाईनचे स्वरुप, इस्रायली वसाहती आणि तेथील नागरिकांचे भविष्य, पाण्यावरील हक्क, निर्वासितांच्या प्रश्नावर उपाय आणि जेरुसलेमची स्थिती — भविष्यातील अंतिम स्थितीच्या वाटाघाटींवर सोडण्यात आले. पॅलेस्तिनी जनतेसाठी कळीचे मुद्दे वगळणारा पण इस्रायलच्या अस्तित्वाला पुन्हा मान्यता देणारा ऑस्लो करार हे पीएलओने केलेल्या तडजोडींमधले पुढचे पाऊल होते.

इस्रायलने ज्या भागांमधून सैन्य हलवले त्या भागांमध्ये १९९४ साली पीएलओने स्वयंशासनाचे (म्हणजे नगरपालिकेचे) अधिकार असलेल्या पॅलेस्तिनी प्राधिकरणाची (पॅलेस्तिनिअन अथोरिटी, पीए) स्थापना केली.; पण या भागांवर सैनिकी नियंत्रण इस्रायलचेच राहिले. जानेवारी १९९६ मध्ये पॅलेस्तिनी विधानसभा आणि पीएच्या अध्यक्षपदासाठी निवडणुका झाल्या, ज्या अनुक्रमे फताह आणि यासर अराफत यांनी सहज जिंकल्या. इस्लामिक जहालवादी आणि वेस्ट बँक व गाझा पट्टीतील काही स्थानिक नेत्यांनी अराफत यांच्या नेतृत्वावर प्रश्न उपस्थित करत या वाटाघाटींना नाकारले. हमासने आपले आत्मघाती हल्ल्यांचे सत्र चालू केले.

ऑस्लो प्रक्रियेच्या अंतरिम काळात इस्रायलच्या लिकुड आणि मजूर पक्षांच्या सरकारांनी इस्रायलव्याप्त प्रदेशामध्ये रस्त्यांचे जाळे विणण्याचे काम वेगाने पुढे नेले. या रस्त्यांमुळे इस्रायली वसाहतिकांना त्यांच्या वसाहतींमधून पॅलेस्टाईनमध्ये न जाता इस्रायलमध्ये जाणे शक्य होणार होते पण पॅलेस्तिनी जनतेचे जीवन आणि दैनंदिन प्रवास मात्र असह्य करून टाकला.

२००० सालापर्यंत इस्रायलने क्रमाक्रमाने घेतलेल्या अंतरिम माघारीमुळे पॅलेस्तिनी प्राधिकरणाला ४०% वेस्ट बँकवर आणि ६५% गाझापट्टीवर पूर्ण किंवा अंशत: ताबा मिळालेला होता. पॅलेस्तिनी भूभाग हे इस्रायली भूभागांनी वेढलेले होते आणि प्रवेश व निकासावर इस्रायलचेच नियंत्रण होते.

जुलै २००० मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष बिल क्लिंटन यांनी बराक आणि अराफत यांना कँप डेविड येथे खूप काळापासून अनिर्णित असलेल्या अंतिम स्थिती कराराला निष्कर्षाप्रत आणण्यासाठी आमंत्रित केले. परंतु पूर्व जेरुसलेम आणि गाझापट्टीच्या प्रश्नावर एकमत होऊ शकले नाही.

**दुसरा इंतिफादा (अल-अक्सा)**

सप्टेंबर २००० मध्ये दुसऱ्या इंतिफादाची ठिणगी पडली. निदर्शने, दगडफेक, आणि गोळीबाराच्या काही घटनांनंतर संपूर्ण वेस्ट बँक आणि गाझा पट्टीमध्ये निदर्शने आणि झडपांचे सत्रच चालू झाले.

दुसरा इंतिफादा पहिल्या पेक्षा जास्त रक्तरंजित होता. उठावाच्या पहिल्या तीन आठवड्यांमध्ये इस्रायली पोलिसांनी निशस्त्र पॅलेस्तिनी निदर्शकांवर १० लाख जिवंत काडतुसे डागली. काही काळातच इस्रायलने बळाच्या वापरामध्ये रणगाडे, हेलिकॉप्टरभेदी बंदुका, आणि अगदी एफ-१६ विमानेही सामील केली. इस्रायली सैन्याने पॅलेस्तिनी प्राधिकरणाच्या रामाल्लाह, गाझा आणि इतर ठिकाणी असलेल्या तळांवर हल्ले चढवले. नागरी वस्त्यांवर तोफगोळ्यांचा प्रहार आणि हवाई बाँबहल्ले करण्यात आले.

नोव्हेंबर २००० मध्ये हमास व इस्लामिक जिहाद आणि नंतर पीएफएलपी व फताहशी संलग्न अल-अक्सा शहीद ब्रिगेडने आत्मघाती बाँबहल्ले व इतर लष्करी कारवाया चालू केल्या. ऑस्लो प्रक्रियेला विरोध असणाऱ्या इस्लामिक विरोधकांकडून १९९३ ते १९९९ च्या काळातील २२ घटनांच्या तुलनेत २००० ते २००५ या काळात १५० च्या वर हल्ले झाले. यानंतर २००१ साली पॅलेस्तिनी-इस्रायली वाटाघाटी सुद्धा यशस्वी झाल्या नाहीत.

पुढील दशकात लिकुड पक्षाने इस्रायली राजकारणावर वर्चस्व गाजवले. या पक्षाच्या उदयामुळे ऑस्लो 'शांतता प्रक्रिया' व्यावहारिक दृष्ट्या पूर्णपणे थांबली कारण लिकुड पक्षाने ठामपणे पॅलेस्टाईन देशाचे अस्तित्व नाकारले आणि "भूप्रदेशीय तडजोड" करण्यास नकार दिला.

**२००२ ची अरब शांती योजना**

२००२ साली बैरुत येथे अरब लीगच्या संमेलनात लिबिया सोडून सर्व अरब देशांनी सौदी अरेबिया प्रस्तावित एका शांती योजनेचा प्रस्ताव दिला. अरब देशांनी इस्रायलचे अस्तित्व या योजनेद्वारे मान्य केले पण इस्रायलने या योजनेलाही भीक घातली नाही आणि वेस्ट बँक, गाझापट्टी व पूर्व जेरुसलेमसह पॅलेस्टाईनच्या प्रस्तावाला ठोकरून लावले.

**दुभाजक कुंपण**

२००२ साली इस्रायली पंतप्रधान शेरॉन यांनी इस्रायल आणि वेस्ट बँकला वेगळे करणाऱ्या एका कुंपणाच्या बांधकामाला परवानगी दिली. पॅलेस्तिनी लोक या कुंपणाला 'वर्णद्वेषी भिंत' म्हणतात. या कुंपणामुळे समुदायांचे दोन भागांमध्ये तुकडे झाले आहेत, अगदी एकाच गावातले किंवा शहरातले प्रवासाचे मार्गही बंद झाले आहेत आणि वेस्ट बँकचा भूगोल पूर्णत: बदलून गेला आहे. या कुंपणाचा ९५ टक्के भाग हा इलेक्ट्रॉनिक तारा, गस्तीपथकांचे रस्ते आणि ३०० मीटर पर्यंत रुंद असलेल्या रस्त्यांवर उभारलेले टेहळणी मनोरे आहेत. ५ टक्के भागावर ८ मीटर उंच काँक्रीटची भिंत आहे.

वेस्ट बँकमधील डझनावरी गावांनी त्यांची शेतजमीन इस्रायलने ताब्यात घेतल्याच्या विरोधात लोकलढा उभारला आहे. गावकऱ्यांनी निदर्शने चालू केली आणि बुलडोझर्सनी भिंतीचा पाया खणू नये म्हणूनही प्रयत्न चालू केले.

पान ६ वर

# पॅलेस्तिनी लोकांचा स्वातंत्र्यलढा चिरायू होवो!

पान ५ वरून

त्यांनी झाडे तोडली जाऊ नयेत म्हणून स्वत:ला ओलिव्हच्या झाडांना साखळीने बांधून घेतले. जिथेजिथे तारांच्या स्वरुपात अडथळा होता तिथे तो तोडून टाकला, आणि जिथे भिंत होती तिथे भित्तीचित्रांच्या माध्यमातून विरोध प्रकट केला.

### २००६ मधील पॅलेस्तिनी निवडणूका आणि हमासचा उदय

जानेवारी २००५ मध्ये यासर अराफात यांच्या मृत्यूनंतर महमुद अब्बास यांची फताह पक्षाच्या समर्थनाने पॅलेस्तिनी प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. जानेवारी २००६च्या पॅलेस्तिनी विधानसभेच्या निवडणुकांमध्ये हमासला १२२ पैकी ७७ जागा मिळून बहुमत मिळाले. दुसऱ्या जागी फताह होती. फताहच्या ४१.४३ टक्के मतांच्या तुलनेत हमासला ४४.४५ टक्के इतक्या कमी फरकाचे मताधिक्य होते.

हमासच्या विजयाच्या प्रत्युत्तरादाखल अमेरिका व इतर ३ बलाढ्य राष्ट्रांच्या चौकडीने पॅलेस्तिनी प्राधिकरणाची आर्थिक मदत बंद केली. इस्त्रायलने पी.ए.तर्फे वसूल केलेला कर-महसूल रोखून धरणे चालू केले. हा कर पीएच्या अंदाजपत्रकाच्या निम्म्या रक्कमेपेक्षा जास्त होता. त्यामुळे अगोदरच कमजोर असलेल्या पॅलेस्तिनी अर्थव्यवस्थेची स्थिती अजूनच बिघडली. वेस्ट बँकमधील १,५०,००० पेक्षा जास्त पॅलेस्तिनी लोक पीएच्या वेतनपटावर आहेत आणि हजारो निवृतांचे निवृत्तीवेतनही पीए कडूनच येते. २००६ नंतर अनेकदा पीए वेळेवर किंवा पूर्ण पगार देऊ शकलेली नाही.

निर्विवादपणे मुक्त वातावरणात झालेल्या निवडणुकांमध्ये हमासला मिळालेल्या विजयाच्या वैधतेकडे दुर्लक्ष करत, अमेरिकेने महमुद अब्बास यांच्याशी एकनिष्ठ अध्यक्षीय रक्षकांची (प्रेसिडेंशीयल गार्ड) लढण्याची क्षमता वाढवण्याकरिता ८.४ कोटी डॉलर्सची मदत पुरवली. यानंतरच्या काळात अब्बास यांनी अनेकदा उघडपणे अमेरिका-इस्त्रायल धार्जिण्या भुमिका घेत व त्यांच्या मदतीने हमासची सत्ता पालटविण्याचे प्रयत्न केले आहेत.

### जेरुसलेम शहराचा प्रश्न

संयुक्त राष्ट्रांच्या १९४७च्या फाळणी योजनेने जेरुसलेमला आंतराष्ट्रीय क्षेत्र म्हणून प्रस्तावित केले. १९४८ सालच्या अरब-इस्त्रायली युद्धामध्ये इस्त्रायलने पश्चिम जेरुसलेमचा ताबा घेतला आणि जॉर्डनने (ज्यू,मुस्लिम व ख्रिश्चन धर्मस्थळांचा समावेश असलेल्या) जुन्या शहरासहीत पूर्व जेरुसलेमचा. १९४९ च्या शस्त्रसंधी रेषेने शहराचे दोन भाग केले.

जून १९६७ मध्ये इस्त्रायलने जॉर्डनपासून पूर्व जेरुसलेम जिंकून घेतले आणि लगेचच इस्त्रायलमध्ये सामील केल्याची घोषणा केली. इस्त्रायलच्या दृष्टीने जेरुसलेम ही इस्त्रायलची 'कायमस्वरुपी राजधानी' आहे, पण आंतरराष्ट्रीय समुदायापैकी बहुसंख्येच्या दृष्टीने पूर्व जेरुसलेम इस्त्रायली कब्जा असलेल्या वेस्ट बँकचा भाग आहे आणि पॅलेस्तिनींच्या दृष्टीने पूर्व जेरुसलेम भविष्यातील पॅलेस्ताईन देशाची राजधानी आहे. त्यामुळेच अमेरिकेने जेरुसलेम मध्ये आपली राजधानी हलवण्याच्या निर्णयाचा जागतिक समुदायाने तीव्र निषेध केला.

### इस्त्रायलने बळकावलेल्या पॅलेस्तिनी प्रदेशातील स्थिती

कब्जा केलेल्या वेस्ट बँक आणि गाझापट्टीतील पॅलेस्तिनी नागरिकांवर शासन करण्यासाठी इस्त्रायलने लष्करी प्रशासनाची स्थापना केली. पॅलेस्तिनी लोकांना अनेक मुलभूत राजकीय अधिकार, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संघटनेचे आणि प्रकाशनाचे असे अनेक नागरी स्वातंत्र्य नाकारण्यात आले. पॅलेस्तिनी राष्ट्रवाद हा इस्त्रायलच्या सुरक्षेला धोका आहे असे जाहीर करण्यात आले आणि अगदी पॅलेस्तिनी झेंडा फडकवणे सुद्धा शिक्षेस पात्र गुन्हा ठरवला गेला. पॅलेस्तिनी जीवनाच्या सर्व अंगांवर नियंत्रण आणि अनेकदा बंधने आली. हजारो एकर पॅलेस्तिनी जमिनींवर कब्जा करण्यात आला आहे आणि हजारो झाडे तोडण्यात आली आहेत.

वेस्ट बँक व गाझापट्टीत इस्त्रायली धोरणे आणि कृतींमध्ये संचारबंदी, घरे उध्वस्त करणे, रस्ते-शाळा-सामुदायिक संस्था बंद करणे अशा सामूहिक शिक्षांचा मोठ्या प्रमाणात वापर झाला आहे. शेकडो पॅलेस्तिनी राजकीय कार्यकर्त्यांना जॉर्डन किंवा लेबननमध्ये निष्कासित करण्यात आले आहे. १९६७ नंतर इस्त्रायलने कैद केलेल्या पॅलेस्तिनींची संख्या आता जवळपास १० लाख झाली आहे. लाखो कैद्यांना तुरुंगात डांबले गेले आहे, काहींना खटल्याशिवाय (प्रशासकीय स्थानबद्धता), आणि बहुतेक जणांना इस्त्रायली लष्करी न्यायालयांकडून. ४०% पेक्षा जास्त पॅलेस्तिनी पुरुष एकदातरी कैद झाले आहेत. १९७१ नंतर पॅलेस्तिनी कैद्यांचा छळ नित्यनियमाचा



*इस्त्रायल जगातील एकमेव देश आहे जो लहान मुलांविरुद्धही सैनिकी कायदा आणि शासन लागू करतो. दरवर्षी वय वर्षे १२ पासूनच्या जवळपास ५०० ते ७०० मुलांवर सैनिकी कोर्टांमध्ये खटले चालवले जातात*

झाला आहे. छळ किंवा दुर्लक्षामुळे डझनावरी लोकांचा कैदेत मृत्यू झाला आहे. इस्त्रायली अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की दहशतवादाला आळा घालण्यासाठी कडक कारवाई आणि मोठ्या प्रमाणात तुरुंगवास आवश्यक आहेत. इस्त्रायल जगातील एकमेव देश आहे जो जवळपास ५०० ते ७०० लहान पॅलेस्तिनी मुलांनाही सैनिकी शासन करतो!

२०१३ च्या पूर्वाधापर्यंत इस्त्रायलने पूर्व जेरुसलेम आणि वेस्ट बँकमध्ये १४५ अधिकृत आणि जवळपास १०० अनधिकृत वसाहती 'आऊटपोस्ट' स्थापल्या आहेत आणि ५,६०,००० ज्यू नागरिकांना तेथे वसवले आहे. परकीय भूमीच्या लष्करी कब्जासंदर्भात असलेल्या आंतरराष्ट्रीय कायद्यांचे आणि चौथ्या जिन्हीवा कराराचे हे सरळ उल्लंघन आहे. अनेक वसाहती तर खाजगी मालकीच्या पॅलेस्तिनी जमिनींवर कब्जा करुन स्थापल्या आहेत.

१९४८ साली निम्यापेक्षा जास्त अरब लोकांनी पॅलेस्ताईन सोडण्याच्या घटनेला नक्बा म्हणतात. अलिकडच्या काळात इस्त्रायलमध्ये नक्बाचे स्मरण करणे बेकायदेशीर ठरवण्यात आले आहे

आंतरराष्ट्रीय दबावामुळे २००५ साली इस्त्रायली सरकारने गाझापट्टी रिकामी करण्याचा निर्णय घेतला आणि जवळपास ७,८०० ज्यू स्थायिकांना इस्त्रायलमध्ये परत आणले. पण यानंतरही इस्त्रायलने गाझापट्टीमध्ये मालवाहतूक आणि लोकांच्या येण्याजाण्यावर, तसेच किनारपट्टी आणि हवाई क्षेत्रावर नियंत्रण कायम ठेवले आहे.

आज पॅलेस्तिनी नागरिक त्यांच्याच देशात निर्वासित आहेत. पॅलेस्तिनी भूमीची अवस्था नकाशात (२००९ सालचा भाग) दाखवल्याप्रमाणे अतिशय छिन्नविछिन्न- इस्त्रायली भूमीतील काही तुकडे- अशी झाली आहे. देशातील एका भूभागातून दुसरीकडे जाण्यासाठी त्यांना इस्त्रायलचे परवाने काढावे लागतात.

आज जवळपास १४ लाख पॅलेस्तिनी लोक इस्त्रायलचे नागरिक आहेत आणि १९४९ सालच्या शस्त्रसंधी सीमेच्या आत रहातात. हे पॅलेस्तिनी लोक इस्त्रायली लोकसंख्येच्या २० टक्के भाग आहेत. इस्त्रायलमधील अरब लोकांचे स्थान हे दुय्यम नागरिकाचे आहे कारण इस्त्रायल स्वत:ची ओळख ज्यू-राष्ट्र व ज्यूंचे राष्ट्र म्हणून करुन देतो. २६ लाख लोक वेस्ट बँक मध्ये राहतात (यात पूर्व जेरुसलेम मधील २ लाख सामील आहेत) आणि १६ लाख गाझा पट्टी मध्ये राहतात. राहिलेले जवळपास इतर ५६ लाख विस्थापित पॅलेस्तिनी लोक त्यांनी मानलेल्या पॅलेस्ताईनच्या राष्ट्रीय भूमीला सोडून इतर देशांमध्ये राहतात.

### पॅलेस्तिनी प्रश्नाची वर्गीय बाजू

पॅलेस्तिनी लोकांची बाजू घेणारी माध्यमे सुद्धा पॅलेस्तिनी प्रश्नाला असलेली वर्गीय बाजू विसरतात. पॅलेस्तिनी लोकांमध्ये सुद्धा कष्टकरी आणि उत्पादन साधनांच्या मालकांमध्ये वर्ग-विग्रह झालेला आहे आणि तो राजकारणात स्पष्ट दिसून येतो.

इस्त्रायलच्या कब्जाचा सर्वाधिक त्रास जर कोणाला होत असेल तर तो गाझा, वेस्ट बँक, इतर अरब देशांमध्ये असणाऱ्या बहुसंख्य कष्टकरी लोकांना. दैनंदिन कामासाठी जेव्हा इस्त्रायली सैन्याकडून अवहेलना होते किंवा हल्ले होतात तेव्हा सर्वाधिक बळी जातात ते गरीब वर्गातील लोकांचेच. इस्त्रायली कब्जामुळे रोजगाराची निर्मिती अतिशय कमी आहे. सर्व दैनंदिन गरजांसाठी इस्त्रायलच्या मर्जीवर अवलंबून रहावे लागते. जागतिक बँकेच्या एका अहवालानुसार गाझापट्टीमध्ये (इस्त्रायलच्या वेढ्यामुळे) बेरोजगारीचा दर जगातील सर्वाधिक असा ४३% आहे.

पॅलेस्ताईन मध्ये मात्र एक असाही लोकसमुह आहे ज्याच्याकडे संपत्ती आहे, तो व्यापार करतो आणि जगाशी संबंध ठेऊन असतो. व्यापारी, छोटे उद्योगपती, जमीनदार आणि मध्य-पूर्वेतील देशांमध्ये व्यापार असलेल्या पॅलेस्तिनी बुर्झ्वा वर्गाने इस्त्रायली वसाहतवाद्यांशी तडजोड करुन आपल्या हितांचे रक्षण करण्याचे काम चालवले आहे. त्यांना व्यापारासाठी इस्त्रायलकडून हवे असलेले परवाने, सरकारी ठेके आणि सुविधा मिळवण्यासाठी ही तडजोड कामी येते. अर्थातच याच्या बदल्यात इस्त्रायली कब्जाला ते एकाप्रकारे मजबूतही करतात.

पीएलओमधील फताह या गटाने प्रचंड तडजोडी केल्या आहेत आणि मवाळ भुमिका घेतल्या आहेत. फताहला तर इस्त्रायलचे पिल्लू म्हटले जाते आणि त्यांच्या कमजोरीसाठी नेते महमूद अब्बास आणि भ्रष्टाचाराला कारणीभूत ठरवले जात आहे. परंतु असे म्हटल्याने फताहच्या सामाजिक आधाराकडे दुर्लक्ष केले जाते. वस्तुस्थिती ही आहे की फताह आणि अबास हे पॅलेस्तिनी बुर्झ्वांचे प्रतिनिधित्व करतात. इस्त्रायली झायोनिस्टांना हवी असलेली मैत्री ते करत आहेत. ऑस्लो करार करण्यामागे इस्त्रायलचा डावही हाच होता की पॅलेस्तिनी अर्थव्यवस्थेवर ताबा मिळवावा, आणि पॅलेस्तिनी बुर्झ्वा वर्गाला नाममात्र स्वायत्तता देऊन त्यांच्याशी नाते जोडले जावे. स्थानिक धनिकांनी इस्त्रायली आणि इतर विदेशी भांडवलदारांसोबत हात मिळवून इस्त्रायल-व्याप्त पॅलेस्तिनी भूमीमध्ये सुद्धा नव-उदारवादी आर्थिक धोरणे राबवणे गेली काही वर्षे चालू आहे. यातून पॅलेस्तिनी बुर्झ्वा श्रीमंत होत आहेत.

पॅलेस्ताईन मध्ये डाव्या विचारांचे प्रतिनिधित्व करणारी पिपल्स फ्रंट फॉर लिबरेशन ऑफ पॅलेस्ताईन (पीएफएलपी) नेहमीच वैचारिकदृष्ट्या कमजोर राहिली आहे. मार्क्सवाद-लेनिनवादापासून प्रेरणा घेणारी ही संघटना कधी काळी फताहच्या खालोखाल दुसऱ्या क्रमांकाची ताकद होती. परंतु वैचारिक कमजोरींमुळे ते आपला आधार वाढवू शकले नाहीत. काळाच्या ओघात त्यांच्यात फूटी पडल्या आणि संघटना जवळपास नामशेष झाली आहे. पीएलओच्या तडजोडवादी भुमिका, हमास या इस्लामिक मूलतत्ववादी संघटनेच्या वाढीचे एक कारण डाव्या चळवळीचा आधार कमजोर असणे हे पण आहे.

अरब राष्ट्रांनीही पॅलेस्तिनी चळवळीमध्ये आपले हित पाहिले आहे. यापैकी अनेक राष्ट्रे तर आज अमेरिका आणि इस्त्रायलसोबत व्यापारी संबंध जपण्याकडे जास्त लक्ष देत आहेत. या देशांमधील राज्यकर्ता वर्ग सुद्धा आता जागतिक साम्राज्यवादाचा साथीदार बनला आहे आणि पॅलेस्तिनी जनतेच्या संघर्षाशी फक्त तोंडदेखले नाते तो सांगत आहे. जगातील भारतासारखे इतर देश ज्यांनी अनेक काळ पॅलेस्तिनी जनतेला मोठी साथ दिली, आज जागतिक साम्राज्यवादाशी हातमिळवणी करुन इस्त्रायलसोबतही व्यवस्थित संधान साधून आहेत.

पॅलेस्तिनी लोकांच्या अतिशय पिचलेल्या स्थितीत, एका योग्य डाव्या पर्यायाच्या अभावी, हमास या मूलतत्ववादी चळवळीचा विस्तार झाला आहे. त्यांनी लोकांमध्ये शैक्षणिक, वैद्यकीय आणि कृपाळू संस्थांच्या माध्यमातून आपले एक जाळे विणले आहे. लोकांच्या मनातील पीएलओच्या दगाबाजीच्या रागाला कल्याणकारी काम आणि आक्रमक पवित्र्याने मोठ्या संख्येने हमासकडे वळवले आहे. एका खऱ्या क्रांतिकारक शक्तीच्या अभावामुळे पॅलेस्तिनी लोकांना हमास आणि हिजबोल्ला सारख्या संघटनांकडे वळण्यावाचून पर्याय राहिलेला नाही. पहिल्या इंतिफादाच्या वेळी डाव्या शक्तींनी आपला आधार मजबूत न करणे हे पॅलेस्तिनी चळवळीसाठी मोठे अपयश राहिले आहे.

### पॅलेस्तिनी जनतेच्या लढ्याला पाठिंबा द्या!

आज जागतिक स्तरावर पॅलेस्ताईन सहित सर्व राष्ट्रीय प्रश्न हे जागतिक साम्राज्यवादाशी जोडले गेले आहेत. आज सर्वच देशांतील बुर्झ्वा वर्गाने साम्राज्यवादाशी तडजोड केलेली असल्यामुळे राष्ट्रीयत्वाच्या मागणीला तो खऱ्या अर्थाने पुढे नेऊ शकत नाही. हे काम आता फक्त एका खऱ्या कामगारवर्गीय लढ्यातूनच होऊ शकते. पॅलेस्तिनी जनतेच्या धिरोदात्त लढ्याला जगातील कामगार वर्गाने नेहमीच भक्कम पाठिंबा दिलेला आहे आणि यापुढेही राहील!

# गुजरात निवडणुक आणि त्यानंतर...

पान १ वरून

इतिहास विसरुन चालणार नाही, जो सांगतोय कि भाजप सत्तेत नसला तरीही फासिस्तांचा उत्पात चालूच राहील. ही सडू लागलेली जखम ऑपरेशन करून कापून काढल्याशिवाय नष्ट होणार नाही. जोपर्यंत भांडवलशाही आहे तोपर्यंत फासीवाद राहीलच. फासिस्तांना मागे रेटायला रस्त्यावरचे लढाऊ आंदोलन उभे करायला हवे आणि समोरासमोरची भिडत करण्यासाठी सदैव तयार रहायला हवे. कष्टकऱ्यांची तयारी आणि संघटनेशिवाय हे काम होणार नाही. फासीवाद निम्न मध्यम वर्गाचे घोर प्रतिक्रियावादी आंदोलन आहे ज्याला कार्यकर्त्यांची फळी असलेली पार्टी संघटीत करते व नेतृत्व देते. याला कार्यकर्त्यांच्या फळीची रचना असलेल्या क्रांतिकारी संघटनेच्या नेतृत्वात क्रांतिकारी सामाजिक आंदोलन उभे करूनच मागे ढकलता येईल. नक्कीच हे काम खूप कठीण व दीर्घकालिक आहे, पण म्हणून सोप्या उपायांवर आशा ठेवून मनाला खोटा धीर देण्यात काहीच हशील नाही. मागील ६५ वर्षांच्या इतिहासानंतरही बुर्जुवा निवडणुकांकडून न्यायाची अपेक्षा ठेवणाऱ्या देशातील प्रगतीशील बुद्धीजीवींमध्ये भांडवली संसदीय लोकशाही बाबत अजूनही कितीतरी मोह आणि भ्रम शिल्लक आहे. सामान्य कष्टकरी जनतेने अनुभवातून हे जाणून घेतले आहे की निवडणुकीतून तिच्या जगण्यात काहीही मुलभूत बदल होणार नाही. पण ही सभ्य लोकं मात्र अजूनही निवडणुकीतूनच फासीवादाला पराभूत करण्याची आस लावून बसले आहेत. संसदीय निवडणुकांमध्ये सगळ्या गोष्टी थैलीच्या ताकदीवर ठरतात आणि भारतीय भांडवलदारांसाठी आजही पहिला पर्याय भाजपच आहे, कारण पाशवी दमन आणि जनतेला विभाजित करून नव-उदारवादी धोरणांना राबवण्यासाठी अधिक तयार व सक्षम पार्टी तीच आहे. उगाच नाही कार्पोरेट घराण्यांनी कायदेशीर रित्या शेकडो कोटी रुपये या पार्ट्यांना दिलेले! एकट्या भाजपलाच ८९ टक्के पैसे मिळालेत तर बाकीचे पैसे इतर बुर्जुआ पक्षांमध्ये वाटप झालेत. (सांगायची गरज नाही कि पडद्याच्या मागे दिल्या जाणाऱ्या मदतीचा हा एक छोटासा हिस्सा आहे).

दुसरे असे कि क्रांतिकारी वर्गराजकारण जर तितक्या दमदार पणे उपस्थित नसेल तर जात-धर्म व अंधराष्ट्रवादासहित अनेको मुद्यांना उगाळून भाजपाचे पुढे जाणं खूप स्वाभाविक आहे. याशिवाय फासिस्त शक्ती या बुर्जुआ लोकशाहीचा उपयोग करण्यासाठी तिच्या सगळ्या रिती-भातीला, संविधान वगैरेला धाब्यावर बसवून ना केवळ नोकरशाही आणि गुप्तचर विभागाला, तर न्यायपालिका आणि निवडणूक आयोगासारख्या संस्थाना सुद्धा आपला नोकर बनवतात. कुठल्याही थराला जावून तीन-तिकडम करण्यात त्यांना संकोच नसतो. अशा स्थितीत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमध्ये गडबड आणि हॅकिंगचे जे आरोप अनेकांनी तथ्यांसहित लावले आहेत, त्यांना तसंच सोडून देता येणार नाही. २००२ मध्ये गुजरातमधील हत्याकांडाच्या वेळेपासून असे अनेक शोध-अभ्यास झाले आहेत, ज्यातून स्पष्ट दिसतं कि कशा पद्धतीने भाजपाने गुजरातमधील व्यापारी, शहरी मध्यमवर्ग आणि श्रीमंत शेतकऱ्यांमध्ये आपल्या आधाराचा विस्तार करण्यासाठी, गेल्या काही वर्षात दलित आदिवासींच्या व इतर मागास जातीतील एका मोठा हिश्शाचे साम्प्रदायिकीकरण केलं होतं आणि याच घटकांमधील तरुणांतून फासिस्त गुंडांची भरती केली होती. हा पैलूसुद्धा विसरता कामा नये.

मोदीराजपासून सुटका व्हावी म्हणून काँग्रेसकडे डोळे लावून बसलेल्या आणि राहुल गांधींना घेवून खूप भाव-विव्हळ होत असलेल्या, तसेच जनतेपासून तुटलेल्या तथाकथित धर्मनिरपेक्ष आणि प्रगतीशील सभ्यजणांना सगळे माहिती असूनही ते विसरू पाहताहेत कि ज्या नवउदारवादी धोरणांनी हिंदुत्ववादी फासिवादाला सुपीक जमीन तयार केली आहे, त्यांना लागू करण्याची सुरुवात तर काँग्रेसनेच केली होती. त्यांच्याच काळात या धोरणांना बहर आला होता. काँग्रेसच बुर्जुआ वर्गाची मुख्य पार्टी राहिली आहे आणि आजही दुसऱ्या क्रमांकाचा पर्यायही तोच आहे. याच सरकारने तर भांडवलदार वर्गाची ऐतिहासिक गरज म्हणून त्या वर्गाच्या व्यवस्थापकीय समितीचे काम करत नव-उदारवादी धोरणांना बेधडक लागू केले आहे.आता इतिहासाची चाकं मागे फिरवून ती पुन्हा नेहरूवादी 'समाजवाद'च्या राजकीय एकाधिकारी भांडवलशाही प्रारुपाकडे आणि कल्याणकारी राज्याच्या उदाहरणांकडे परत जाऊ शकत नाही. ती जरी सत्तेवर आली तरी याच आर्थिक धोरणांना दमनकारी रीतीने लागू करणार आणि यातून निर्माण होणाऱ्या संकटाचा फायदा उचलत त्या जमिनीवर फासिस्त शक्ती आपलं काम करत राहणार. हेही विसरता कामा नये कि काँग्रेसचा धर्मनिरपेक्षतावाद सुद्धा नेहमी विकृत-विकलांग आणि सडक्या खिचडीसारखा राहिला आहे. धर्माचे निवडणूक कार्ड खेळण्याचं व जहाल हिंदुत्वाच्या तुलनेत नरम हिंदुत्वाची दिशा घेण्याचं काम ती सतत करत आली आहे. राम मंदिराचे कुलूप खोलणे, शाहबानो खटल्यात प्रतिगामी भुमिका घेणे, बाबरी मशिदीचा विध्वंस करण्यापासून ते या गुजरात निवडणुकीत स्वत:ला शिव भक्त आणि जानवेधारी ब्राह्मण घोषित करून मंदिर मंदिर फिरण्याचे हे सत्र काँग्रेसच्या भगव्या दिशेला एकदम नग्न करायला पुरेसे आहे. पण काँग्रेसींना हे समजत नाही कि भाजपा फक्त तिच्या भगव्या दिशेमुळेच यशस्वी होत नाहीये. मुख्य गोष्ट आहे तिच्याकडील फासिस्त पक्षाची कार्यकर्त्यांच्या फळीवर आधारित, आर.एस.एस.ची संरचना आणि घोर प्रतिक्रियावादी सामाजिक आंदोलनाची ताकद. अशी संरचना जी काँग्रेसकडे नाही आणि असणारही नाही.

भारतातील डावे पक्ष तर इतके कनवाळू झालेत कि काँग्रेस वा इतर स्थानिक पक्षांशी आघाडी बनवून निवडणुकीत भाजपला हरवण्याशिवाय दुसरा विचारच करू शकत नाहीत. काँग्रेस बाबत तर आपण वर बोललो आहोतच, राहता राहिला प्रश्न इतर स्थानिक पक्षांचा तर भाजपाला विरोध करता करता कोण कधी उडी मारून भाजपच्या मांडीवर जाऊन बसेल सांगता येत नाही. भारतातील संसदमार्गी डाव्यांचं वागणं तसंच आहे, जसं १९२०-१९३० च्या दशकात संसदमार्गी कौत्स्कीपंथी सामाजिक लोकशाहीवादी पार्ट्यांचं जर्मनी व युरोपात असायचं. तिथे जेव्हा फासिस्त सत्तेत आले तेव्हा संसदमार्गी सामाजिक लोकशाहीवादींना सुद्धा त्यांनी सोडलं नाही. भारतातील संसदीय डाव्यांनाही लक्षात ठेवावं लागेल कि फासिझमच्या वरवंट्याखाली येण्यापासून तेही तेव्हाच वाचतील जेव्हा निवडणूकीचं राजकारण आणि चिल्लर अर्थवादी कवायती करण्यापासून फारकत घेत, रस्त्यावर उतरून कामगारांना या फासिवादाच्या विरोधात रस्त्यावरची लढाई करण्यासाठी तयार व संघटीत करतील. जर ते तसं करतील तर सर्व वैचारिक मतभेद कायम ठेवून क्रांतिकारी डाव्यांना त्यांच्या सोबत मोर्चा बनवून उभे रहायला हवे. पण या पार्ट्यांचे नेते आणि बहुतेक कार्यकर्ते सुद्धा लढाऊ, कर्मठ आणि कठोर जीवन जगण्याची सवय घालवून बसले

उदारमतवादाचा संक्षिप्त इतिहास




आहेत. त्यांच्याकडून ही अपेक्षा पुरी होईल असे वाटत नाही.

थोडा जरी इतिहास माहिती असेल तर ही गोष्ट पक्की लक्षात ठेवायला हवी कि फासिवादाशी लढण्याचा प्रश्न निवडणुकीतील जय-पराजयचा प्रश्न नाही. या घोर प्रतिक्रियावादी सामाजिक आंदोलनाचा सामना केवळ एक लढाऊ क्रांतिकारी डावे आंदोलनच करू शकेल.

इतिहास साक्षी आहे की कामगार वर्गाला राजकीयदृष्ट्या सचेत व सक्रीय केल्याशिवाय फासिवादाच्या या लाटेचा मुकाबला करता येणार नाही. निवडणुकबाज डाव्यांनी या दिशेने काहीच केले नाही, उलट आर्थिक लढे व सौदेबाजी करण्यात गुंतवून कामगारांच्या राजकीय चेतनेला बरबाद करण्याचंच काम केलं आहे. विखुरलेल्या क्रांतिकारक गटांचा कामगारांवर नगण्य प्रभाव आहे, आणि तेही लढाऊ अर्थवाद आणि स्वत:स्फुर्ततावादात फसले आहेत. त्यांचा एक प्रभावी हिस्सा डाव्या दु:साहसवादात रुतला आहे. उरलेले भारतीय समाजाच्या चुकीच्या समजदारीच्या (नवजनवादी क्रांतीचा टप्पा) आधारावर मालक शेतकऱ्यांची लढाई लढत आहेत, भूमी वितरणाच्या जुन्याच मागणीमध्ये अडकलेत, आणि व्यवहारात मात्र नरोदवादी आचरण करत आहेत. कामगार वर्ग त्यांच्या अजेंड्यावरच नाही. जिथवर प्रश्न असंघटीत कामगारांच्या मोठ्या संख्येचा येतो तिथवर तर कुणाचंही काम नगण्य आहे. याचा फासिवाद्यांना बराच फायदा होतोय.

एकूणच काय, भाजपचं निवडणुकीतील यश हे भारतीय राजकारणात संघ परिवाराच्या हिंदुत्ववादी फासीवादी राजकारणाचा प्रचंड उभार झाल्याचे एक महत्वाचे निर्देशक आहे, पण हे अजिबात समजू नये कि काँग्रेस आणि काही स्थानिक बुर्जुआ पक्षांनी काही ताळमेळ बसवून एखाद्या निवडणुकीत भाजपला हरवले वा २०१९ ची निवडणूक जिंकून काँग्रेस आघाडी पुन्हा सत्तासीन झाली म्हणजे हिंदुत्ववादी फासीवादी लाट मागे ढकलली जाईल. संसदीय निवडणुकांमध्ये हरवून नाही तर व्यापक कष्टकरी समुदायाला मोर्चाबद्ध करून रस्त्यावरच्या आर-पारच्या लढाईतच फासिवादाला निर्णायक मात दिली जाऊ शकते.

भाजपा हिंदुत्ववादाची फक्त एक संसदीय आघाडी आहे. हिंदुत्ववाद कुठल्याही फासीवादी आंदोलनासारखेच अत्यंत प्रतिक्रियावादी सामाजिक आंदोलन आहे. हे मुख्यतः मध्यवर्गाचे सामाजिक आंदोलन आहे, ज्याच्या सोबतीला उत्पादनापासून बेदखल कामगार सुद्धा आहेत आणि ज्याला लहान-मोठ्या कुलक-शेतमालक बहुसंख्येचे – म्हणजे बुर्जुआ सत्तेच्या सर्व छोट्या-मोठ्या बहुसंख्येचे – समर्थन प्राप्त आहे. संघ परिवाराची कार्यकर्त्यांची फळी आधारित संघटनात्मक संरचना या प्रतिक्रियावादी सामाजिक आंदोलनाचे अग्रदल आहे. याला जोरदार विरोध एक क्रांतिकारी सामाजिक आंदोलनच करू शकते, ज्यावर कामगार वर्गाच्या क्रांतिकारी राजकारणाचे वर्चस्व एका केडर आधारित संघटनात्मक रचनेच्या माध्यमातून प्रस्थापित झाले असेल. हि लढाई कशी असेल हे समजण्यासाठी जर याची तुलना सैनिकी युद्धासारख्या संघर्षाशी केली तर म्हणता येईल कि हे गनिमी काव्याचे युद्ध वा चलायमान युद्धा सारखे नसून मोर्चा बांधून लढल्या जाणाऱ्या लढाई सारखे असेल. फासिस्तांनी विभिन्न सामाजिक-सांस्कृतिक संस्थेंच्या रुपामध्ये समाजात आपली खंदके खोदून व बंकर बांधून ठेवली आहेत. आपल्यालाही आपली खंदके खोदावी लागतील आणि बंकर बनवावे लागतील. नि:संशयपणे हे काम कष्टकरी जन समुदायाच्या राजकीय आणि आर्थिक संघर्षासोबत होईल आणि कामगार वर्गाच्या राजकारणाचं केंद्र जर संघटीत असेल, तर रणकौशल्याच्या स्थरावर बुर्जुआ संसदीय निवडणुकीच्या मैदानातही फासिस्तांशी भिडता येवू शकते. पण हा भ्रम बाळगणे आत्मघात ठरेल की निवडणुकीतील विजयाद्वारे फासिस्तांना मागे ढकलता येईल. कष्टकरी जनसमुदायाच्या (शहर व गावातील सर्वहारा आणि अर्ध-सर्वहारा ) सर्व हिश्शांचा फासीवाद विरोधी सामुहिक मोर्चा हि आजची सर्वात मोठी गरज बनली आहे. या नंतरच निम्न-मध्यम वर्गाच्या मूलगामी, धर्मनिरपेक्ष घटकांना, विशेषकरून विद्यार्थी-युवकांच्या लढाऊ संख्येला मजबुतीने सोबत घेतले जाऊ शकते. बुर्जुआ वर्गाचा कोणताही हिस्सा व कोणतीही पार्टी फासीवाद विरोधी संघर्षात कष्टकरी जनतेची व्युव्हरचनात्मक मित्र बनू शकत नाही.

येणारा काळ कष्टकरी जनता व क्रांतिकारी शक्तींसाठी कठीण आणि आव्हानांनी भरलेला असेल, आपल्याला फक्त राज्यसत्तेच्या दमनालाच नव्हे तर फासीवादी गुंडांच्या टोळ्यांचा देखील सामना करायला तयार राहावे लागेल. मार्ग फक्त एकच आहे, आपल्याला जमिनीवर राहून गरीब आणि कामगारांमध्ये आपला आधार मजबूत बनवावा लागेल. विखुरलेल्या कामगारांच्या संख्येला लढाऊ युनियनमध्ये संघटीत करण्यासोबतच त्यांचे विभिन्न प्रकारचे जनसंगठन, मंच, लढाऊ स्वयंसेवक दस्ते, इत्यादी तयार करावे लागतील. आज ज्या डाव्या लोकशाहीवादी शक्ती वास्तवात फासीवादी आव्हानाशी लढण्याची हिम्मत आणि दम बाळगतात, त्यांना एकजूट होवून पुढे यावे लागेल. आपल्याला विसरून चालणार नाही की कामगारांच्या मजबूत पोलादी मुठीनेच नेहमी फासिवादाला नेस्तनाबूत केले आहे. येणाऱ्या काळातही याला अपवाद नसेल,पण त्यासाठी जरुरी आहे कि सोप्या उपायांच्या भ्रमातून आपण मुक्त व्हावे आणि आपल्या भरपूर ताकदीनिशी लढाईच्या तयारीला लागावे.

'कामगार बिगुल' ची वेबसाइट
www.marathi.mazdoorbigul.net
फेसबुक पेज
www.facebook.com/kamgarbigul

# फासीवाद म्हणजे काय आणि त्याविरुद्ध लढायचे कसे?

**गेल्या काही वर्षांपासून चालू असलेल्या खोल आर्थिक मंदीमुळे एकीकडे लाखो लोकांना आपला रोजगार गमवावा लागत असताना बहुतेक देशांमध्ये एक तर फासीवादी पक्ष सत्तेत आले आहेत किंवा बळकट तरी झाले आहेत. (जसे आपल्या देशात फासीवादी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे निवडणूकांमध्ये प्रतिनिधित्व करणारा भाजप) असे पक्ष सत्तेत येताच कामगारांच्या अधिकारांवर जोरदार हल्ला चढवतात आणि कॉर्पोरेट घराण्यांचा नफा वेगाने वाढविणारी धोरणे बनवतात. जर्मनीत हिटलर आणि इटलीमध्ये मुसोलिनी यांना आपण इतिहासातील फासीवादाचे जनक म्हणून ओळखतो. त्यांनी लाखो-कोट्यावधी निर्दोष माणसांची कत्तल केली आणि आजसुद्धा तमाम फासीवादी त्यांना आपले गुरू मानतात. अशा परिस्थितीत, आर्थिक अरिष्ट किंवा मंदी म्हणजे नेमके काय असते, ती फासीवादाला कसा जन्म देते, फासीवाद कसा ओळखावा आणि त्याच्याशी लढण्याचा खरा मार्ग कोणता, यांसारख्या गोष्टी समजून घेणे गरजेचे आहे.**

**एखादा फासीवादी पक्ष सत्तेत असतो तेव्हाच फासीवादाचा धोका असतो, आणि फासीवादी पक्ष सत्तेतून बाहेर पडताच फासीवादाचा धोका टळतो, असे मानणाऱ्या लोकांची संख्या कमी नाही. २००९ च्या लोकसभा निवडणूकीत जेव्हा लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्त्वातील भाजपाचा पराभव झाला होता, तेव्हा अनेकांचा असा गैरसमज झाला होता की फासीवादाचा धोका आता टळलेला आहे. त्यांचा समज किती बालीश होता हे स्पष्ट झालेच आहे, व आता फासीवादाचा धोका सर्वांत भयंकर रूपात आपल्या डोक्यावर घिरट्या घालीत आहे. फासीवाद म्हणजे काय? हे समजून घेतल्याशिवाय आपण काही झाले तरी त्यांच्या विरोधात लढण्याचा प्रभावी मार्ग शोधून काढू शकत नाही. त्याच्या सर्वच सामाजिक-आर्थिक-राजकीय-सांस्कृतिक पैलूंची योग्य जाणीव विकसित करूनच आपण त्याला पराभूत करण्याचा एक व्यावहारिक कार्यक्रम आखू शकतो. २००९ मध्ये जे लोक म्हणत होते की फासीवादाचा धोका आता टळला आहे तेच लोक २०१४ मध्ये मोदी सत्तेवर येताच रडू-विव्हळू लागले आणि फासीवाद फासीवाद म्हणून ओरडू लागले आहेत. त्यांच्या मते भाजप सत्तेत असला, तर फासीवादाचा धोका असतो आणि जर भाजप सरकार बनवू शकला नाही तर फासीवादाचा धोका टळतो! फासीवादाची एवढी बालीश समज असल्यामुळेच हे लोक फासीवादाला पराभूत करण्याचा जो कार्यक्रम तयार करतात तोसुद्धा विसंगतींनी भरलेला असाच असतो. महागठबंधन किंवा व्यापक डाव्या आघाडीच्या बळावर फासीवाद संपवण्याची योजना बनवणाऱ्या डॉन क्विहोतेंची सध्या कमी नाही. ते फक्त निवडणूकीच्या माध्यमातून फासीवादाला पराभूत करण्याचे शेखचिल्लीचे स्वप्न पाहत आहेत. परंतु हे खरेच शक्य आहे का? निवडणूकीच्या माध्यमातून फासीवाद संपवला जाऊ शकतो का?**

**या प्रश्नावर गंभीरपणे विचार करणे व फासीवाद विरोधी लढ्याला योग्य दिशा देणे आज गरजेचे आहे. अशा वेळी, हा दीर्घ लेख फासीवादाची एक सुस्पष्ट समज निर्माण करण्यास वाचकांना साहाय्यक ठरेल, असे आम्हाला वाटते. हा लेख फासीवाद निर्माण होण्याच्या आर्थिक-राजकीय कारणांवर विस्ताराने चर्चा करतो, जर्मनी आणि इटलीमधील फासीवादाच्या इतिहासाचे विश्लेषण करून महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढतो, भारतातील सर्वांत मोठी फासीवादी शक्ती असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची एकंदर जन्मकुंडली मांडतो आणि शेवटी फासीवादाशी लढण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यावहारिक कार्यक्रम सादर करतो. फासीवादाच्या निरनिराळ्या सैद्धांतिक पक्षांवरही हा लेख प्रकाश पाडतो व इतिहासात केल्या गेलेल्या सैद्धांतिक चुकांची समीक्षासुद्धा करतो.**

**हा निबंध सर्वप्रथम २००९ साली कामगारांसाठी प्रसिद्ध होणाऱ्या मजदूर बिगुल या मासिक वृत्तपत्रात सहा भागांमध्ये प्रसिद्ध झाला होता. हा निबंध मुळात हिंदीत लिहिला गेला होता व या लेखाने मांडलेल्या प्रस्थापनांना गेल्या पाच वर्षांतील घटनाक्रमाने योग्य सिद्ध केले आहे.**

**संपादक**

भाग - ६
लेखक : अभिनव
मराठी अनुवाद : अमित शिंदे

## फासीवादाचा सामना कसा कराल ?

इटली, जर्मनी आणि भारतामध्ये फासीवादाची उत्पत्ती आणि त्याचा विकास ह्यांचे ऐतिहासिक विश्लेषण केल्यानंतर आपण फासीवादाच्या उद्याच्या सर्वसामान्य ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय कारणांचा उहापोह केला. ह्यातून एक सामान्य निष्कर्ष म्हणून हे सत्य समोर येते की भांडवली संकट क्रांतिकारी आणि प्रतिक्रियावादी अशा दोन्ही शक्यतांना जन्म देते. जर एखाद्या समाजात ह्या क्रांतिकारी शक्यतांना मूर्त रूप देण्यास सक्षम अशी अनुभवी आणि विवेकी क्रांतिकारी पार्टी अस्तित्वात नसेल, आणि फासीवादी शक्तींनी समाजात खोलवर घुसखोरी केलेली असेल तर प्रतिक्रियावादी शक्यता सुद्धा प्रत्यक्षात येऊ शकते. जर्मनी आणि इटलीमध्ये हेच झाले होते आणि एका प्रकारे भारतामध्ये सुद्धा भगव्या फासीवादी उत्थानामागे एक मोठे कारण क्रांतिकारी नेतृत्वकारी शक्तीची अनुपस्थिती हे आहेच. ह्यावर आपण वरच विस्तारपूर्वक भाष्य केले आहे. आपण लक्षात घेतलेली दुसरी गोष्ट, ती म्हणजे कामगार आंदोलनामध्ये सामाजिक-लोकशाहीवाद्यांकडून झालेला विश्वासघात हेही आहे, ज्यामुळे थांबवता येऊ शकत असलेले फासीवादी उत्थान थांबवणे कठीण होऊन बसले. अर्थातच हे दुसरे कारण पहिल्या कारणाशी घट्ट जोडले गेले आहे. भांडवली संकटाच्या काळात कामगार आंदोलनाचे नेतृत्व जर क्रांतिकारी विकल्प न देता संपूर्ण आंदोलनास सुधारवाद, अर्थवाद, अराजक संघाधिपत्यवाद आणि ट्रेड युनियनवादाच्या चौकटीत बंदिस्त करणार असेल तर भांडवली व्यवस्था तिच्या नैसर्गिक गतीने तिच्या सर्वात प्रतिक्रियावादी हुकुमशाहीकडेच कूच करेल. असे म्हटले तर वावगे ठरणार नाही की एक संघटीत व मजबूत, परंतु अर्थवादी, सुधारवादी आणि ट्रेड युनियनवादी कामगार आंदोलन भांडवलशाहीला तिच्या संकट काळात वेगाने फासीवादाकडे घेऊन जाते (जर्मनी आणि इटलीमधील फासीवाद्यांच्या उत्थानाबद्दल केलेले विश्लेषण बघा). तिसरी गोष्ट म्हणजे, जरी हे सत्य असले की फासीवाद वास्तवामध्ये मोठ्या भांडवलदार वर्गाची सेवा करतो, पण हे सत्य नाही की ह्याचा सामाजिक आधार फक्त मोठ्या भांडवलदार वर्गापुरताच मर्यादित असतो. मोठ्या भांडवलदार वर्गाला कामगार आंदोलनाचा दबाव मोडून काढण्यासाठी एका अशा शक्तीची गरज असते जिचा जनाधार व्यापक असेल. फासीवाद्यांच्या रुपात त्यांना ती शक्ती मिळते. भांडवली संकट मोठ्या प्रमाणात शहरी आणि ग्रामीण निम्न भांडवलदार वर्ग आणि मध्यम वर्गाला उध्वस्त करून असुरक्षितता आणि अनिश्चिततेच्या परिस्थितीमध्ये पोहचवते. दिशाहीन शहरी बेरोजगार तरुणांमध्ये आणि शहरी आणि ग्रामीण निम्न भांडवली वर्गामध्ये फासीवादी शक्ती प्रचार करतात आणि त्यांच्या डोक्यात अल्पसंख्यांक आणि संघटीत कामगार आंदोलनाच्या विरुद्ध विष पेरतात. असुरक्षितता आणि अनिश्चितता ह्यामुळे बेहाल झालेल्या निम्न-भांडवलदार वर्गामध्ये प्रतिक्रियावादाची जमीन अगोदरच अस्तित्वात असते आणि तो वर्गही फासीवाद्यांच्या प्रचाराचा बळी ठरतो. फासीवाद ग्रामीण आणि शहरी मध्यम वर्गांमध्ये, निम्न-भांडवलदार वर्ग आणि लंपट सर्वहारा वर्गाच्या जीवनातील दिशाहीनता, हताशा, लक्ष्यहीनता आणि सांस्कृतिक मागासलेपणाचा फायदा उठवत दीर्घ तयारीनिशी त्यांच्यामध्ये आधार तयार करतो. या प्रक्रियेतून फासीवादी आंदोलन उभे राहते आणि हे वर्ग त्याचा सामाजिक आधार बनतात. फासीवादी सत्तेत आल्यानंतरच ह्या वर्गांच्या लक्षात येते की फासीवाद खऱ्या अर्थाने मोठ्या भांडवलदारांचा निर्मम आणि पाशवी चाकर आहे. त्यानंतर हे वर्ग त्यापासून वेगळे होऊ लागतात. पण ही नंतर घडणारी गोष्ट आहे. प्रभावी क्रांतिकारी प्रचार आणि पक्षाच्या अभावी फासीवादाच्या उभारीची जमीन ह्याच वर्गांमध्ये तयार होते.

चौथी गोष्ट जी आपण परिणामांच्या स्वरुपात बघितली ती म्हणजे, ज्या देशांमध्ये भांडवलशाही कुठल्याही क्रांतीच्या माध्यमातून सत्तेत आलेली नाही, तिथे सबंध अर्थव्यवस्था, समाज आणि राजकारणात लोकशाही विरोधी आणि निरंकुश प्रवृत्तींचा बोलबाला असतो. इथपर्यंत की, भावी समाजवादी क्रांतीच्या मित्र वर्गांमध्येही ह्या प्रवृत्ती रुजलेल्या असतात. मूलगामी जमीन सुधारणांच्या अभावी ग्रामीण भागात युन्कर आणि श्रीमंत शेतकऱ्यांचा वर्ग अस्तित्वात येतो, जो फासीवाद्यांसाठी व्यापक सामाजिक आधार म्हणून काम करतो. मध्यम शेतकऱ्यांचा एक हिस्सा सुद्धा क्रांतिकारी प्रचार, आंदोलन आणि संघटनेच्या अभावी फासीवाद्यांच्या प्रचारास बळी पडतो. भांडवली लोकशाही क्रांतीच्या अभावी शहरी मध्यम वर्गांमध्ये सुद्धा लोकशाही मुल्यांचा आणि परंपरांचा अभाव असतो. हा मध्यम वर्ग युरोपमधल्या मध्यम वर्गासारखा नाही, ज्याच्या मध्ये तार्किकता, वैज्ञानिकता आणि गतिमानता मोठ्या प्रमाणात भिनली होती आणि जो मानवतावाद आणि लोकशाही मुल्यांचा जनक होता. आर्थिकदृष्ट्या तो मध्यम वर्ग बनला आहे पण वैचारिकदृष्ट्या आणि आत्मिक पातळीवर त्याच्यात ज्याला आधुनिक मध्यमवर्गीय मुल्ये म्हणता येईल असे काहीही नाही. हेच कारण आहे की हा शहरी सुशिक्षित मध्यमवर्गसुद्धा फासीवाद्यांच्या समोर नांगी टाकतो आणि त्यांच्या प्रभावाखाली येतो. भांडवली लोकशाहीचा अभाव हीच ती गोष्ट होती जिने जर्मनी आणि इटलीला फासीवादाच्या उदयासाठी आणि विकासासाठी अनुकूल जमीन तयार करून दिली, जे फ्रांसमध्ये अशक्य होते. हा केवळ योगायोग नव्हता की फ्रांसमध्ये फासीवाद्यांना कधीही पाय रोवता आले नाहीत.

आपल्या विश्लेषणाच्या माध्यमातून पुढे आलेले हे काही मुख्य निष्कर्ष होते. आपल्याला फासीवादाविरुद्ध कसे लढायचे आहे हे ह्या निष्कर्षांच्या आधारेच आपल्याला ठरवावे लागेल. उघडच आहे की आपल्याला फासीवादावर राजकीय आणि विचारधारात्मक हल्ला चढवावाच लागेल; आपल्याला फासीवादी विचारधारेचे वर्गीय चरित्र सामान्य जनतेसमोर उघडे करावेच लागेल; आपल्याला फासीवाद्यांची खरी जन्म-कुंडली आणि त्यांचा इतिहास जनतेसमोर उघड करावाच लागेल; आपल्याला त्यांच्या भरती केंद्रांवरती हल्ला करावाच लागेल आणि जे वर्ग फासीवाद्यांचा सामाजिक आधार बनू शकतात त्यांच्यामध्ये प्रभावी आणि व्यापक राजकीय प्रचार करावा लागेल; आपल्याला कामगार आंदोलनामध्ये जबरदस्त राजकीय प्रचार करून कामगार वर्गाला त्याचे ऐतिहासिक लक्ष्य आणि उत्तरदायित्व, म्हणजेच समाजवादी क्रांती आणि कम्युनिझमकडे अग्रेसर होण्याबाबत जागरूक करावे लागेल. ह्याच प्रक्रियेमध्ये आपल्याला कामगार वर्गामध्ये उपस्थित असलेल्या वर्ग-विजातीय प्रवृत्तींच्या विरुद्ध संघर्ष करावा लागेल आणि त्याला अर्थवाद, दुरुस्तीवाद आणि सुधारवाद यांच्या चौकटीतून बाहेर काढावे लागेल. आपल्याला सामाजिक-लोकशाहीवादी आणि दुरुस्तीवादी ह्यांना संपूर्ण जनतेसमोर नग्न करण्यामध्ये कुठलीही हयगय करता येणार नाही.

आपले विश्लेषण आपल्याला सांगते की फासीवादास अप्रतिरोध्य बनवण्यात सगळ्यात मुख्य भुमिका जर कोणाची असेल तर ती आहे दुरुस्तीवादाची. भारतसुद्धा ह्यासाठी अपवाद नाही. आज कामगार चळवळी मध्ये भारतीय मजदूर संघ ही सगळ्यात मोठी ट्रेड युनियन बनली आहे,त्या पापाचे जर कोणी वाटेकरी असतील तर त्या आहेत आयटक, सिटू आणि एक्टु सारख्या अर्थवादी, सुधारवादी, ट्रेड युनियनवादी आणि दुरुस्तीवाद्यांच्या विश्वासघातकी ट्रेड युनियन्स. ह्या गोष्टी आपण स्पष्टपणे समजतो पण तरीही कम्युनिस्ट कार्यकर्त्यांसाठी काही मुद्दे समजून घेणे गरजेचे आहे. आमच्या मते काही अनिवार्य गोष्टी आहेत ज्यावर अंमल करणे फासीवादाविरुद्धच्या आपल्या संघर्षामध्ये गरजेचे आहे.

1. कामगार आघाडीवर कम्युनिस्ट क्रांतिकारकांसमोरील सर्वात महत्वाचे आव्हान आहे ते म्हणजे अर्थवादी, सुधारवादी, ट्रेड युनियनवादी, दुरुस्तीवादी आणि अराजक संघाधिपत्यवाद्यांच्या विरोधात निर्णायक, विनातडजोड आणि सघन संघर्ष. कामगार चळवळी मधील हे भरकटलेपणच कामगारांना फासीवादी दैत्यासमोर वैचारिक आणि राजनैतिक पातळीवर असुरक्षित करतात. हे विचलन कामगार आंदोलनामध्ये आणण्याचा अपराध कित्येक वर्षांपूर्वीच मार्क्सवादाची कास सोडून दुरुस्तीवादी झालेल्या संसदीय डाव्यांनी केला आहे. कामगारांमध्ये भाकपा, माकपा आणि भाकपा (माले-लिबरेशन) सारख्या पक्षांच्या विश्वासघात आणि दांभिकपणाचा भांडाफोड करणे हे कम्युनिस्ट क्रांतिकारकांचे महत्वाचे काम आहे. फासीवादाच्या विरुद्ध लढण्यासाठी कामगारांमध्ये ज्या स्वप्नांची गरज असते त्या स्वप्नांचीच हत्या ह्या पक्षांनी केली आहे. आपल्याला ती स्वप्ने कामगारांमध्ये पुनर्जीवित करावी लागतील आणि त्यांचा प्रसार करावा लागेल. याच्या शिवाय आपण फासीवादाच्या विरुद्ध लढण्यासाठी आवश्यक असलेली झुंजार एकता आणि संघटन उभे करू शकणार नाही. आपल्याला कामगारांमधील अराजकीय प्रवृत्तींचा सुद्धा जबरदस्त विरोध करावा लागेल. ह्या अराजकीय प्रवृत्तींमध्ये

**पान ९ वर**

# फासीवाद म्हणजे काय आणि त्याविरुद्ध लढायचे कसे?

पान ८ वरून

सर्वात प्रमुख आहेत - अराजकतावाद आणि अराजकतावादी संघाधिपत्यवाद. या प्रवृत्ती कामगारांच्या ऐतिहासिक उत्तरदायित्वाबद्दलची चेतना कामगारांमध्ये तयार करण्यामध्ये सर्वात मोठी बाधा निर्माण करतात. या प्रवृत्ती कामगार वर्गामध्ये गैर-पार्टी क्रांतीवाद आणि कामगार वर्गाच्या "स्वायत्त" संघटना उभ्या करण्याच्या विचारांना प्रोत्साहन देतात. इथे स्वायत्त होण्याचा अर्थ आहे विचारधारात्मक आणि राजकीयदृष्ट्या अनाथ! ह्या फसव्या स्वायत्ततेचा भांडाफोड केला पाहिजे आणि कामगार वर्गामध्ये क्रांतिकारी विचारधारा आणि पक्षाचे महत्व वारंवार अधोरेखित केले पाहिजे. इथे हे लक्षात घेतले पाहिजे की अराजकतावादी संघाधिपत्यवादी जॉर्ज सोरेल यांचे अधिकांश अनुयायी इटली मध्ये फासीवाद्यांच्या आश्रयास गेले होते. हा केवळ एक योगायोग नव्हता.

2. कामगार आघाडी व्यतिरिक्त सर्वसाधारण मध्यमवर्ग आणि निम्न मध्यमवर्ग आणि त्याच बरोबर ग्रामीण सर्वहारा, अर्ध-सर्वहारा, गरीब आणि मध्यम शेतकरी ह्यांच्या मध्ये सुद्धा आपल्याला दुरुस्तीवादी संसदीय डाव्या पक्षांना नग्न करावे लागेल आणि त्यांना सांगावे लागेल की हे ढोंगी कम्युनिस्ट आहेत आणि ह्यांनी कम्युनिस्ट विचारधारा आणि कामगार वर्गाशी विश्वासघात केला आहे. शहरी आणि ग्रामीण मध्यमवर्गाचे प्रतिनिधित्व करण्याचे ह्यांचे दावे सुद्धा खोटे आहेत आणि वास्तविक पाहता ह्यांचे लक्ष्य याच भांडवली व्यवस्थेचे रक्षण करणे आहे, जिच्या मध्ये सामान्य मध्यमवर्गाला काहीही भविष्य नाही आणि त्याच्या नशिबात शेवटी उध्वस्त होऊन सर्वहारा आणि अर्ध-सर्वहाराच्या रांगेत जाणे लिहिले आहे. हे यासाठी सुद्धा महत्वाचे आहे कारण मध्यम वर्ग आणि सामान्य कष्टकरी जनतेचा एक मोठा हिस्सा दुरुस्तीवादी नेतृत्वाचे कारनामे बघून संसदीय डाव्या पक्षांचा तिरस्कार करतोच, पण त्याच बरोबर अज्ञानातून समाजवाद आणि साम्यवादाच्या आदर्शांपासून सुद्धा दूर होतो. त्यामुळेच ढोंगी मार्क्सवाद्यांना कामगार वर्गामध्येच नव्हे तर भावी समाजवादी क्रांतीच्या सर्व मित्र वर्गामध्ये नग्न करणे हे एक मुख्य आणि गरजेचे कार्य बनते.

3. प्रामुख्याने कामगार वर्गामध्ये, परंतु त्याचबरोबर शहरी आणि ग्रामीण निम्न भांडवली वर्ग, अर्ध-सर्वहारा, गरीब जनता आणि मध्यम शेतकरी, भूमिहीन मजुर आणि निम्न मध्यम वर्गामध्ये क्रान्तिकारी कम्युनिस्ट पार्टीला सातत्याने राजकीय प्रचाराची कार्यवाही चालवत हे दाखवून द्यावे लागेल की भांडवलशाही एक परजीवी आणि मरणासन्न व्यवस्था आहे, जी आपली ऐतिहासिक भूमिका बजावून स्वतःची प्रासंगिकता गमावून बसली आहे. आता ती जनतेला बेरोजगारी, महागाई, गरिबी, भूकबळी, असुरक्षितता आणि अनिश्चिततेशिवाय दुसरे काहीही देऊ शकत नाही. भांडवली व्यवस्था केवळ स्वतःच्या जडत्वामुळे टिकून आहे आणि तिची खरी जागा इतिहासाची कचरापेटी हीच आहे. भांडवली समाज आणि व्यवस्थेमधील दैनंदिन आणि प्रतीकात्मक घटनांच्या माध्यमातून सातत्याने तिला नग्न करावे लागेल. कामगार, तरुण, विद्यार्थी, बुद्धिवादी आणि स्त्रियांच्या पत्र-पत्रिकांच्या माध्यमातून प्रत्येक संधी साधून भांडवलशाहीच्या ऐतिहासिक निरर्थकतेला जनतेपुढे मांडावे लागेल. भांडवली संकटाच्या काळात आणि भांडवली निवडणुकांच्या काळात ह्या व्यवस्थेचा आणि समाजाचा क्रान्तिकारी विकल्प घेऊन जोरदारपणे सामान्य कष्टकरी जनतेच्या सर्व वर्गांमध्ये जावे लागेल. हीच ती वेळ असते जेव्हा जनता तिच्या राजकीयीकरणासाठी मानसिक दृष्ट्या खुली आणि तयार असते. परंतु जेव्हा अशा संधी नसतात तेव्हा सुद्धा सातत्याने, न थकता आणि तात्कालिक यशाची अपेक्षा न करता भांडवलशाही विरोधी कम्युनिस्ट राजकीय प्रचार कधी सावकाश तर कधी खूप आक्रमकपणे चालवावयास हवा. परंतु न थांबता आणि न थकता तो चालवावा लागेल हे नक्की.

4. कामगारांच्या पक्षास कामगार, विद्यार्थी-युवक, बुद्धीजीवी, स्त्रियांच्या आघाडी बरोबरच सर्व आघाड्यांवर अतार्किक, अवैज्ञानिक आणि निरंकुश विचारांच्या विरोधात प्रचार करावा लागेल ज्यांचा उपयोग फासीवादी शक्ती निम्न-भांडवली वर्ग, मध्यम वर्ग, लम्पट सर्वहारा, इत्यादी वर्गांना सोबत घेण्यासाठी करतात. उदाहरणार्थ, वंशवाद, सांप्रदायिकतावाद, प्रांतवाद, भाषावाद, जातिवाद इत्यादी. ह्या विचारधारांचा उपयोग करून फासीवादी शक्ती जनतेच्या असंतोषाला भांडवलशाही विरोधी असंतोषामध्ये रुपांतरीत होण्यापासून परावृत्त करतात; एखाद्या अल्पसंख्यांक समुदाय किंवा जातीच्या विरोधात ह्या असंतोषाचे ध्रुवीकरण करतात आणि एक निरंकुश प्रतिक्रियावादी आणि बहुसंख्यांक राजकारण करत फासीवादी सत्ता कायम करतात. ह्या विचारधारांचा विरोध आपल्याला बुर्झ्वा मानवतावाद आणि धर्मनिरपेक्षतेच्या जमिनीवर उभे राहून न करता सर्वहारा वर्गाच्या वर्ग चेतनेच्या जोरावर करावा लागेल. बुर्झ्वा मानवतावादी आवाहन आणि धर्मनिरपेक्षतेचा राग आलापून कधीही सांप्रदायिक फासीवादाचा प्रतिकार होऊ शकलेला नाही व होऊ शकणारही नाही. सर्वहारा वर्ग चेतनेच्या जमिनीवर उभे राहून केला जाणारा झुंजार आणि आक्रमक प्रचारच ह्या विचारांचा प्रभाव संपवू शकतो. आपल्याला ह्या सबंध आर्थिक, सामाजिक समस्यांचा स्त्रोत जनतेच्या समोर आणावा लागेल आणि सांप्रदायिक प्रचारा मागच्या खऱ्या हेतूंचा भांडाफोड करावा लागेल. त्याच बरोबर, असा प्रचार करणाऱ्यांचे खरे स्वरूप जनतेसमोर आणावे लागेल आणि त्यांचा खरा उद्देश जनतेला सांगावा लागेल. धार्मिक कट्टरपंथी फासीवादाचा सामना ह्याच पद्धतीने केला जाऊ शकतो. वर्गनिरपेक्ष धर्मनिरपेक्षता आणि 'मजहब नहीं सिखाता' सारख्या पोपटपंचीचा जनतेवर कुठलाही प्रभाव पडत नाही.

5. फासीवादी सत्तेमध्ये असल्यावर किंवा सत्तेमध्ये येऊन गेलेले असतील तर त्यांचा भांडाफोड करणे तुलनेमध्ये सोपे असते. भाजपच्या नेतृत्वाखाली रालोआ सरकारमुळे ती सर्व कामे झालीत जी होण्यासाठी सामान्य परिस्थितीमध्ये क्रांतिकारी शक्तीला दुप्पट वेळ लागला असता. सत्तेमध्ये येताच फासीवाद्यांचा धनलोलुप, पतित, चरित्रहीन, सत्ता-लोलुप, खुर्ची-प्रेमी, अनैतिक चेहरा समोर येऊ लागतो आणि त्यांच्या चेहऱ्यावरून धार्मिक पावित्र्य, नैतिकता आणि शिस्त यासारखे बुरखे गळून पडू लागतात. ह्याचा पुरेपूर उपयोग क्रांतिकारी शक्तीने करून घेतला पाहिजे आणि जनतेच्या शेवटच्या घटकापर्यंत फासीवाद्यांच्या भ्रष्टाचार, नैतिकपतन आणि धनलोलुपता यांच्यावर निशाणा साधला पाहिजे आणि त्याचा भांडाफोड केला पाहिजे. अशा प्रकारे आपण त्यांच्या विश्वासार्हतेवर निर्णायक घाव घालू शकतो. हे महत्वाचे आहे की फासीवाद्यांना कुठल्याही प्रकारे जनतेमध्ये रुजण्याची संधी देता कामा नये. ह्या उद्देशपूर्तीमध्ये हा प्रचार मोठी भूमिका बजावेल.

6. फासीवादाच्या सामाजिक आधारांमध्ये ज्या वर्गांना फासीवाद स्वतःच्या पेशीय शक्तीच्या रुपात भ्रष्ट करतो ते वर्ग आहेत - आर्थिक आणि क्षेत्रीय रुपात भांडवली विकासामुळे उध्वस्त झालेले वर्ग. क्रान्तिकारी पार्टीला ह्या वर्गांना संगठीत करण्याचा प्रयत्न अगदी सुरुवातीपासून करावा लागेल आणि त्यांच्यामध्ये सुरुवातीपासूनच भांडवलशाही विरोधी राजकीय प्रचार गेला पाहिजे. त्यांना अगदी सुरुवाती पासूनच हे सांगावे लागेल की त्यांच्या उध्वस्त होण्यामागे, त्यांच्या जीवनामधील असुरक्षितता आणि अनिश्चिततेमागे भांडवली व्यवस्था जबाबदार आहे. ही व्यवस्था त्यांना दुसरे काही देऊ सुद्धा शकत नाही. अशा वर्गांमध्ये लंपट सर्वहारा वर्ग, असंघटीत आणि अनौपचारिक क्षेत्रांमध्ये काम करणारा सर्वहारा वर्ग, शहरी निम्न-मध्यवर्गीय बेरोजगार आणि अर्द्ध-बेरोजगार, ग्रामीण भागांमधून उध्वस्त केले गेलेले किंवा उध्वस्त होत असलेले गरीब शेतकरी प्रमुख आहेत.

7. लेनिनने खूप अगोदरच सांगितले होते की फासीवाद आणि प्रतिक्रियावाद दहा पैकी नऊ वेळा जातीयवादी, वंशवादी, सांप्रदायिकतावादी सांस्कृतिक राष्ट्रवादाचा बुरखा ओढून येतो. तसे तर आपण सुरुवातीपासूनच बुर्झ्वा राष्ट्रवादाच्या प्रत्येक रूपाचा यथासंभव विरोध केला पाहिजे, परंतु विशेषत: फासीवादी सांस्कृतिक अंधराष्ट्रवाद कामगार वर्गाच्या सर्वात मोठ्या शत्रुंपैकी एक आहे. आपल्याला प्रत्येक पावलावर सांस्कृतिक राष्ट्रवाद, प्राचीन हिंदु राष्ट्राच्या प्रत्येक गौरवशाली मिथकाचा आणि खोट्या प्रतीकाचा विरोध करावा लागेल आणि त्यांना जनतेच्या मान्यतेमध्ये खंडित करावे लागेल. ह्यात आपल्याला विशेष मदत ह्या सांस्कृतिक राष्ट्रवाद्यांच्या इतिहासामधून मिळेल. निर्विवादपणे अंधराष्ट्रवादाचा उन्माद पसरवण्यामध्ये गुंतलेल्या ह्या संघटनांना काळा इतिहास असतो जो विश्वासघात, भ्रष्टाचार आणि पतन ह्यांनी भरलेला असतो. आपल्याला फक्त हा इतिहास जनतेपुढे मांडायचा आहे आणि त्यांच्या समोर हा प्रश्न उपस्थित करायचा आहे की हे "राष्ट्र" कोणते आहे ज्याबद्दल फासीवादी बोलत आहेत ते कोणत्या पद्धतीचे राष्ट्र स्थापन करू इच्छित आहेत आणि कोणाच्या हिताची सेवा करण्यासाठी आणि कोणाच्या हिताचा बळी देऊन ते हे "राष्ट्र" स्थापन करू इच्छित आहेत. "राष्ट्रवादी" नारे आणि त्या विचारधारेचे निर्मम खंडन - ह्या शिवाय आपण आपला संघर्ष पुढे घेऊन जाऊ शकणार नाहीत. राष्ट्रचेतनेच्या जागी आपल्याला वर्गचेतना जागवावी लागेल. बुर्झ्वा राष्ट्रवादाच्या प्रत्येक प्रजातीसाठी "राष्ट्र" हे केवळ आणि केवळ बुर्झ्वा वर्ग आणि त्यांचे हितसंबंध यांपुरते मर्यादित असते. कामगार वर्गाला हाडाचे पाणी करून ह्या राष्ट्राच्या सेवेमध्ये लीन व्हावे लागते. ह्या व्यतिरिक्त काहीही विचार करणे राष्ट्र-विरोधी असते. राष्ट्रवाद हे कामगारांमध्ये खोटा गर्वबोध निर्माण करून त्यांची वर्ग चेतना कुंद करण्याचे एक प्रभावी बुर्झ्वा हत्यार आहे आणि त्याचे हे रूप जनतेसमोर उघड करणे अत्यंत आवश्यक आहे. हे काम केवळ कामगार वर्गामध्ये केले पाहिजे असे नाही, तर त्या प्रत्येक वर्गामध्ये केले गेले पाहिजे जे वर्ग भावी समाजवादी क्रांतीचे मित्र वर्ग असणार आहेत.

8. सामाजिक-लोकशाहीवादी आणि दुरुस्तीवादी कामगार आंदोलनामध्ये सर्वहारा वर्ग चेतना कुंद करण्याचा हरतऱ्हेने प्रयत्न करतात. जरी बौद्धिक चर्चांमध्ये ते वर्ग संघर्षाची भाषा बोलत असले तरी, प्रत्यक्ष कार्यपद्धतीमध्ये ते वर्ग संघर्षाऐवजी वर्ग सहयोगाची बीजे कामगार वर्गामध्ये रुजवण्याचे काम करतात. कामगारांना वर्ग सहयोगाचे ज्ञानामृत पाजत असताना पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री बुद्धदेव भट्टाचार्य यांनी काही काळापूर्वी म्हटले होते की आपल्याला हे समजून घेणे गरजेचे आहे की आता रशिया किंवा चीन प्रमाणे हिंसक क्रांतीचा काळ लोटला आहे; कामगार वर्गाला भांडवलदारांबरोबर सहयोगाचे धोरण राबवावे लागेल; उद्योगांच्या विकासामध्ये, भरभराटीमध्येच दोन्ही वर्गाचे हित आहे. इथे बुद्धदेव यांनी शब्दशः तीच गोष्ट विशद केली आहे जी एका जर्मन सामाजिक-लोकशाहीवादी नेत्याने म्हटली होती. कार्ल लीजन यांनी उद्योगपतींशी झालेल्या करारनाम्यावेळी हीच गोष्ट म्हटली होती. कार्ल लीजन जर्मन सामाजिक-लोकशाहीवादी पक्षाचे एक नेता होते. कम्युनिस्ट क्रांतिकारकांनी वर्ग सहयोगाच्या अशा प्रत्येक प्रयत्नांना हाणून पाडले पाहिजे आणि दुरुस्तीवाद्यांचे खरे स्वरूप कामगारांसमोर उघड केले पाहिजे. त्यांनी कामगारांना हे समजावून सांगितले पाहिजे की श्रम आणि भांडवलामध्ये कोणतीही तडजोड शक्य नाही. ऐतिहासिकदृष्ट्या ह्या दोन्हीही अंतर्विरोधी शक्ती आहेत आणि इतिहासाने त्यांच्या समोर एक आणि एकाच विकल्प ठेवला आहे, तो आहे - संघर्ष, आणि ह्या संघर्षामध्ये शेवटी विजय हा श्रमाचाच असणार आहे.

9. कम्युनिस्ट क्रांतीकारकांना भांडवली विकासाच्या चालू काळात अनौपचारिक आणि असंघटीत क्षेत्रांमधील कामगारांना संघटीत करण्यावर जास्त भर द्यायला हवा. आज भारतामधील कामगार वर्गाच्या एकूण संख्येच्या ९० टक्क्यांहून जास्त भाग असंघटीत क्षेत्रामध्ये काम करत आहे. संघटीत कामगारांची एक मोठी संख्या पांढरपेशा कामगारांमध्ये रुपांतरीत झाली आहे. हे पांढरपेशे स्वतःला कामगार म्हणवून घेण्याऐवजी कर्मचारी म्हणून घेणे पसंद करतात आणि त्यांचा एक मोठा भाग एक तर दुरुस्तीवादी ट्रेड युनियन्सचा भाग बनला आहे किंवा फासीवादी भारतीय मजदूर संघाचा, जी आता भारतामधील सर्वात मोठी ट्रेड युनियन बनली आहे. अनौपचारिक व असंघटीत क्षेत्रामध्ये फासीवादी शक्ती सातत्याने सुधार कार्यक्रम, कीर्तन-जागरण इत्यादींसारखे धार्मिक कार्यक्रम आयोजित करून आपले अस्तित्व निर्माण करण्याचे काम करत आहेत. ह्या वर्गाच्या फासीवादीकरणासाठी त्यांच्यामध्ये सेवा-भारती सारखे उपक्रम चालवले जात आहेत आणि त्या माध्यमातून त्यांना भ्रष्ट करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. हे जरी सत्य असले की कामगार वर्गाच्या ह्या भागाचे फासीवादीकरण करणे सर्वात अवघड आहे तरीही आपल्याला सातत्याने ह्या वर्गाला संघटीत करण्याचा प्रयत्न सर्वात आधी करावा लागेल. तसेही असंघटीत कामगार एकूण कामगारांच्या संख्येच्या बहुसंख्य असल्यामुळे आपल्याला त्यांच्या विविध संघटना बनवणे, त्यांच्या मध्ये त्यांच्या मुलांसाठी शाळा सुरु करणे, सुधाराचे कार्यक्रम हाती घेणे आणि त्यांच्या मध्ये अदम्य आणि शक्तिशाली सामाजिक आधार बनवण्यासाठीचे उपक्रम हाती घेतले पाहिजेत. आपल्याला त्यांच्या मध्ये सातत्याने, व्यापक आणि सघन राजकीय प्रचार करावा लागेल. जुन्या कामगार वर्गासारखा नवीन कामगार वर्ग चेतनाविहीन नाही, उलट कामासाठी सातत्याने वणवण फिरलेला असल्यामुळे तो समस्त भांडवली वर्गाला आपल्या शत्रूच्या रुपात बघतो

पान १० वर

# फासीवाद म्हणजे काय आणि त्याविरुद्ध लढायचे कसे?

पान ९ वरून

आणि संघटीत होण्याच्या शक्यतेने संपन्न आहे. दुसरी गोष्ट, ह्या वर्गाचा एक मोठा भाग हा तरुण आहे, जी की आपल्यासाठी चांगली गोष्ट आहे. कामगारांच्या ह्याच वर्गामधून आपण त्यांच्या लढवय्या संघटना बांधू शकतो आणि आपल्याला तशा संघटना बनवाव्या लागतील. स्पष्टच आहे की असंघटीत क्षेत्रामधील कामगारांमध्ये कारखाना आधारित युनियन्स बांधण्याच्या शक्यता कमी आहेत. त्यामुळे आपल्याला त्यांच्या रहिवासी ट्रेड युनियन्स बांधाव्या लागतील. ट्रेड यूनियनच्या व्यतिरिक्त, रहिवासी भागांमध्ये झुंझार, लढवय्या संघटना उभ्या कराव्या लागतील. ज्याप्रकारे जर्मनीत कारखान्यांमध्ये कारखाना ब्रिगेड्स उभ्या केल्या होत्या त्याच धर्तीवर आपल्याला असंघटीत कामगारांच्या रहिवासी क्षेत्रांमध्ये अशा संघटना उभ्या कराव्या लागतील ज्या त्यांच्या ट्रेड युनियन्स पेक्षा वेगळ्या असतील. ट्रेड युनियन्सचे एक विशिष्ट कार्य असते आणि त्यांना त्याच कामासाठी उपयोगात आणले गेले पाहिजे. फासीवादी हल्ल्यांना निष्क्रिय करण्यासाठी कामगार वर्गाच्या वेगळ्या अशा झुंझार आणि लढवय्या संघटना असायला हव्यात.

10. फासीवादाच्या कार्यपद्धतीची एक खास बाब ही आहे की आपल्या राजकीय आणि संघटनात्मक हिताच्या पूर्ततेसाठी आणि आपल्या शत्रूंचा सफाया करण्यासाठी ते दहशतीच्या राजकारणाचा उपयोग करतात. जर्मनी आणि इटली प्रमाणेच भारतीय फासीवाद्यांनी बजरंग दल, विश्व हिन्दू परिषद आणि वनवासी कल्याण आश्रम यांसारख्या दहशत निर्माण करू शकणाऱ्या संघटना उभ्या केल्या आहेत. ह्या दहशतवादी संघटना राज्य मशिनरीच्या मर्यादेबाहेर राहून बुर्झ्वा वर्गाची हुकुमशाही लागू करण्याचे काम इमाने-इतबारे करतात. कामगार नेते, ट्रेड युनियन कार्यकर्ते, कम्युनिस्ट, उदारवादी यांच्यावर हल्ले करणे आणि त्यांच्या हत्या करणे हा ह्या संघटनांचा भारतामधील इतिहास आहे. संप मोडून काढण्यासाठी ह्या दहशतवादी संघटनांचा उपयोग फासीवाद्यांनी भारतामध्ये सुद्धा केला आहे. महाराष्ट्रामध्ये संपकरी कामगार आणि त्यांच्या नेत्यांवर शिवसेनेच्या गुंडांनी केलेले हल्ले कोण विसरू शकतो. आपल्याला फासीवादाला विचारधारा आणि राजकारण ह्या दोन्ही क्षेत्रांमध्ये पराभूत करावे लागेल, पण त्याच बरोबर आपल्याला त्यांना रस्त्यावरच्या संघार्षामध्येसुद्धा पराभूत करावे लागेल. त्यासाठी आपल्याला कामगारांच्या झुंझार आणि लढवय्या संघटना बांधाव्या लागतील. इथे लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही आहे की जर्मनीमधील कम्युनिस्टांनी फासीवाद्यांशी सामना करण्यासाठी कारखाना ब्रिगेड्स उभ्या केल्या होत्या, ज्या फासीवाद्यांना रस्त्यावर प्रत्युत्तर देण्यासाठी सक्षम होत्या. त्यानंतर हा प्रयोग बंद झाला आणि फासीवाद्यांनी जर्मनीमध्ये त्यांची सत्ता कायम केली. कामगार वर्गाचा एक मोठा भाग अद्यापही तेथे सामाजिक-लोकशाहीवाद्यांच्या प्रभावामध्येच होता आणि क्रांतिकारी कम्युनिस्टांची पकड पुरेशी मजबूत झालेली नव्हती. परंतु त्या छोट्याश्या प्रयोगाने हे सिद्ध केले होते की फासीवादी गुंडांचा सामना रस्त्यांवरच केला जाऊ शकतो. त्यांच्या बरोबर वाद-विवाद आणि तर्क-वितर्क करण्याची कुठलीही शक्यता नाही. सांप्रदायिक दंगली आणि फासीवादी हल्ले रोखण्यासाठी असेच झुंझार दस्ते विद्यार्थी आणि तरुणांमध्ये उभे केले गेले पाहिजेत. विद्यार्थी आणि तरुणांमध्ये अशा प्रकारच्या हल्ल्यांना सामोरे जाण्यासाठी आवश्यक असे आत्मरक्षण आणि जनरक्षणाच्या हेतूने शारीरिक प्रशिक्षण आणि मार्शल आर्ट्सचे प्रशिक्षण देण्याचे काम क्रांतिकारी विद्यार्थी आणि तरुणांच्या संघटनांना करावे लागेल. त्यांनी स्पोर्ट्स क्लब, जिम, मनोरंजन क्लब इत्यादी सारख्या संस्था उभ्या कराव्या लागतील, जिथे राजकीय शिक्षण-प्रशिक्षण आणि बुद्धीप्रामाण्यावाद आणि वैज्ञानिकतेचा प्रसार करण्याचे काम सुद्धा केले जाईल.

11. आपण उदारवादी बुर्झ्वा राज्याबद्दल जनतेमध्ये असलेले सर्व भ्रम मोडून काढण्याचे काम केले पाहिजे. आपल्याला हे दाखवून द्यावे लागेल की कशा प्रकारे भांडवलशाहीच्या नैसर्गिक गतीमध्ये उदारवादी किंवा कल्याणकारी बुर्झ्वा राज्याच्या नशिबी संपून जाणे लिहिले आहे. भांडवलशाहीमध्ये उदारवादी किंवा कल्याणकारी बुर्झ्वा राज्याची नैसर्गिक गती पतनाच्या दिशेनेच असते. फासीवाद भांडवली अर्थव्यवस्थेच्या पतनशील अवस्थेमध्येच जन्मास येतो.जी परिस्थिती क्रांतिकारी शक्यतांना जन्म देते तीच परिस्थिती फासीवादी प्रतिक्रियावादालाही जन्म देते. आपल्याला उदारवादी भांडवलशाहीचे खरे रूप जनते समोर आणण्यासाठीची प्रत्येक संधी साधावी लागेल आणि जनतेला सांगावे लागेल की उदारवादी भांडवलशाही तिला काहीच देणार नाही; ती सातत्याने संकटाच्या दलदलीत रुतणार आहे आणि तिच्या कडून मिळणारे श्रम अधिकार, नागरी अधिकार उत्तरोत्तर संपुष्टात येतील.

12. आपल्याला लोकशाही, नागरिक आणि मानवअधिकारांवरील हल्ल्यांविरुद्ध नागरिक-लोकशाहीवादी अधिकार संघटनांच्या माध्यमातून संघर्ष करावा लागेल. ही एक हरलेली लढाई असते हे आपल्याला माहितीच आहे; परंतु ह्या हरलेल्या लढाईलाच आपण आपल्या दीर्घकालीन लढाईचे हत्यार म्हणून उपयोगात आणू शकतो. आपल्याला ह्या अधिकारांवर येत असलेले गंडांतर आणि दिवसेंदिवस आकुंचन पावत असलेला लोकशाही अवकाश याविरुद्ध जनतेमध्ये सातत्याने प्रचार आणि प्रसार करावा लागेल. खास करून शिक्षित शहरी मध्यमवर्गामध्ये हा प्रचार केला गेला पाहिजे. ह्या माध्यमातून आपण समस्त भांडवली लोकशाहीचे खरे स्वरूप जनतेच्या समोर उघड करू शकतो आणि त्याचा पर्याय म्हणून ऐतिहासिक दृष्ट्या प्रगतीशील सर्वहारा लोकशाहीचा विकल्प मांडू शकतो. त्या व्यतिरिक्त, आपल्याला श्रम अधिकारांवरील हल्ल्यांविरुद्ध सातत्याने संघर्ष आणि प्रचार करत राज्य संस्थेला त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी बाध्य केले पाहिजे. ह्या व्यतिरिक्त, आपल्याला सर्व अपूर्ण लोकशाही कार्यभार पूर्ण करून घेण्यासाठी संघर्ष केला पाहिजे. ज्या देशांमध्ये भांडवलशाही ही कुठल्याही क्रांतीशिवाय आली आहे, अशा देशांमध्ये अपूर्ण लोकशाही कार्यभारांची एक मोठी यादीच आहे. आपल्याला ह्या अधिकारांसाठी संघर्ष करावा लागेल. ह्यामागे दोन उद्देश आहेत. एक तर हा की असा संघर्ष भांडवली राज्याच्या "ब्रीदिंग स्पेस" ला कमी करून तिच्यामध्ये घुसमट निर्माण करणारी परिस्थिती निर्माण करतो आणि दुसरा उद्देश म्हणजे, लोकशाही कार्यभार पूर्ण होण्याबरोबरच समाजामधील विविध वर्गांमध्ये प्रतिक्रियावादाचा आधार कमकुवत होतो. हेच कारण आहे की अपूर्ण किंवा अर्धवट लागू झालेल्या जमीन सुधारणांना लागू करणे ही क्रांतिकारी कम्युनिस्टांची एक महत्वाची मागणी बनते. ही मागणी ग्रामीण भागांमधील प्रतिक्रियावादाची जमीन कमकुवत बनवते आणि वर्ग चेतना जागृत करते. इथे एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे ती म्हणजे बुर्झ्वा व्यवस्थेमध्ये लोकशाही अधिकारांच्या संघर्षामध्ये कामगार आंदोलनामध्ये बऱ्याच वेळा सर्वखंडनवादी अराजकतावादी दृष्टीकोन प्रभावी होतो आणि आपण दिवसेंदिवस आक्रसत चाललेल्या लोकशाही अवकाशामागील धोके ओळखू शकत नाही. अशा वेळी आपल्याला काही ठोस वर्ग संघर्ष केला जावा असे वाटते, नागरिक आणि लोकशाहीवादी अधिकारांवरील हल्ल्यांच्या विरुद्ध संघर्ष आपल्याला अप्रासंगिक वाटू लागतो. हे एक खूप भयंकर असे वैचारिक विचलन आहे. हंगेरियन कम्युनिस्ट जॉर्ज लूकाच यांनी ह्या प्रवृत्तीच्या विरुद्ध त्यांच्या "ब्लम थीसिस"मध्ये धोका दाखवून दिला आहे, त्याबद्दल सावध केले आहे आणि ह्या प्रवृत्तीला आत्मघातकी म्हटले आहे. लोकशाही अवकाश आक्रसण्याबरोबरच कामगार वर्गाला गोलबंद आणि संघटीत करण्याचे काम अधिकच कठीण होऊन बसते. लेनिनने असेच नाही म्हटलेले की बुर्झ्वा लोकशाही ही सर्वहारा वर्गासाठीची सर्वश्रेष्ठ युद्धभूमि आहे. त्यामुळे कामगार चळवळीला न केवळ श्रम अधिकारांवरील हल्ल्याच्या विरोधात संघर्ष केला पाहिजे परंतु त्यांच्या नागरिक आणि लोकशाही अधिकारांवरील हल्ल्यांच्या विरोधातही संघर्ष केला पाहिजे. हा संघर्ष त्यांच्या नागरिक म्हणून असलेल्या ओळखीवरील शक्तिशाली दावासुद्धा असेल, जो राजकीय संघर्ष पुढे घेऊन जाण्यासाठी आणि कामगार वर्गामध्ये राजकीय चेतना विकसित करण्यामध्ये महत्वाचे पाऊल ठरेल.

●

# मुंबईमध्ये अग्नीतांडव : दुर्घटना नाही, भांडवली व्यवस्थेचे बळी

पान ३ वरून

करूनच मिळविला जातो हे मार्क्सने खूप आधीच सिद्ध केले आहे. कामगारांना कमी पगारावर राबवून घेऊन जास्त काम करून घेणे, पुरेशा सोईसुविधा न देणे या मार्गांनी भांडवलदार कामगारांचे शोषण करतो. या अन्यायाविरोधात कामगार संघर्षाला उभे ठाकतात. मुंबईतील गिरणी कामगार असेच संघटित होऊ लागले, आपल्या हक्कासाठी लढू लागले. त्यातून छोटे-मोठे संघर्ष, संप होऊ लागले. त्यातच १९८०च्या दशकात कामगार नेते दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाखाली गिरणी कामगारांचा एक मोठा संप झाला पण तो यशस्वी झाला नाही.

मालक धंदा नफ्यासाठी करतो. त्यामुळे मुंबईत जागांचे भाव आकाशाला भिडू लागल्यावर, आणि कामगार आंदोलनामुळे मिल कापड उद्योग चालवण्यापेक्षा मालकांचा रस जमिनीच्या उद्योगात वाढला आणि त्यांनी मिल या ना त्या कारणाने बंद करण्याचे काम चालू केले. लाखो कामगार देशोधडीला लागले आणि कालांतराने मुंबईतील कापड गिरण्यांचा भोंगा कायमचा बंद झाला. बंद पडलेल्या गिरण्यांची जमीन मालकांच्याच ताब्यात राहिली. खरेतर ही जमीन कामगारांसह शहरातील जनतेची होती. ती इंग्रज सरकारने जनतेकडूनच संपादित केली होती. कामगारांनी आपलं रक्त आटवून कापड गिरण्यांचा उद्योग भरभराटीला आणला होता. त्यामुळे या गिरण्यांची जमीन कामगारांसह मुंबईतील सामान्य जनतेच्या वापरासाठी उपयोगात यायला हवी होती. कामगारांचा लढा चालूच राहिला. त्यातून असे ठरले की, सहाशे एकर जागेची तीन हिश्श्यात विभागणी केली. त्यातील दोनशे एकर राज्य सरकार म्हणजेच म्हाडाकडे, दुसरा हिस्सा मुंबई महानगरपालिका आणि तिसरा हिस्सा मालक वर्गाकडे जाणार होता. सरकार आणि महापालिकेच्या ताब्यात येणाऱ्या जमिनीचा वापर कापड गिरणी कामगारांसाठी आणि मुंबईतील इतर सर्वसामान्य जनतेच्या सोयीसुविधांसाठी वापरात येणार होता. पण मालक वर्गाने कायद्याच्या पळवाटांचा आणि भ्रष्ट नेते, अधिकारी यांचा वापर करून ५३५ एकर जमीन लाटली. आज याच जमिनीचा वापर कमला मिल कंपाऊंड सारख्या जागी हॉटेल्स आणि इतर व्यावसायिक कारणासाठी होत आहे आणि त्यातून भरमसाठ नफा कमावला जातोय. गिरणी कामगारांच्या नोकऱ्याही गेल्या, ना जमिनी मिळाल्या ना घरे.

### 'दुर्घटना' नाही, व्यवस्थेचे बळी

एका बाजूला कामगारांना देशोधडीला लावून गिरण्यांच्या जमिनीवर अय्याशीची हॉटेलं चालवली जातात, अशा जागी होणाऱ्या दुर्घटनांना राष्ट्रीय प्रसिद्धी मिळते आणि दुसरीकडे कामगारांचे जीव घेणाऱ्या दुर्घटना दररोज घडतात आणि त्या मीडीयाच्या खिजगणतीतही नसतात. खरेतर बेरोजगार होऊन देशोधडीला लागलेले गिरणी कामगार असोत किंवा दुर्घटनांमध्ये जीव गेलेले कामगार, हे या नफेखोर भांडवली व्यवस्थेचेच बळी आहेत - अशी व्यवस्था जेथे अधिकारी, पोलिस, कायदे, मंत्री, सरकार हे सर्व धनिकांच्या तालावर नाचतात आणि त्यांच्या संपत्तीच्या, नफ्याच्या रक्षणासाठी अगदी तत्पर असतात.

या व्यवस्थेमुळेच आज मुंबईतील ४४ टक्के जनता झोपडपट्टीत राहण्यास बाध्य आहे. झोपडपट्टीत राहणारे कष्टकरी लोकच मुंबईला चालते ठेवण्याचे काम अहोरात्र करत असतात; मात्र बकाल जीवन, रोगराई, सुरक्षेचा अभाव त्यांच्या पाचवीलाच पुजला आहे. गरिबांचे शोषण करून श्रीमंतांच्या तुंबड्या भरणाऱ्या या भांडवली व्यवस्थेत श्रीमंत अधिक श्रीमंत होत चालले आहेत आणि गरीब अगदीच गरीब होत चालले आहेत. भारतातील सर्वात श्रीमंत १ टक्के लोकांकडे ७३% संपत्ती जमा झाली आहे आणि वरच्या दहा टक्के लोकांकडे ८०% संपत्ती गोळा झाली आहे. जोपर्यंत ही व्यवस्था आहे तोपर्यंत कामगारांना ना रोजगाराची शाश्वती आहे, ना घरांची, ना अपघातांपासून सुरक्षिततेची! या व्यवस्थेला आमूलाग्र बदलून, कष्टकऱ्यांची क्रांतिकारी सत्ताच खऱ्या अर्थाने या सर्व समस्यांचे निवारण करू शकते.

●

# जीडीपी वाढीच्या दरात घट आणि अर्थव्यवस्थेची बिघडत चाललेली अवस्था: सर्वात जास्त मार तर कष्टकऱ्यांवरच पडत आहे!

मुकेश असीम

***आज अर्थव्यवस्थेत सुरू असलेली मंदी व देशातील वाढत्या बेरोजगारी आकड्यांची मोताद राहीली नाही, ती आता जनतेला थेट तीच्या दैनंदिन जगण्यातून दिसते आहे. मोदीच्या सत्तेत येण्याने जीडीपी च्या मोजमापाची पध्दत बदलली गेली, ज्याच्या आधारे जनतेची सतत दिशाभूल करता येईल. खोटे आकडे दाखवून जीडीपी वाढवण्याचा प्रयत्न केला गेला, पण मंदी इतकी तीव्र आहे की झाकता येणे शक्य नाही. ऑगस्ट २०१७ मध्ये जेव्हा वित्तीय वर्ष २०१७-१८ च्या पहील्या तिमाहीचे आकडे जाहीर केले, तेव्हाही हे स्पष्ट झाले. सदरील लेख जीडीपी च्या सुरू असणाऱ्या घटीच्या संरचनात्मक कारणांची पडताळणी करतो व मोदी सरकार द्वारे आकडे फुगवून दाखवण्याची पोल खोलतो.***

आर्थिक वर्ष २०१७-१८च्या एप्रिल-जून या पहिल्या तिमाहीत, सकल राष्ट्रीय उत्पादनाचे (जीडीपी) आकडे घोषित झाले आणि त्यात वाढीचा दर फक्त ५.७% आहे असे दिसून आले. अनेक विश्लेषक आणि अर्थशास्त्रज्ञ या दराच्या घसरणीवर आश्चर्य व्यक्त करत आहेत; परंतु जे लोक सरकारी प्रचार यंत्रणेने प्रभावित न होता अर्थव्यवस्थेच्या खऱ्या गति-स्थितीवर नजर ठेवून असतात त्यांच्यासाठी यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही. जीडीपी मोजमापाचे आधार वर्ष आणि पद्धत बदलून, वृद्धीदराला कृत्रिम पद्धतीने वाढवण्याचे सोंग करूनही २०१६च्या सुरुवातीपासूनच अर्थव्यवस्थेत जोरदार तेजी असल्याच्या प्रचाराच्या नाटकाचा पडदा उठू लागला होता आणि अर्थव्यवस्थेची खरी कमजोरी समोर येऊ लागली होती. नरेंद्र मोदींच्या नोटबंदीच्या घातक मास्टरस्ट्रोकने तर अर्थव्यवस्थेच्या मजबूतीची सगळी हवाच काढली आणि अर्थव्यवस्थेचे संकट देशातील अधिकांश जनतेसमोर मोठ्या संकटाच्या स्वरुपात येऊन उभे ठाकले. उरलीसुरली कमतरता या तिमाही मध्ये जीएसटी लागू करण्याच्या तयारीने भरून काढली. या दोन्ही गोष्टी अर्थव्यवस्थेच्या संकटाचे मूळ कारण तर नाहीत, पण दुष्काळात तेरावा महिना म्हणतात तसे त्यांनी या संकटाच्या गतीला तीव्र मात्र केले आहे. यामुळेच ज्यादिवशी रद्द केलेल्या नोटांपैकी ९९% नोटा परत येण्याच्या बातमीने नोटबंदीच्या शवपेटीत शेवटचा खिळा ठोकला, त्याच्या दुसऱ्या दिवसापासून अचानक जीडीपी वाढीच्या दरात मोठी घट झाल्याच्या बातमीला लोकांनी सोबत जोडून पाहिले आणि सहन केलेल्या अडचणींसाठी मोदी सरकारच्या नोटबंदीच्या विनाशकारी पावलाला पूर्णत: जबाबदार धरले.

जीडीपी आणि अर्थव्यवस्थेचे अजून विश्लेषण करण्याअगोदर या आकड्यांना किती विश्वासार्ह मानावे यावर काही टीपण जरूरी आहे. भारतात जीडीपी मोजणारी सांख्यिकी संघटना यासाठी फक्त संघटीत क्षेत्रातूनच माहिती गोळा करते, अनौपचारिक क्षेत्रातून नाही. खरे तर अनौपचरिक क्षेत्राचे योगदान अर्थव्यवस्थेत ४०% हून अधिक आहे. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण २०१५-१६ च्या ७३व्या अहवालानुसार देशात– शेती सोडून– नोंदणी न झालेले ६ कोटी ३० लाख उद्योग आहेत ज्यांच्यामध्ये ११ कोटींपेक्षा जास्त लोक काम करतात. मग जीडीपीची मोजणी कशी केली जाते? औपचारिक क्षेत्रातील वृद्धीलाच अनौपचारिक क्षेत्रातील वृद्धीसमान मानून त्यालाही समप्रमाणात वाढवले जाते. पण दोन्हींच्या वाढीच्या दराला एक समान मानण्याची संकल्पना तथ्याला धरून नाही. नोटबंदीच्या परिणामाबद्दल अनेक विश्लेषकांचे असे मत आहे की याचा अधिक परिणाम अनौपचारिक क्षेत्रावर झाला आहे जिथे रोख चलनाचा उपयोग जास्त होतो. याशिवाय संघटित क्षेत्रातील काही व्यवसायांना तर याचा फायदाही झाला, कारण अनेक लोक रोखीच्या कमतरतेमुळे आणि छोटा व्यापार बंद असल्यामुळे नाईलाजाने आपल्या गरजांच्या पूर्तीसाठी औपचारिक क्षेत्रासोबत व्यवहार करू लागले होते. परंतु अनौपचारिक क्षेत्रातील अनेक व्यवसाय बंद झाले होते आणि मोठ्या प्रमाणावर या क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना बेरोजगार व्हावे लागले होते. अशा लोकांना अजून रोजगार मिळाले नाहीत. बांधकाम आणि वस्तुनिर्माणासहीत हेच व्यवसाय देशातील अर्थव्यवस्थेत सर्वाधिक रोजगार तयार करतात आणि हे सर्वज्ञात आहे की नोटबंदीच्या विनाशक परिणामातून ते अजून बाहेर आलेले नाहीत. यामुळेच अनौपचारिक क्षेत्राच्या वृद्धीदराला औपचारिक क्षेत्राच्या समान मानण्याचा विचार मूळातच त्रुटीपूर्ण आहे आणि जीडीपी वाढीच्या दराला कृत्रिम रुपाने वाढवून दाखवतो.

जीडीपी वाढीच्या दराचा एक महत्वपूर्ण भाग आहे औद्योगिक उत्पादनाची स्थिती. हे उत्पादन मोजण्याच्या पद्धतीत सुद्धा एक अजब गोष्ट समोर येत आहे: पोटात गॅस झाल्यावर घेण्याची औषधे, ज्यांना अँन्टासिड गोळ्या म्हणतात, त्यांचे औद्योगिक उत्पादनात महत्वपूर्ण योगदान आहे! जून २०१७ मध्ये औद्योगिक उत्पादन निर्देशांकाच्या (आय.आय.पी.) वाढीच्या दरात घट झाली आणि तो ऋणात्मक होऊन -०.१०% झाला; पण मजेची गोष्ट अशी की या आकड्यामध्ये सुद्धा गॅसच्या गोळ्यांचा हिस्सा १.५४% होता, म्हणजेच याला काढले तर अजून मोठी घट दिसली असती. एप्रिल आणि मे महिन्यात आय.आय.पी.चा दर अनुक्रमे १.७०% आणि ३.१०% सांगितला गेला, ज्यात गॅसच्या गोळ्यांचे योगदान अनुक्रमे १.९६% आणि २.४२% होते. जुलैची स्थिती पण अशीच होती आणि १.२०% वाढीच्या दरात १.३९% तर गॅसच्या गोळ्यांमुळे होता. म्हणजे औद्योगिक उत्पादनाची वाढ पूर्णत: गॅसच्या गोळ्यांवर टिकलेली आहे! आता एवढ्या गॅसच्या गोळ्या कोण बनवत आहे आणि कोण खात आहे हे तर मोदी-जेटली आणि त्यांचे सरकारच सांगू शकते. परंतु या सर्व बाबी जीडीपी आणि अर्थव्यवस्थेच्या सरकारी आकड्यांना संशयास्पद बनवून टाकतात.

आता आपण अर्थव्यवस्थेतील एकूण मागणीपैकी जीडीपी वाढवणाऱ्या विविध भागांची चर्चा करूयात. याचे ६ भाग असतात – सरकारी उपभोग, खाजगी उपभोग, कायमस्वरुपी भांडवल गुंतवणूक, विदेशी व्यापार खात्याचा हिशोब, वस्तूंच्या साठ्याच्या प्रमाणात परिवर्तन, आणि बहुमोल वस्तू जसे सोने, चांदी, दागिने, कलाकृतीसारख्या वस्तू. द मिंट मधील एका लेखात सुदिप्तो मंडल यांनी योग्य टिपणी केली आहे की आता अर्थव्यवस्थेची स्थिती ६ इंजिने असलेल्या त्या विमानासारखी आहे ज्याची ५ इंजिने बंद पडली आहेत आणि एकाच इंजिनाच्या आधारे ते उडण्याचा प्रयत्न करत आहे.

हे एकटे इंजिन आहे सरकारी उपभोगाचे. अर्थव्यवस्थेतील संकट आणि रोजगारातील संकटामुळे खाजगी उत्पन्न वाढत नाहीये, लोक भविष्याबद्दल साशंक आहेत आणि बाजारात अनावश्यक खरेदी करत नाहीयेत, यामुळेच सर्वसाधारणारित्या जीडीपीला गती देणारा सर्वात मोठा हिस्सा म्हणजे खाजगी मागणी आणि उपभोग हे दबावाखाली आहेत आणि अर्थव्यवस्थेला गती देण्यात असमर्थ आहेत. गेल्या वर्षाच्या पहिल्या तिमाहीत यात ८.४% वाढ झाली होती पण या तिमाहीत ते फक्त ६.१% वाढले आहेत. अशा स्थितीत सरकारी उपभोगातून होणारा खर्च हेच एकमेव इंजिन आहे जे गाडी ओढत आहे. एप्रिल-जून २०१७च्या तिमाहीत यात १७.२% वाढ झाली आहे. परिणाम हा आहे की संपूर्ण आर्थिक वर्षातील सरकारी खर्चाचा अधिकांश, म्हणजे ९२.४%, पहिल्या चार महिन्यांमध्ये म्हणजे जुलै पर्यंत खर्च झाला आहे. पुढे जर जीडीपी वाढण्याच्या गतीला कायम ठेवायचे असेल तर वाढलेल्या आर्थिक तूटीतून म्हणजेच कर्ज घेऊनच होऊ शकते, ज्यातून नंतर जनतेवर करांचा बोजा वाढेल. एक प्रश्न असा सुद्धा उपस्थित होतो की इतका सरकारी खर्च शेवटी कुठे होत आहे ? शिक्षण, आरोग्य, महिला-बाल कल्याण, आदिवासी-दलित कल्याण, अशा कल्याणकारी योजनांवरचा खर्च तर कमी झालाय, मग वाढ कुठे झाली आहे? जर काही भाग पायाभूत सुविधांवर–रस्ते ,वगैरे–खर्च होतो असे मानले तरी सुद्धा हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो. हा खर्च अनुत्पादक सरकारी विभाग म्हणजे पोलिस, नोकरशाही आणि हत्यारांवर केला जातोय का? यातून तर अर्थव्यवस्थेवर म्हणजे जनतेवर बोजा वाढणारच आहे.

सरकारी उपभोगा व्यतिरिक्त अर्थव्यवस्थेतील एकूण मागणीला प्रभावित करणारे अजून दोन घटक आहेत – स्थायी भांडवल गुंतवणूक किंवा स्थायी भांडवल निर्माण आणि व्यापार खात्यावरील जमाखर्च. यापैकी एकूण स्थायी भांडवल निर्मिती २०१६-१७च्या पहिल्या तिमाहीच्या ७.४%च्या तुलनेत वेगाने कमी होऊन या तिमाहीत फक्त १.६%वर आली आहे. जर औद्योगिक उत्पादन निर्देशांकावर लक्ष दिले तर ही घट अजून स्पष्ट होईल – भांडवली वस्तूंचे (कॅपिटल गुड्स) उत्पादन या तिमाहीत ३.९% ने घटले आहे. जर फक्त जून महिन्यातील घटीकडे पाहिले तर घट अजून जास्त म्हणजे ६.८% आहे. याचा अर्थ हा की खाजगी भांडवली गुंतवणूक होत नाहीये कारण अगोदरच मागणी कमी असल्यामुळे स्थापित क्षमतेच्या ७०%वरच उद्योग काम करत आहेत. मग कोणी नवीन उद्योगात गुंतवणूकीची योजना कशी बनवेल? वर्ष २०११-१२ मध्ये भांडवली गुंतवणूकीचा दर ३४% होता. या उच्च स्तरानंतर ही घट कायम चालूच आहे. २०१६-१७ पर्यंत हा दर २९.३%वर आला होता. यामध्येही खाजगी गुंतवणूकीचे योगदान पाहिले तर ते २०११-१२ मधील २७% वरून २०१६-१७ मध्ये २१.९% वर आले आहे. यावर्षी सुद्धा ही घट चालूच आहे. गेल्या मनमोहन सिंग सरकारच्या आणि आत्ताच्या नरेंद्र मोदी सरकारच्या पूर्ण प्रयत्नांनंतरही – ईझ ऑफ डुईंग बिझनेस असो वा मेक इन इंडिया, सर्व प्रकारच्या करांमध्ये सूट, आर्थिक, पर्यावरणीय आणि श्रम कायद्यांमध्ये सुट, इत्यादी – खाजगी भांडवल गुंतवणूक वाढत नाहीये. काही अहवालांनुसार तर भारतीय उद्योजक भारताऐवजी परदेशात जास्त गुंतवणूक करत आहेत. तसेही देशासाठी त्याग करण्याचा राष्ट्रवादाचा धडा फक्त सामान्य जनतेसाठीच असतो, उद्योगपतींसाठी नाही. भांडवलदार राष्ट्रवादासाठी नाही तर जिथे जास्त नफा मिळेल तिथे गुंतवणूक करतात! ६० वर्षांमधील उद्योगांची सर्वात निच्चांकी कर्जवृद्धी सुद्धा याच गोष्टीची पुष्टी करते. यानंतरही एखादा अंधभक्तच यावर भरोसा करू शकतो की अचानक भांडवली गुंतवणूकीची स्थिती सुधारून अर्थव्यवस्थेत तेजी येईल.

जीडीपीमध्ये मागणीचे एक महत्वपूर्ण कारण असते विदेशी व्यापार खात्यावरील जमाखर्च – जो भारतासाठी सुरुवातीपासूनच नकारात्मक आहे कारण देशाचे विदेशी व्यापार खाते शिलकीत नाही तर प्रचंड तोट्यातच चालते. या तिमाहीत हा तोटा गेल्या वर्षाच्या याच तिमाहीच्या तुलनेत २९५% वाढला आहे म्हणजे जवळपास ४ पट झाला आहे. निर्यातीत मंदी आणि आयातीत १३% वाढीने अर्थव्यवस्थेला तगडा झटका दिला आहे. आयातीत मोठी वाढ तेव्हा झाली आहे जेव्हा पेट्रोलियम सहित अनेक वस्तूंचे भाव आंतरराष्ट्रीय बाजारात बरेच कमी आहेत. निर्यातीत मंदीमागे एक कारण तर संपूर्ण भांडवली अर्थव्यवस्थेतील संकटामुळे जागतिक मागणीत घट हे आहे. पण येथेही भारताच्या निर्यातीतील वाढ इतर देशांपेक्षा कमी आहे. याचे कारण आहे भांडवली बाजारात विदेशी भांडवलाला आमंत्रित केल्यामुळे रुपयाची वाढलेली किंमत. यामुळे निर्यात महाग आणि आयात स्वस्त झाली आहे, तर दुसरीकडे देशामध्ये उत्पादन वाढण्याऐवजी फक्त शेअर बाजारातच किमती वाढल्या आहेत.

जीडीपीचे अजून दोन राहिलेले घटक आहेत – साठवणुकीचे प्रमाण आणि बहुमोल वस्तू. जीएसटीच्या तयारीमध्ये साठवणुकीच्या प्रमाणात झालेल्या घटीला सरकार जीडीपी वृद्धीदरातील घटीचे कारण सांगत आहे, पण अनेक विश्लेषकांनी हे तथ्य मांडले आहे की ही घट या तिमाहीत नाही, तर अगोदर पासूनच चालू होती आणि या तिमाहीतील घटीसाठी तिला जबाबदार मानू शकत नाही. जोपर्यंत बहुमोल वस्तूंचा प्रश्न आहे, त्यावर खर्च २००% वाढला आहे जो मागणीच्या दुसऱ्या परिवर्तनाकडे निर्देशित करतो. उत्पादक गुंतवणूकीच्या शक्यता घटल्यामुळे या बहुमोल वस्तूंमध्ये अ-उत्पादक गुंतवणूक वाढली आहे.

अजून एका क्षेत्राकडे लक्ष देण्याची गरज आहे, ते आहे कृषी क्षेत्र. चांगल्या मान्सून मुळे यात उलाढाल वाढली होती आणि उत्पादनही २.३% वाढले आहे. पण किमतीतील घटीमुळे मूल्याच्या स्वरूपात पाहिले तर एकूण उत्पादन फक्त ०.३% वाढले आहे. अर्थातच शेतकऱ्यांना मिळणाऱ्या उत्पन्नात कोणतीच वाढ झालेली नाही, उलट जास्त उलाढालीमुळे श्रम आणि इतर उपकरणांवर खर्च वाढणे निश्चित आहे. अशाप्रकारे या चांगल्या उत्पादनाच्या वर्षातही शेतकऱ्यांचे नुकसान आणि लहान शेतकऱ्यांची दैनावस्था अजूनच वाढली आहे जो भांडवलशाहीचा अनिवार्य परिणाम आहे. परंतु यामुळेही खाजगी उपभोगाच्या मागणीत घटच होते.

सर्व मिळून हे चित्र असे सांगत आहे की अर्थव्यवस्थेत चालू असलेले संकट एका क्षेत्रातील नसून सर्वव्यापक संकट आहे. त्यामुळे आश्चर्य याचे नाही वाटले पाहिजे की जीडीपी वाढीच्या दरात घट झाली आहे, उलट याचे आश्चर्य वाटले पाहिजे की घट इतकी कमी कशी. एवढा वृद्धीदर हे सुद्धा एक आश्चर्यच आहे आणि आपण वर अगोदरच याच्या मोजण्याच्या पद्धतीवर काही प्रश्न उपस्थित केले होते जे याला जबाबदार असू शकतात. या गोष्टीवर विविध भांडवली संस्थांचे विश्लेषक सुद्धा सहमत आहेत. क्रेडीट सूईस इंडियाच्या मते भारतीय अर्थव्यवस्था सध्या अंधार युगातून जात आहे. जीएसटी सहित विविध संरचनात्मक सुधारांमुळे नजिकच्या भविष्यात वृद्धी, आर्थिक आरोग्य, चलनवाढ, चलन आणि बँकींग व्यवस्थेबद्दल अनिश्चिततेची स्थिती निर्माण झाली आहे. व्यापक आर्थिक मोर्चावर अनिश्चिततेमुळे भारतीय अर्थव्यवस्था घनदाट धुक्यातून प्रवास करत आहे. यामुळे गुंतवणूकीवर परिणाम होणार, ज्यामुळे वृद्धी कमी होईल, जीडीपीही घटेल आणि पुढील आर्थिक वर्षासाठी उत्पन्नाचा अंदाजही प्रभावित होईल. सरकारी बँक असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाचे सुद्धा म्हणणे आहे की ही घट तात्कालिक नसून संरचनात्मक आहे आणि येणाऱ्या अनेक तिमाह्यांमध्ये यातून निघण्याची शक्यता नाही. स्वत: अर्थमंत्री अरूण जेटलींनाही मानावे लागले आहे की हे चिंताजनक आहे पण भाजप अध्यक्ष अमित शहा याला 'तांत्रिक समस्या' म्हणत आहेत. कदाचित त्यांच्या सोशल मीडिया प्रचाराच्या तंत्रात या प्रश्नाला मुरड घालून अर्थव्यवस्थेच्या गतीला वाढवण्याचा उपाय नसावा!

खरेतर वास्तव हे आहे की हे सर्व खाजगी संपत्ती आणि नफ्यावर आधारित भांडवली उत्पादन व्यवस्थेच्या सतत गंभीर होत चाललेल्या संकटाचाच एक अनिवार्य भाग आहे. या कायमस्वरूपी संकटामुळेच नवीन रोजगार निर्माण होत नाहीये, खरेतर मजूरी कमी होत आहे, सामान्य जनतेच्या उत्पन्नातील घटीमुळे बाजारात मागणी घटत आहे. स्थापित भांडवली गुंतवणूकीतून होणारे उत्पादन बाजाराच्या मागणीपेक्षा जास्त होते आणि त्यामुळे नवीन भांडवली गुंतवणूक बंद होऊन, स्थापित उद्योगांमधील गळाकापू स्पर्धेमुळे अनेक उद्योग बंद होतात. या संकटाचे कोणतेही कायमस्वरुपी उत्तर भांडवली उत्पादन व्यवस्थेकडे नाही, त्यामुळेच संकटाला समाप्त करण्याचे सर्व प्रयत्न नवीन संकटाला जन्म देतच राहतात. पण शेवटी या संकटाचा मार कष्टकरी वर्गालाच भोगावा लागतो.

**अनुवाद : अभिजित**

# गोरक्षणाचे गौडबंगाल - फासीवादाचा खरा चेहरा

वारुणी पूर्वा

*"जेव्हा पहिल्यांदा कळाले की साथींच्या हत्या झाल्या, तेव्हा दहशतीच्या घोषणा दिल्या गेल्या.नंतर शेकडो हत्या झाल्या, मग हजारो,आणि जेव्हा हत्यांना सीमाच राहिली नाही तेव्हा स्मशान शांततेचे सावट पसरलेलं होतं. जेव्हा संकटे पावसासारखी येतात, तेव्हा कोणी आवाज देत नाही – 'थांबा, थांबा!'जेव्हा अन्यायाचे डोंगर उभे राहतात तेव्हा अन्याय नजरे आड लपून बसतात!"*

**– बर्टोल्ट ब्रेष्ट**

अगोदर अखलाख, नंतर अबु हनिफा, नंतर आर. सुरज, नंतर अलिमुद्दीन अंसारी, जुनैद, पहलू खान, आणि न जाणे अजून किती! २०१७ सालाच्या पहिल्या ६ महिन्यात गोरक्षणाच्या संदर्भातील जवळपास २० हल्ल्यांचे अहवाल समोर आलेत. हा आकडा २०१६ सालच्या आकड्यांपेक्षा ७५ टक्के जास्त आहे. या हल्यांमध्ये जमावाकडून हत्या (मॉब लिंचिंग), गोरक्षकांकडून हल्ले, हत्या आणि हत्येचे प्रयत्न, अत्याचार आणि काही प्रकरणांमध्ये तर सामुहिक बलात्कारासारखे निर्घृण अपराध सुद्धा घडले आहेत. जुन २०१७ मध्ये जमावाद्वारे हत्येच्या ज्या घटना समोर आल्या, त्यामध्ये गाईच्या संबंधातील हत्येच्या प्रमाणात आश्चर्यजनक वाढ झाल्याचे दिसून येते (हे प्रमाण अगोदर ५ टक्के होते पण जूनच्या शेवटी हे प्रमाण वाढून २० टक्के झाले होते). जर नीट पाहिले तर या हिंसक जमावामागे एक सुनिश्चित विचारधारा आणि राजकारण दिसून येते. हा फक्त कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नाही. उलट २०१४ नंतर ज्या आश्चर्यकारक रुपात जमावाद्वारे हत्यांच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे आणि ज्याप्रकारे बहुतेक मामल्यांमध्ये मुस्लिम आणि दलितांना लक्ष्य करण्यात आले आहे, त्यावरून साफ दिसून येते की आर.एस.एस. आणि सर्व फासिस्त गुंडसेनांनी एका सुव्यवस्थित प्रचार मोहिमेद्वारे लोकांमध्ये एक खोटी चेतना निर्माण केली आहे आणि त्यांच्यासमोर एक नकली शत्रू उभा करून काही विशिष्ट धर्म, जात, वंश किंवा राष्ट्राविरोधात विष पसरवण्याचे काम ते करत आहेत. सत्तेत असलेल्या भाजप सरकारने या फासिस्त गुंडसेनांना पूर्ण मोकळीक दिली आहे. आता मुद्दा गोरक्षणाचा असो, लव्ह जिहादचा असो किंवा धर्मपरिवर्तनाचा असो – या सर्व मुद्यांच्या नावाने जमावाकडून जो हिंसेचा खुनी खेळ खेळला जात आहे ते खरेतर फासिस्त शक्तींचे राजकारण आहे.

दलाल कॉर्पोरेट मीडिया असे सांगत आहे की जमावाकडून हत्येच्या घटना पूर्वीही होत होत्या आणि त्यांचा भाजप सरकारशी काही संबंध नाही. अशा घटना पूर्वी होत नव्हत्या याला आम्ही नकार देत नाही, पण विचार करण्याची गोष्ट आहे की २०१० पासून आजपर्यंत गोहत्येसंदर्भातील हल्ल्यांमध्ये जितके मृत्यू झाले आहेत, त्यामध्ये ८६% मुस्लिम आहेत आणि त्यातही ९६.८% हल्ले २०१४ नंतर झाले आहेत. ६३ पैकी ३२ घटना भाजप शासित राज्यांमध्ये का झाल्या आहेत? इंडिया-स्पेंडच्या एका अहवालानुसार गेल्या ७ वर्षात जमावाकडून हत्येच्या घटनांमध्ये जवळपास २८ लोकांचा मृत्यू झाला आहे, ज्यात २४ लोक मुस्लिम होते. यापैकी निम्म्याच्यावर हल्ले (५२%) अफवांवर आधारित होते. इंडिया-स्पेंडच्या अहवालात असेही दिसून आले आहे की गेल्या ८ वर्षांमध्ये अशा ६३ हल्ल्यांपैकी ६१ हल्ले २०१४-२०१७च्या दरम्यान झाले आहेत आणि अशा हल्ल्यांमधील ५% घटनांमध्ये कोणालाही अटक झालेली नाही. उलट १३ घटनांमध्ये (म्हणजे २१%) पोलिसांनी पीडीत व्यक्तींच्या विरोधातच गुन्हा दाखल केला आहे. असे दिसून आले आहे की यापैकी २३ घटनांमध्ये विश्व हिंदु परिषद, बजरंग दल आणि स्थानिक गोरक्षण समिती सारख्या कट्टर हिंदुत्ववादी फासिस्त संघटना सक्रीय होत्या.

अशा घटनांवर सरकारचे मौन आणि निष्क्रियतेमुळे फासिस्त शक्तींना बळ मिळत आहे. जमावाकडून हत्येच्या वाढत्या घटनांना पाहता संपूर्ण देशाच्या स्तरावर 'नॉट इन माय नेम' या नावाने विरोध, निदर्शने होऊ लागली तेव्हा पंतप्रधान मोदींना आपले मौन सोडावे लागले. त्यांनी विरोध तर केला पण एकदम दबलेल्या स्वरात. दुसरीकडे भाजपचे सर्व नेते-मंत्री अशी वक्तव्ये देत आहेत की "मुस्लिमांना मुस्लिम म्हणून राहण्यासाठी गो-मांस खाणे आवश्यक नाही. गोमांस खाणे बंद केले तरी ते मुस्लिम असू शकतात. असे कुठे लिहिलेले नाही की मुस्लिम किंवा ख्रिश्चनांना गोमांस खावेच लागते!" – हे होते हरियाणाचे मुख्यमंत्री मनोहर लाल खट्टर यांचे शब्द! दुसरीकडे – भाजपचे खासदार सत्यपाल सिंह यांनी दादरी हत्याकांडाला जुजबी घटना म्हणणे किंवा भाजप खासदार साक्षी महाराजांचे वक्तव्य की जर कोणी त्यांच्या आईला मारण्याचा प्रयत्न करेल तर ते चुप बसणार नाहीत. ते हत्या करायला आणि मारायला तयार आहेत! या सर्व गोष्टींमधून हेच दिसून येते की वर्तमान सरकारकडून गोरक्षणाच्या नावावर होत असलेल्या राजकारणाचे समर्थन अशा प्रकारच्या उन्मादी जमावांना प्रोत्साहन देत आहे. या हिंदुत्ववादी फासिस्त शक्तींना जमावाद्वारे हत्यांमधून दहशत निर्माण करून, धार्मिक अल्पसंख्य व दलितांना असे दुय्यम नागरिक बनवायचे आहे ज्यांच्यासाठी कायदा आणि लोकशाही अधिकारांचा काहीच अर्थ नसेल.

**फासिस्त शक्तींच्या गाईच्या राजकीय सवारीचा इतिहास**

धर्मवादी शक्तींकडून गोरक्षणाचा मुद्दा नेहमीच उचलला गेला आहे. स्वतंत्र भारतात आर.एस.एस.ने सतत गोमांस प्रतिबंधक कायद्याच्या मुद्याला एका जन-अभियानाच्या स्वरूपात उचलले आहे. राम मंदिराच्या मुद्याच्याही अगोदर या मुद्यावर जोर दिला गेला होता, पण १९८० पर्यंत यावर लोकांची कोणतीही विशेष प्रतिक्रिया दिसून आली नाही. गाईला खूप काळापासून एका राजकीय वाहनाच्या स्वरूपात वापरले गेले आहे आणि अनेकदा हे हिंदू-मुस्लिम दंगलींचे कारणही बनले आहे. गाईच्या राजकीय सवारीचा इतिहास दयानंद सरस्वतींकडून १८८२ मध्ये गौरक्षिणी सभेच्या स्थापनेपासून चालू होतो आणि या संघटनेच्या सक्रियतेमुळे १८८० व १८९० मध्ये भारतात अनेक ठिकाणी दंगली झाल्या. ब्रिटीश सरकार तर अशा प्रकारच्या गोष्टींना अजून उत्तेजन देण्याचे काम करत होते!

गोरक्षणाचा मुद्दा राज्यघटना निर्मितीच्या वेळी पण उचलला गेला. केंद्रीय स्तरावर पूर्णरूपाने गोमांस प्रतिबंधक कायदा बनवण्याची मागणी खासदार सेठ गोविंद दास व पंडीत ठाकूर भार्गव यांनी केली. त्यांनी मागणी केली की या मुद्याला राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वांऐवजी मुलभूत अधिकारांमध्ये सामिल केले जावे. पण हे मत बहुमताला स्विकार्ह नव्हते. शेवटी राज्यघटनेच्या कलम ४८ अंतर्गत असे म्हटले गेले की "आधुनिक आणि वैज्ञानिक दिशेने कृषि आणि पशुपालनाला नियोजित करण्याचा राज्यसत्ता पूर्ण प्रयत्न करेल आणि विशेषत: गाय व वासरांसहीत इतर दुग्ध जनावरांच्या व त्यांच्या विविध प्रजातींच्या सुधारासाठी पावले उचलेल आणि त्यांच्या हत्यांवर बंदी आणली जाईल." गोहत्येवर पूर्ण बंदीला राज्यघटनेकडून शाश्वती न मिळाल्यामुळे, अनेक राज्यांनी इतर कायद्यांद्वारे गोहत्येचे अपराधीकरण करून पर्याय शोधला.

पुढे जाऊन संघ परिवाराने या मुद्याचे 'महत्व' समजून घेत गोहत्येवर संपूर्ण बंदी आणण्याची मागणी घेऊन लोकांना गोलबंद करणे चालू केले. पहिले पाऊल होते १९६६ साली सुरू झालेले गौरक्षा (गोरक्षण) आंदोलन. पुढे ७ नोव्हेंबर १९६६ रोजी गोरक्षण समूहांकडून दिल्लीमध्ये एक मोठे निदर्शन आयोजित करण्यात आले, ज्यात प्रभुदाम ब्रह्मचारी, एम.एस. गोळवलकर, शेठ गोविंद दास, दिग्विजय नाथ सामील होते. गोरक्षक समूहांशिवाय हजारोंच्या संख्येने साधू एकत्र आले होते आणि सोबतच राम राज्य परिषद, विश्व हिंदू परिषद आणि आर.एस.एस.चे सदस्य मोठ्या संख्येने सामील होते. या निदर्शनांमध्ये गाईच्या हत्येवर बंदी आणण्याची मागणी करणाऱ्या हजारो लोकांनी संसदेवर हल्ला केला. पोलिस आणि आंदोलनकर्त्यांच्या चकमकीत एका पोलिसासहीत ८ लोक मारले गेले. यानंतर १९६७ साली इंदिरा गांधींनी या मुद्यावर एक समिती स्थापन केली, ज्यात अशोक मित्र (अर्थशास्त्रज्ञ) आणि डॉक्टर व्ही. कुरियनसहीत आर.एस.एस.चे सरसंघचालक गोळवलकर सुद्धा सामील होते. या समितीला आपला अहवाल सहा महिन्यात द्यायचा होता, पण यावर पुढे काहीच कारवाई झाली नाही. या आंदोलनातून संघ परिवाराला विशेष काही मिळाले नाही. यानंतर सुद्धा संघ परिवार या मुद्याला धरून सक्रीय राहिला. या दरम्यान 'पवित्र गाईला'घेऊन अनेक प्रकारची मिथकं रचण्यात आली, ज्यांनी लोकांच्या मनात विष कालवण्याचे काम केले. या लेखात पुढे आपण चर्चा करूयात की कशाप्रकारे आर.एस.एस. आणि संघ परिवाराने एका विशिष्ट धर्मातील लोकांना लक्ष्य केले.

भारतीय जनसंघ सामील असलेल्या जनता पार्टीचे सरकार दिल्लीत आल्यावर, १९७७-७९ मध्ये गोरक्षण कायद्यांमध्ये बदल झाला. गोवा, दमन व दीव आणि हिमाचल प्रदेशात गोहत्या प्रतिबंधक कायदा जनता पार्टीच्या कार्यकाळात आला. दिल्लीत पहिल्यांदा १९९४ साली मदनलाल खुराणा यांच्या नेतृत्वात सत्तेत आलेल्या भाजप सरकारने गोमांस बाळगणे किंवा खाणे याला अपराधाच्या श्रेणीत आणले. गुजरात मध्ये २००५ साली मोदी सरकारच्या निर्णयामुळे, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या सौजन्याने, गोमांस बाळगणे आणि पशू वध करणे यावर पूर्ण बंदी घालण्यात आली; मग भले त्या भाकड गाई का असेनात! (जर आपण राज्यघटनेनुसार पाहिले तर कलम ४८ नुसार – 'आधुनिक आणि वैज्ञानिक दृष्टीने पशुपालनाला प्रोत्साहन देणे'व 'त्यांच्या प्रजातीचे संरक्षण आणि सुधार'हा मुद्दा आहे – गोहत्येवर पूर्ण बंदी अशा 'आधुनिक'पशुपालनाच्या पद्धतीच्या विरोधात आहे, कारण वैज्ञानिक दृष्टीकोणातून म्हातारी-आजारी गाय जी दुधारू आणि प्रजननास लायक नाही तिला मारणे, ही पशुपालन आणि वंशसुधाराची महत्वपूर्ण पद्धत आहे. त्यामुळे गोहत्येवर पूर्ण बंदी ही राज्यघटनेच्या दृष्टीने न्याय्य नाही.)

आर.एस.एस.शी संबंधित अतिरेकी हिंदू संघटनांकडून गोहत्येवर अखिल भारतीय बंदी आणि गोहत्येसाठी कडक शिक्षेची मागणी जोर धरू लागली होती. या गोरक्षण आंदोलनांसाठी असा तर्क दिला जात होता की भारतात गोहत्या थांबवण्यासाठी कोणतीही कायदेशीर यंत्रणा अस्तित्वात नाही. हे धादांत खोटं होतं! गोहत्येवर कायदेशीर बंदी नवीन गोष्ट नव्हती! उत्तर-पूर्वेतील राज्यं सोडली तर इतर सर्व राज्यांमध्ये याप्रकारची बंदी खूप काळापासून अस्तित्वात आहे – उदाहरणार्थ दिल्ली, आंध्र प्रदेश व बिहार मध्ये 'गाय व वासरांना'कापण्यावर पूर्णत: बंदी आहे. परंतु विविध राज्यांच्या कायद्यांमध्ये 'गोमांसाची' व्याख्या एकसारखी नाही आणि बंदीचे स्वरूपही वेगवेगळे आहे. अनेक राज्य कायद्यात पशू आणि अनुपयुक्त पशुंमध्ये फरक करतात. महाराष्ट्रात १९७६ पर्यंत गाईची हत्या आणि गोमांसावर बंदी होती पण हा कायदा १९९५ मध्ये बदलण्यात आला आणि महाराष्ट्र ॲनिमल प्रिझर्वेशन (अमेंडमेंट) कायद्यानुसार म्हैस आणि बैलाच्या मांसालाही बंदीच्या श्रेणीत आणले गेले, पण रेड्यांना मारण्यावर बंदी नव्हती. गोवा आणि आंध्र प्रदेशात 'गाय'शब्दाच्या व्याख्येत दुभती गाय, आणि गाईची पुरुष व मादा वासरं होती. कर्नाटक, आंध्र प्रदेश, गोवा आणि मध्य प्रदेशामध्ये १२-१५ वर्षांपेक्षा अधिक वयाचे पशू किंवा दूध आणि प्रजननासाठी अयोग्य वयस्कर म्हशी व बैलांना 'फिट फॉर स्लॉटर' (हत्येसाठी योग्य) प्रमाणपत्र घेऊन मारण्याची परवानगी आहे. आसाम, केरळ, कर्नाटक आणि बंगालमध्ये 'फिट फॉर स्लॉटर'प्रमाणपत्र घेऊन फक्त बैल किंवा म्हैसच नाही तर गाईलाही मारण्याची परवानगी आहे. अरूणाचल प्रदेश, मिझोराम, मेघालय आणि नागालँड मध्ये या संदर्भात कोणताही कायदा नाही.

पण संघ परिवार या कायद्यांनी संतुष्ट नव्हता. त्यांना माहित होते की कडक बंदीची मागणी म्हणजे छापा मारणे, अटक करवणे आणि मुस्लिम, दलित, अनुसुचित जातींविरोधात संघटीत हिंसेचे मार्ग कट्टरतावाद्यांसाठी खुले करणे. आणि त्यांनी असेच केले! याच मुद्याला २०१४ च्या निवडणुकीत भाजपने एक मोठा मुद्दा बनवले. यावरच अंमलबजावणी करत मार्च २०१५ मध्ये महाराष्ट्र आणि हरियाणात गोहत्या बंदी कायदे मंजूर करण्याची आणि सुधारित करण्याची प्रक्रिया चालू झाली. यावेळी गोहत्या कायद्यांमध्ये नविन असलेली गोष्ट म्हणजे शिक्षा आणि दंडामध्ये झालेली वाढ. पूर्वी हरियाणामध्ये गोहत्येसाठी जास्तीत जास्त शिक्षा ५ वर्षे किंवा ५ हजार रुपयांचा दंड किंवा दोन्ही अशी होती. पण नवीन कायद्यात कमीत कमी ३ वर्षे सक्तमजूरी जी १० वर्षांपर्यंत वाढवली जाऊ शकते, आणि ३० हजार ते १ लाख रुपये दंडाची तरतूद आहे. गाईच्या व्याख्येमध्ये बैल, म्हैस, गाय व वासरू आणि म्हाताऱ्या व आजारी गाईसुद्धा सामील आहेत. अशाचप्रकारे गुजरात मध्ये २०११साली ज्या कायद्यात सात वर्षे तुरुंगवास आणि ५० हजार रुपये दंडाची तरतूद होती, त्याच कायद्यात २०१७ साली सुधार करून कमीत कमी १० वर्षे शिक्षा आणि जास्तीत जास्त जन्मठेपेच्या शिक्षा तसेच दंडाची किंमत १ ते ५ लाख करण्यात आली आहे. गुजरातच्या कायद्यात सुधारणा होण्याअगोदर सर्वात कडक कायदा जम्मू-काश्मिरमध्ये होता. महाराष्ट्र ॲनिमल प्रिझर्वेशन ॲक्ट १९७६ मध्येही याच प्रकारे शिक्षा आणि दंडाची तरतूद होती, जी आता ५ वर्षांवरून १० वर्षांचा तुरुंगवास करण्यात आली आहे. विडंबना ही की आता गोहत्येची शिक्षा बलात्कारासारख्या गंभीर अपराधापेक्षाही (७ वर्षे) जास्त आहे.

हे सगळे कमी होते म्हणून की काय गेल्या वर्षी मे महिन्यात मोदी सरकारने प्रिव्हेंशन ऑफ क्रुएल्टी टू ॲनिमल्स ॲक्ट १९६० मध्ये एक नवीन कलम जोडले आहे, ज्यानुसार संपूर्ण देशात गाईची विक्री फक्त शेतीच्या निमित्ताने होऊ शकते, वध करण्यासाठी नाही. नवीन कायद्यात असेही म्हटले आहे की योग्य, म्हाताऱ्या किंवा अयोग्य गाईंना विकले जाऊ शकत नाही. या नवीन नियमात 'पशुधना'मध्ये बैल, गाय, म्हैस, वांझ बैल, कालवड आणि वासरासहीत उंटही सामील आहे. सोबतच अहवालात असेही म्हटले आहे की जनावरांचे बाजार जे बहुतेक

**पान १३ वर**

# गोरक्षणाचे गौडबंगाल - फासीवादाचा खरा चेहरा

पान १२ वरून

राज्यांमध्ये साधारणत: सीमेच्या जवळ आयोजित होतात त्यांना आता स्थानांतरीत करावे कारण नवीन नियमांनी त्यांना आंतरराष्ट्रीय सीमेच्या ५० किलोमीटर आणि राज्य सीमेच्या २५ किलोमीटरमध्ये प्रतिबंधित केले आहे. गाईच्या रक्षणासाठी लागू झालेला हा पहिला केंद्रीय कायदा आहे!

अशा कायद्यांनी हिंदुत्ववादी शासन असलेल्या राज्यांमध्ये एक स्पर्धाच निर्माण केली आहे. गोरक्षणाच्या मुद्याला कायदेशीर आवरण घालून भाजप गोरक्षक दलांना गाईच्या मुद्यावर गुंडगिरी करण्याची खुली परवानगी देत आहे. २०११-१४ दरम्यान गुजरातमध्ये गोरक्षक दलांच्या संख्येत बरीच वाढ दिसून आली. सरकारी वेबसाईट गौसेवा (गोसेवा) व गौचर विकास बोर्ड यांच्या मते गुजरातेतील मोदी सरकारने १,३९४ गोरक्षकांना ७५ लाख रुपयांची बक्षिसं दिली. त्यांच्या सरकारने अनेक प्रकारच्या योजना लागू केल्या ज्यामुळे अशाप्रकारची गोरक्षक दलं अजून बहरू लागली, उदाहरणार्थ पशुतस्करांविरुद्ध एफ.आय.आर. दाखल करवणाऱ्याला ५०० रुपये रोख बक्षिस. वेबसाईट नुसार गोसेवा आणि गौचर विकास बोर्ड (पशुपालन विभागाअंतर्गत स्थापन झालेला एक सरकारी बोर्ड) यांचे मुख्य काम गोरक्षक दलांसोबत मिळून अशा सर्व तस्करांचे पितळ उघडे पाडणे आहे आणि आता हरियाणातील खट्टर सरकार सुद्धा काही प्रमाणात असेच काम करत आहे.

एका बाजूला भाजपने कायदेशीर रूपाने कट्टरतावादी शक्तींसाठी संघटीत हिंसेचे दरवाजे उघडले आहेत आणि दुसरीकडे आर.एस.एस. आणि या सर्व फासिस्त शक्ती अनेक प्रकारच्या कॅडर-आधारित यंत्रणा, मीडिया आणि आपल्या प्रचार तंत्राद्वारे तळागाळातील स्तरावर सतत लोकांमध्ये एका 'खोट्या चेतनेची'निर्मिती करत आहेत, जी जमावाच्या स्वरूपात हिंसेचे खेळ खेळत आहे. 'पवित्र गाईच्या'बाबतीत अशाच अनेक खोट्या गोष्टींचा प्रचार संघ जागोजागी करत आहे. उदाहरणार्थ की सर्व हिंदू गोहत्येच्या आणि गोमांस खाण्याच्या विरोधात आहेत किंवा हिंदू संस्कृती आणि परंपरेने गोहत्येला अपवित्र मानले आहे. ही गोष्ट खरी आहे की हिंदूंमध्ये काही जाती आणि समुदाय गाईला पूज्य आणि गोहत्येला निकृष्ट मानतात पण हे सुद्धा खरे आहे की भारतातील सर्व हिंदू समुदायांचे किंवा जातींचे आजच्या किंवा अगोदरच्या काळात असे मत नव्हते.

### संघ परिवाराचे 'पवित्र'गाईचे मिथक

संघ परिवाराकडून पसरवले जाणारे पहिले असत्य हे की हिंदू संस्कृतीने नेहमीच गोहत्येला निकृष्ठ मानले आहे. संघाने भारतात गोमांस खाण्याच्या प्रथेला इस्लाम सोबत जोडण्याचा प्रयत्न केला आहे (यात लक्षात घेण्याजोगी बाब ही की मुघल सम्राट बाबर, अकबर, जहांगीर आणि औरंगजेबाने जैन व ब्राह्मणी भावनांना समायोजित करण्यासाठी गोहत्येवर बंदी घातली होती) आणि गोमांस खाण्याला मुस्लिम समुदायाची ओळख म्हणून स्थापित करण्याचा प्रयत्न सतत केला आहे. लोकांमध्ये या भ्रमाचा प्रसार करण्याचे काम संघ व्यवस्थित करत आहे की मुस्लिमांनी गोमांस खाणे चालू केले कारण मुस्लिम नेहमीच हिंदू संस्कृती विरुद्ध असतात आणि हिंदू संस्कृतीने आदीकाळापासून गाईला पवित्र आणि गोहत्येला निकृष्ठ व पाप मानले आहे.

भारतात इस्लाम येण्याच्या खूप अगोदर पासून गोमांस खाण्याची प्रथा प्रचलित होती. प्राचीन भारतीय ग्रंथांमध्ये पुरेसे पुरावे उपलब्ध आहेत जे हे सिद्ध करतात की गोमांस खाण्याची प्रथा भारतात अनेक शतकांपासून प्रचलित आहे. वैदिक काळात (जवळपास ई.स.पूर्व ८००-१५००) भारतात 'पवित्र'गाय अशी कुठलीही कल्पना अस्तित्वात नव्हती. वैदिक आर्यांच्या धार्मिक कर्मकांडांमध्ये अनेकदा गाईचा बळी दिला जात होता. या विषयावर डी.एन.झा यांचे पुस्तक 'द मिथ ऑफ द होली काउ' (पवित्र गाईचे मिथक) यात खुप सविस्तर चर्चा केली आहे आणि तथ्यांसहीत सिद्ध केले आहे की हिंदू संस्कृतीने नेहमीच गोहत्येला निकृष्ठ मानलेले नाही.

वैदिक काळात पशूंचे बळी दिले जात होते, ज्यांना 'पासुबंध्य'म्हटले जाई याचे अनेक भाषिक आणि पुरातात्विक स्त्रोत उपलब्ध आहेत. ऋग्वेदात अनेकदा देवतांद्वारे बैलाचा बळी देण्याचा उल्लेख आढळतो. ऋग्वेदात एका जागी 'इंद्र'जो वैदिक देवतांमध्ये सर्वात पूज्य होता, म्हणतो की 'ते माझ्यासाठी १५ पेक्षा जास्त बैलांचा बळी देत'. ऋग्वेदानुसार 'अग्नि देवते'चे भोजन म्हणजे बैल आणि भाकड गाई होते. एका अध्यायात असे म्हटले आहे की मृतकांच्या दहनविधी दरम्यान शरीर जाळण्यासाठी गाईच्या मांसाचा उपयोग केला जात होता. उत्तर वैदिक काळात सुद्धा पशू वध प्रचलित होता. 'मित्र'आणि 'वरूण'यांना गाईचे बळी देण्याचा उल्लेख उत्तर वैदिक ग्रंथांमध्ये मिळतो. अश्वमेघ आणि राजसूय यज्ञांसारख्या यज्ञांमध्ये जनावरांचा बळी दिला जात होता, ज्यात विशेषत: बैल आणि म्हैस सामील होते. अग्रेयाध्याय नावाने प्रथा होती जी कोणत्याही सार्वजनिक बळी विधीच्या अगोदर केली जात होती आणि त्यात गाईचा बळी देणे अनिवार्य मानले जाई. शतपथ ब्राह्मणासहीत अनेक वैदिक ग्रंथांनी हे घोषित केले की सर्वात चांगला अन्न प्रकार म्हणजे मांस. महाभारतात रंतिदेव नावाच्या राजाचा उल्लेख आहे जो ब्राह्मणांमध्ये खाद्य वस्तू आणि गोमांसाचे वितरण करण्यासाठी प्रसिद्ध होता. मनुस्मृतीमध्ये सुद्धा मांस खाण्यावर बंदी नाही. देवता आणि पाहुण्यांच्या सन्मानामध्ये मांस खाणे प्रचलित होते, परंतु नेहमी मांस खाणे योग्य मानले जात नव्हते. पुराणात (ज्याचे संकलन इसवी शतकांपासून ते अठराव्या शतकांपर्यंत केले गेले) सुद्धा अनेक प्रकारचे पुरावे मिळतात. त्या काळातही मांस खाण्यावर बंदी नव्हती. नारद्यम पुराणात पाहुण्यांच्या सन्मानात केल्या जाणाऱ्या गोहत्येवर बंदी होती (जी बरीच प्रचलित होती), पण ती सुद्धा एका अस्विकृतीपेक्षा जास्त नव्हती.

बौद्ध ग्रंथांमध्ये दिसून येते की बुद्ध काळात सुद्धा गोमांस खाणे प्रचलित होते; जरी बुद्ध स्वत: पशुहत्येच्या विरोधात होते. परंतू धार्मिक कर्मकांडांमध्ये पशुवध ही एक प्रचलित पद्धत होती. पहिल्या सहस्त्रकामध्ये धर्मशास्त्रांमध्ये गोहत्येची अस्विकृती दिसून येते. यामागे कारण आहे मध्ययुगीन काळात ग्रामीण व्यवस्थेत झालेले अनेक बदल – याकाळात मोठ्या प्रमाणात शेतीचा विस्तार झाला आणि व्यापार संकुचित होऊ लागला! शेती जो अगोदर फक्त वैश्यांचा व्यवसाय मानला जात होता, आता त्यांच्यापर्यंतच मर्यादित राहिलेला नव्हता. पुजाऱ्यांना भुमी दान दिले जाऊ लागले होते व ब्राह्मणांसहीत इतर जातीही शेती व्यवसाय करू लागल्या होत्या. याप्रकारे शेती आणि पशुपालन अर्थव्यवस्थेत एक महत्वपूर्ण भुमिका बजावू लागले होते. यावेळी वैदिक बलिदानाच्या प्रथेऐवजी जमीन किंवा पशुदान करण्याची प्रथा अस्तित्वात आली, ज्यामुळे पशुवध थांबवण्यासाठी पशुहत्येला निकृष्ठ मानण्याची आणि बंदी आणण्याची मानसिकता रुजवण्याची सुरूवात झाली. याच काळात सुद्धा अनेक जागी धार्मिक कार्यांमध्ये पशुवध आणि गोहत्येचे पुरावे मिळतात आणि या काळातही गोहत्येला शिक्षेच्या श्रेणीत आणले गेले नव्हते.

अशा प्रकारे आपण पाहू शकतो की गोहत्या प्राचीन काळापासून हिंदू संस्कृतीमध्ये निकृष्ट मानली गेलेली नव्हती. अगदी मनुस्मृती आणि पुराणांमध्ये सुद्धा याच्या अगदी उलट गोष्ट करण्यात आली आहे. नंतरच्या काळातही यावर बंदी आली होती पण तीचे उल्लंघन केल्यास शिक्षेची तरतूद नव्हती. यावर जास्त जाणून घेण्यासाठी डी.एन.झा यांचे वर उल्लेखलेले पुस्तक तुम्ही वाचू शकता.

आजही फक्त मुस्लिम गोमांस खात नाहीत, तर हिंदू धर्मातीलही अनेक जाती गोमांस खातात. केरळ मध्ये ७२ जाती आहेत, ज्यापैकी अनेक हिंदू आहेत, ज्या गोमांस खातात. याशिवाय अनेक खालच्या म्हटल्या जाणाऱ्या जातीही गोमांस खातात. सर्वसाधारणपणे दलित, आदिवासी आणि क्षुद्र समजल्या जाणाऱ्या समुदायांमधील खालच्या स्तरांमध्ये मांस खाल्ले जाते. गोमांस हे प्रथिनांचा सर्वात स्वस्त स्त्रोत असल्यामुळे ते यावर अवलंबून आहेत. याकडेही लक्ष दिले पाहिजे की जगाच्या स्तरावर गोमांस खाणाऱ्यांमध्ये भारत सातव्या स्थानावर आहे.

### गोमांस बंदी कायद्याचे आर्थिक आणि सामाजिक परिणाम

२०१४च्या निवडणुकीच्या वेळी गोमांस बंदी लागू करणे हा भाजपच्या प्रमुख मुद्यांपैकी एक मुद्दा होता. मोदी सरकारद्वारे 'गुलाबी क्रांती'(पिंक रिव्होल्यूशन) वर बंदी आणण्याचा तर्क होता की यामुळे "गाईंचा विनाशकारी वध"होत आहे. हा तर्क एकदम खोटा सिद्ध झाला – २०१२ मध्ये जनावरांच्या जनगणनेतून लक्षात आले की भारतात गाईंच्या संख्येत ६.२ टक्के दराने वाढ झालेली आहे! यातून गाईंचा मोठ्या प्रमाणात वध होण्याचा निष्कर्ष खचितच निघत नाही! उलट खुद्द भाजपच्या कार्यकाळात बीफचे निर्यात २३% होत आहे. २०१४-१५ मध्ये भारताने ६५ देशांमध्ये २.४ कोटी टन म्हशीचे मांस निर्यात केले. हे मांस ३०,००० कोटी रुपयांचे होते आणि भारताच्या एकूण निर्यातीचा १ टक्के हिस्सा होते – ज्याला आता 'गुलाबी क्रांती'चा हिस्सा म्हणू शकतो! गोरक्षणाचा ढोल पिटणाऱ्या भाजपाने हरियाणा, गुजरात व महाराष्ट्रामध्ये गोरक्षण कायद्यांमध्ये बदल करून शिक्षा आणि दंडामध्ये वाढ केली आणि आत्ता मेघालयाच्या विधानसभा निवडणुकीकडे पाहून तेथे बीफ स्वस्त करण्याची गोष्ट ते करत आहेत!

तसे तर अगोदरपासूनच भाजप शासित राज्यांमध्ये गोमांस बंदी कायद्यांमधील बदलांमुळे बीफ उद्योग आणि चामडे उद्योगाचे खुप नुकसान झाले आहे. मे महिन्यात भाजप सरकारने केंद्रीय स्तरावर प्रिव्हेंशन ऑफ क्रुएल्टी टू ॲनिमल्स ॲक्ट १९६० मध्ये एक नवीन कलम जोडले आहे, ज्यानुसार त्याच बाजारांमध्ये जनावरांची खरेदी-विक्री होऊ शकते जे नोंदणीकृत आहेत आणि तेथेही गाईची विक्री फक्त शेतीविषयक कारणांमुळेच होऊ शकते, वधासाठी नाही. यामुळे निर्यात, रोजगार आणि बीफ उद्योग व चामडे उद्योग मोठ्या प्रमाणात बाधित झाले आहेत. भारत सरकारने २३ मे रोजी एक 'असाधारण'आदेश काढला, ज्याद्वारे पशु बाजारांमध्ये मारण्यासाठी होत असलेल्या पशु विक्रीवर बंदी आणली. याचा सर्वात जास्त परिणाम मांस उद्योगावर दिसून आला कारण या उद्योगाला लागणाऱ्या ९०% पशूंचा पुरवठा अशाच बाजारांमधून होत होता. सोबतच चामडे उद्योगालाही कच्चा माल न मिळाल्यामुळे मोठे नुकसान झाले आहे, असा उद्योग ज्यामध्ये २००६ ते २०११ दरम्यान ८.२ टक्के दराने वार्षिक वाढ होत होती. पण आता निर्यातीत वेगाने घट झाली आहे. या उद्योगात २५ लाख लोकांना रोजगार मिळतो, ज्यापैकी बहुतांश अनुसुचित जातींमधील आहेत. जवळपास ८ लाख दलित हे मेलेल्या जनावरांच्या कातडीच्या उद्योगावर जगतात पण हिंदुत्व ब्रिगेडच्या अफवांच्या जोरावर जमावाद्वारे होणाऱ्या हत्यांच्या घटनांमुळे फक्त दलितच नाही, तर या उद्योगाशी जोडलेले ठेकेदार, ट्रक चालक, व्यापारी आणि इतर लोकही मोठ्या प्रमाणात बाधित झाले आहेत. चामड्याचे उत्पादन करणारे लहान कारखाने, जे मुख्यत: दलितांना अशा कामांमध्ये नेमत होते, ते आता कामावरून काढले जात आहेत. घरगुती स्तरावर या उद्योगात काम करणाऱ्या लोकांची उपजीविका सुद्धा धोक्यात आहे. दुसऱ्या बाजूला सरकारने गाय/बैलाच्या चामड्याला शून्य टक्के कर लावून आयात करण्याची परवानगी दिली आहे.

दुसरीकडे यामुळे शेतकऱ्यांची सुद्धा दुरावस्था होत आहे. बहुतेक शेतकरी म्हाताऱ्या आणि आजारी जनावरांना ठेकेदारांना विकत असतात जेणेकरून त्या पैशातून नवीन गाई घेऊ शकतील. आता नवीन गाईंना घेणे दूरच, उलट पशुवधावर पूर्ण बंदीमुळे शेतकऱ्यांना जनावरांच्या संगोपनाचा वेगळा खर्च (जो दरवर्षी जवळपास ३६,००० रुपये असेल) करावा लागेल. अगोदरच कर्जात बुडालेल्या शेतकऱ्यांचे ऐकण्याऐवजी सरकार त्यांच्यावरच अजून बोजा टाकत आहे.

या बंदीमुळे हिंदू आणि मुस्लिम दोघेही आपली जीविका गमावत आहेत. तसे तर संघाद्वारे असा प्रचार केला जातो की मुख्यत: मुस्लिमच मांस खातात, पण वेगवेगळ्या राज्यांमध्ये मुस्लिमांच्या तुलनेत दलित, आदिवासी आणि इतर मागासलेल्या जातीमधील समुदाय गोमांस जास्त खातात. एन.एन.एस.ओ.च्या अंदाजानुसार देशामध्ये ५.२ कोटी लोक, मुख्यत: दलित, आदिवासी आणि विविध समुदायांमधील गरीब लोक, गोमांस/म्हशीचे मांस खातात. स्पष्ट आहे की बीफच्या विक्रीच्या मुद्यालाही इथे वर्गाच्या आधारावर पाहिले पाहिजे. एका बाजूला या पावलाने गरीबांना प्रथिने खाण्याच्या तुलनेने स्वस्त स्त्रोतापासून वंचित केले आहे, तर दुसरीकडे सत्तेत बसलेल्या लोकांच्या संगनमत आणि समर्थनाने हिंदू ब्रिगेडचे दहशतीचे अभियान लाखो लोकांचे उदरनिर्वाहाचे साधन आणि उद्योग नष्ट करत आहे.

### कठीण वेळ - गाय कमांडोंचा खेळ !

संघ परिवाराला इतक्या मोठ्या स्तरावर गोरक्षणाचा प्रश्न उचलण्याची गरज का वाटते? फक्त गोरक्षणच नाही तर इतिहासात पाहिले तर अडवाणींची रथ यात्रा, बाबरी मशिदीचा विध्वंस आणि गुजरात २००२ आणि आता फासीवाद सत्तेत आल्यावर चालू असलेली राजकीय हिंसा, राज्यसत्तेद्वारे नियोजित दंगली, गुंड वाहिन्यांची हिंसा, अंधराष्ट्रवादाचे विष, आणि जमावाद्वारे हत्येच्या घटना हे सर्व एका साखळीच्या स्वरूपात जोडलेले आहे. लोकरंजक थापेबाजी करून मोदी सरकार सत्तेत तर आले, पण ३ वर्षांच्या आपल्या कार्यकाळात जनतेसमोर ही गोष्ट पुन्हा स्पष्ट झाली आहे की भाजपचे खरे उद्दिष्ट अवघड काळातून चाललेल्या भांडवलशाहीची अजून चांगली सेवा करणे हेच आहे.

●

# गरीबी दूर करण्याचा एकच रस्ता – समाजवादी व्यवस्था

लेनिन

एका बाजूला संपत्ती व चैन वाढत आहे, आणि तरीही आपल्या श्रमाने जे लोक ही सर्व संपत्ती निर्माण करतात अशा लक्षावधी लोकांना दारिद्र्यात व दैन्यात जिणे कंठावे लागत आहे. शेतकरी उपासमारीने मरत आहेत, कामगार बेकार होऊन वणवण फिरत आहेत, आणि तरीही व्यापारी लाखो पोती धान्य रशियातून परदेशी निर्यात करीत आहेत, माल विकता येत नाही, मालाला बाजारपेठ उरलेली नाही म्हणून फॅक्टऱ्यांमधले कामकाज थंडावले आहे.

बहुतांश सर्व जमीन, त्याचप्रमाणे फॅक्टऱ्या, कारखाने, यंत्रे, इमारती, जहाजे इत्यादींवरील काही थोड्या श्रीमंत लोकांची मालकी हे प्रथमत: या सर्वाचे कारण आहे. या जमिनीवर आणि या फॅक्टऱ्यांमध्ये व कारखान्यांमध्ये लक्ष-दशलक्षावधी लोक काम करतात, पण त्यांची मालकी आहे काही सहस्त्र किंवा दशसहस्त्र श्रीमंत लोकांकडे, जमीनदारांकडे, व्यापाऱ्यांकडे आणि फॅक्टरी मालकांकडे. मजुरीसाठी, वेतनासाठी, भाकरीच्या एका तुकड्यासाठी लोक या श्रीमंत लोकांसाठी काम करतात. कामगारांच्या जेमतेम निर्वाहासाठी जे आवश्यक आहे त्यापेक्षा जे काहीअधिक उत्पादन होते ते सर्व श्रीमंतांच्या घशात जाते. हा आहे त्यांचा नफा, त्यांचे “उत्पन्न”. यंत्रांच्या उपयोगातून आणि उत्पादनाच्या पद्धतीत करण्यात येणाऱ्या सुधारणांमधून जो काही लाभ निर्माण होतो तो सारा जमीनमालकांच्या व भांडवलदारांच्या तिजोरीत जातो. हे जमीनमालक व भांडवलदार अमाप संपत्तीचा संचय करतात, आणि कामगारांच्या पदरात पडतात त्या फक्त दीड दमड्या. काम करण्यासाठी कामगारांना एकत्र आणले जाते. मोठमोठ्या जमीनजुमल्यांवर आणि मोठमोठ्या फॅक्टऱ्यांमध्ये कधी शेकडो तर कधी कधी हजारो कामगार कामावर ठेवले जातात. कामगार ज्यावेळी अशा रीतीने एकत्र आणले जातात आणि ज्यावेळी अत्यंत विविध प्रकारची यंत्रे उपयोगात आणली जातात त्यावेळी श्रम अधिक उत्पादक बनते. यंत्रांशिवाय वेगवेगळे काम करून अनेक कामगार जेवढे उत्पादन करत असत तेवढे उत्पादन आता एकटा एक कामगार करतो. परंतु या अधिक उत्पादक श्रमाचे लाभ अवघ्या श्रमिक जनतेच्या पदरात पडत नाहीत तर हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या मोठमोठ्या जमीनमालकांच्या, व्यापाऱ्यांच्या आणि फॅक्टरी मालकांच्या पदरात पडतात.

आपण अनेक वेळा असे सांगितलेले ऐकतो की जमीनदार आणि व्यापारी लोकांना “काम पुरवितात”, गरिबांच्या मिळकतीची ते “सोय करतात”. उदाहरणार्थ असे सांगितले जाते की, शेजारची फॅक्टरी किंवा शेजारचा जमीनदार स्थानिक शेतकऱ्यांचे “पोषण करीत असतो”. वास्तविक कामगार स्वत:च्या श्रमाने स्वत:चे पोषण करत असतात आणि जे स्वत: काम करीत नाहीत त्यांचेही पोषण करत असतात. परंतु जमीनदाराच्या जमिनीवर, कारखान्यामध्ये किंवा रेल्वेमध्ये काम करण्यास परवानगी मिळावी म्हणून कामगार आपले सर्व उत्पादन मालकाला मोफत देऊन टाकतो, आणि त्याला स्वत:ला मात्र त्याचा जेमतेम निर्वाह चालेल इतकेच मिळते. म्हणूनच प्रत्यक्षात जमीनदार आणि व्यापारी कामगारांना नोकरी देतात हे म्हणणे चूक आहे, उलट आपल्या श्रमाचा पुष्कळसा भाग मोफत दुसऱ्याच्या आधीन करून आपल्या श्रमाने कामगार सर्वांचे पोषण करीत असतात.

पुढे. आजकालच्या सर्व देशांत लोकांच्या दारिद्र्याचे कारण हे आहे की, कामगारांकडून तयार होणारा सर्व प्रकारचा माल हा विक्रीसाठी असतो, बाजारपेठेसाठी असतो. फॅक्टरी मालक आणि कारागीर, जमीनदार आणि सुखवस्तू शेतकरी विविध माल उत्पादित करतात, गुराढोरांची पैदास करतात, शेते पेरतात व धान्य पिकवितात ते पैसे कमविण्याच्या उद्देशाने - विक्रीसाठी. सर्वत्र पैशाची सत्ता सुरू झाली आहे. मानवी श्रमाने उत्पादित झालेल्या सर्व मालाचा पैशाच्या मोबदल्यात विनिमय केला जातो. पैशाच्या जोरावर तुम्ही काहीही विकत घेऊ शकता. पैशाच्या जोरावर तुम्ही माणसालाही विकत घेऊ शकता, म्हणजेच, ज्याच्याजवळ काही नाही अशा माणसाला ज्याच्याजवळ पैसा आहे अशा माणसासाठी तुम्ही काम करायला भाग पाडू शकता. पूर्वी सत्ता चालत असे ती जमिनीची - हा प्रकार होता भूदास मालकी पद्धतीत:



(सदर लेख रशियन क्रांतीकारक नेते लेनिन यांनी रशियाच्या परिस्थितीत ११५ वर्षांपूर्वी लिहीला होता. भारताच्या परिस्थितीशी त्याचे आजही प्रचंड साम्य आणि महत्व आहे.)

ज्याच्याजवळ जमीन असे त्याच्या हातात सत्ता व अधिकार असे. तथापि आज पैशाची, भांडवलाची, सत्ता सुरू झाली आहे. आज पैशाच्या जोरावर तुम्ही हवी तितकी जमीन खरेदी करू शकता. तुमच्याजवळ जमीन असली तरी पैशाशिवाय तुम्ही फारसे काही करू शकत नाही. नांगर किंवा इतर अवजारे खरेदी करण्यासाठी, गुरेढोरे विकत घेण्यासाठी, कपडे व इतर शहरी माल खरेदी करण्यासाठी तुमच्याकडे पैसा हवा - मग कर भरण्याची तर गोष्टच सोडा. पैशासाठी जवळ जवळ सर्व जमीनदारांनी आपला जमीनजुमला बँकांकडे गहाण ठेवला आहे. पैसा मिळविण्यासाठी सरकार जगभरातील श्रीमंत लोकांकडून व बँकवाल्यांकडून पैसा उसनवार घेते आणि या कर्जांवर वर्षाला व्याजापोटी लक्षावधी रूबल *(अनुवादक : रशियाचे चलन रुबल आहे)* देते.

आज पैशासाठी एकाची दुसऱ्याविरूद्ध तुंबळ हाणामारी सुरू आहे. स्वस्तात माल विकत घेण्यासाठी व तो चढ्या भावात विकण्यासाठी प्रत्येकजण धडपडत आहे, एकमेकाच्या पुढे जाण्यासाठी, विकता येईल तेवढा जास्तीत जास्त माल विकण्यासाठी, दुसऱ्यावर कुरघोडी करण्यासाठी, फायदेशीर बाजारपेठ किंवा फायदेशीर करार दुसऱ्यापासून लपवून ठेवण्यासाठी प्रत्येकजण शर्थीचे प्रयत्न करीत आहे. पैशासाठी चाललेल्या या एकूण झोंबाझोंबीमध्ये सर्वात जास्त फटका जर कोणाला बसत असेल तर तो छोट्या माणसाला, छोट्या कारागिराला किंवा छोट्या शेतकऱ्याला. श्रीमंत व्यापारी किंवा श्रीमंत शेतकरी त्याला मागे टाकून केव्हाच पुढे निघून जातो. छोट्या माणसाकडे कोणतीही गंगाजळी नसते, तो हातापोटावर जगत असतो. एखादी अडचण आली किंवा दुरापत्ती ओढवली तर आपल्या मालकीची अगदी शेवटची वस्तूही त्याला गहाण ठेवावी लागते किंवा आपली गुरेढोरे कवडीमोलाने विकावी लागतात. एकदा का तो कुलकाच्या (अनुवादक: कुलक म्हणजे श्रीमंत शेतकरी) किंवा सावकाराच्या पंज्यात सापडला की त्या जाळ्यातून सुटका करून घेण्यात त्याला क्वचितच यश येते आणि बहुधा त्याची पार धुळधाणच होते. दर वर्षी सहस्त्र-दशसहस्त्र छोटे शेतकरी आपल्या झोपड्याना टाळे लावतात, आपल्या ताब्यातली जमीन मोफत ग्राम सामायीकीच्या हवाली करतात व वेतन-कामगार, शेतमजूर, अकुशल कामगार, कामगारवर्गीय श्रमिक म्हणून जीवनाला सुरुवात करतात. पण पैशासाठी चाललेल्या या झगड्यात श्रीमंत मात्र अधिकाधिक श्रीमंत होत जातात. बँकांमध्ये ते लक्षावधी आणि कोट्यवधी रूबलच्या राशीच्या राशी जमा करून ठेवतात आणि केवळ स्वत:च्याच पैश्यांवर नव्हे तर इतरांनी बँकांत जमा केलेल्या ठेवींवरही अफाट नफा कमवतात. छोट्या माणसाने बँकेत किंवा बचत खात्यात ठेवलेल्या शे-पन्नास किंवा शे-दोनशे रूबलवर त्याला रूबलला तीन किंवा चार कोपेक (अनुवादक: १०० कोपेक म्हणजे १ रुबल) दराने व्याज मिळते, परंतु या शे-पन्नासच्या ठेवींवर श्रीमंत माणूस मात्र लाखो रूबल कमवितो आणि आपली उलाढाल वाढविण्यासाठी या लाखो रूबलचा उपयोग करून तो रूबलला दहा किंवा वीस कोपेक नफा काढतो.

म्हणूनच सामाजिक-लोकशाहीवादी कामगार म्हणतात की लोकांच्या दारिद्र्याचे निर्मूलन करण्याचा फक्त एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे संपूर्ण देशातील विद्यमान व्यवस्था खालपासून वरपर्यंत आमूलाग्र बदलणे आणि त्या जागी समाजवादी व्यवस्था स्थापन करणे, दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे बड्या जमीनमालकांकडून त्यांचा जमीनजुमला काढून घेणे, फॅक्टरी मालकांच्या हातातून फॅक्टऱ्या काढून घेणे, बँकवाल्यांच्या हातातून भांडवल काढून घेणे, त्यांची खाजगी मालकी रद्द करणे व ती संपूर्ण देशातील श्रमजीवी जनतेच्या हाती सोपविणे हा होय. हे घडून आल्यानंतर कामगारांच्या श्रमाचा उपयोग इतरांच्या श्रमावर जगणाऱ्या श्रीमंत माणसांच्या कारणी लागणार नाही तर स्वत: कामगार आणि ज्यांना कामगारानी निवडून दिले आहे असे लोक त्या श्रमाचा उपयोग करतील. सामायिक श्रमाची फळे आणि सर्व सुधारणांमुळे व यंत्रांमुळे निष्पन्न होणारे लाभ समग्र श्रमजीवी जनतेच्या, सर्व कामगारांच्या पदरात पडतील. अशा वेळी संपत्तीची वाढ अधिक वेगाने होईल, कारण कामगार भांडवलदारांसाठी जे काम करतात त्यापेक्षा स्वत:साठी ते अधिक चांगले काम करतील; कामाचा दिवस अधिक लहान होईल; कामगारांचे जीवनमान अधिक उंचावेल; त्यांच्या जीवनाची संपूर्ण परिस्थितीच समग्रतेने बदलून जाईल.

परंतु संपूर्ण देशातील विद्यमान व्यवस्था बदलणे ही साधी गोष्ट नाही. त्यासाठी अपार परिश्रमांची, प्रखर व खंबीर लढ्याची आवश्यकता लागेल. सर्व धनिक लोक, मालमत्ता धारण करणारे सर्व दौलतदार, सर्व भांडवलदार आपल्या साऱ्या शक्तीनिशी आपल्या धनदौलतीचे, संपत्तीचे रक्षण करण्यासाठी पुढे सरसावतील. अधिकारी आणि सैन्यदळे धनिक वर्गाच्या हातात आहे. जे जे इतरांच्या श्रमावर जगतात त्या सर्वांविरुद्ध लढा करण्यासाठी कामगारांनी एकभावाने, एकविचाराने स्वत:ला एकवटले पाहिजे. कामगारांनी स्वत: एकजुट झाले पाहिजे व सर्व गरिबांना एकाच एका श्रमिक वर्गात, एकाच एका कामगारवर्गात एकजुटित करण्यासाठी मदत केली पाहिजे. कामगारवर्गाच्या दृष्टीने हा लढा साधा नसेल, पण त्याचे पर्यावसन कामगारांच्या विजयात झाल्याशिवाय निश्चितच रहाणार नाही; कारण भांडवलदारवर्ग किंवा जे इतरांच्या श्रमावर जगतात असे लोक हे एकूण लोकसंख्येशी ताडून पहाता नगण्य वाटावेत इतके अल्पसंख्य आहेत, तर विशाल बहुसंख्या ही कामगारवर्गाची आहे. दौलतदारांविरुद्ध कामगार म्हणजे हजारोंविरुद्ध लाखो.

# जात-धर्माच्या नावाने न झगडता खरे मुद्दे उचलायला हवेत!

पान २ वरून

नाहीत, जेव्हा की वास्तव दुसरेच आहे. ९०च्या दशकापासून चालू असलेल्या खाजगीकरण, उदारीकरणाच्या धोरणांमुळे आज बहुतेक नोकऱ्या अस्थायी (टेंपररी) झाल्या आहेत, सरकारी नोकऱ्या जवळपास बंद होण्याच्या मार्गावर आहेत. नुकतीच महाराष्ट्र सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांच्या संख्येत ३० टक्के कपातीची घोषणा केली होती. म्हणजे एकूण १७ लाख जागांपैकी ५.१ लाख जागा गायब करण्याची तयारी सरकारने केली आहे. अशीच अवस्था केंद्र सरकारचीही आहे. २९ मार्च २०१७ रोजी लोकसभेमध्ये कामकाज मंत्री जितेंद्र सिंह यांनी सांगितले की २०१३ मधील १,५१,८४१ च्या तुलनेत २०१५ मध्ये फक्त १५,८७७ जागा भरल्या गेल्या. अशा स्थितीमध्ये आरक्षण पूर्णत: समाप्त जरी केले किंवा एखाद्या जातीचे आरक्षण एक दोन टक्यांनी वाढवले तरी सुद्धा बेरोजगारीचे चित्र होते तसेच राहील. आज आरक्षण हटवणे किंवा आरक्षण मिळवणे या लढाईपेक्षा रोजगाराच्या हमीच्या मागणीसाठी एकजुट होणे हाच एकमेव मार्ग आहे.

आज सर्व जातींमधील गरिबांना हे समजवून सांगण्याची गरज आहे की त्यांच्या हलाखीच्या अवस्थेला खरेतर दलित, मुस्लिम किंवा आदिवासी जबाबदार नाहीत तर त्यांच्या स्वत:च्या आणि इतर जातींमधील श्रीमंत लोक आहेत. जोपर्यंत कष्टकरी जनतेला हे समजणार नाही तोपर्यंत हेच होत राहील की एक जात आपले एखादे आंदोलन उभे करेल आणि त्याच्या विरोधात शासक वर्ग इतर जातींचे आंदोलन उभे करून जातीय विभाजन अजून वाढवेल. या षडयंत्राला समजणे गरजेचे आहे. या षडयंत्राचे उत्तर अस्मितावादी राजकारण आणि जातीय गोलबंदी नाही. याचे उत्तर वर्ग संघर्ष आणि वर्गीय गोलबंदी हेच आहे. या षडयंत्राचा बुरखा फाडावा लागेल आणि सर्व जातींमधील बेरोजगार, गरीब आणि कष्टकरी लोकांना संघटीत आणि एकत्रित करावे लागेल. याच प्रक्रियेमध्ये ब्राह्मणवाद आणि जातीवादावरही प्रहार करावा लागेल. खरेतर जातीअंत आणि ब्राह्मणवादाच्या नाशाचा रस्ता अशाप्रकारे वर्गीय गोलबंदी करूनच शक्य आहे. अस्मितांच्या टक्करीमध्ये प्रत्येक अस्मिता मजबूत होत जाते आणि शेवटी चुकीच्या मुद्यांवर सामान्य कष्टकरी लोकांचाच बळी जातो. अनेक दशकांपासून हेच नाही होत आले का? आपण अजूनही शासक वर्गांच्या याच जाळ्यात अडकणार का? आपण अजूनही त्यांच्याद्वारे मूर्ख बनवले जात राहणार का? नाही! भांडवली व्यवस्थेविरुद्ध एकजूट होणे आणि त्यासाठी याच प्रक्रियेमध्ये ब्राह्मणवाद, जातीयवाद आणि धर्मवादाविरोधात तडजोड न करता संघर्ष करणे — कष्टकरी जनतेसमोर हाच एक रस्ता आहे.

●

# जाती-अंताची योजना अशा अस्मितावादामूळे पुढे नाही, उलट मागे जाईल!

**पान १६ वरून**

महालवाडी पद्धत दलितांच्या हिताविरोधात होती. कायमधारा जमीनधारणा पद्धतीमुळे जमिनीच्या खाजगीकरणाला सुरुवात झाली व जमीनदारांना जमिनीचे मालक बनवले. या पूर्वी राजा अथवा केंद्रीय सत्ता जमिनीचे मालक होती व अन्य सर्व जहागीरदार-जमीनदार तिचा उपभोग घेत असत. जमीनदाराला कायदेशीर मालक बनवण्याचे काम इंग्रजांनी केले. स्पष्टच आहे कि जमीनदार उच्च जातीतूनच येतात. महालवाडी पद्धतीच्या परिणामी जमीन ग्राम समुदायाला दिली गेली व तीच्या वाटपाचा अधिकार त्यांनाच देण्यात आला. बहुतेक सर्व ग्राम समुदायातील प्रमुख उच्च जातीतून येत, इथेही दलितांवर अन्यायच झाला. रयतवाडी जमीनधारणेचा प्रकार तुलनात्मकरित्या प्रगतीशील होता, पण तिथेही जमीन दलितांना नव्हे तर मध्यम शेतकरी जातींना दिली गेली. नंतर त्यांना प्रशासकीय व तांत्रिक शब्दावलीत इतर मागास वर्ग म्हणण्यात आले. इंग्रजांच्या या जमीन धारणेच्या व्यवस्थेने दलितांना कायमचे भूमिहीनतेच्या गर्तेत ढकलले.

ग्राम उत्पादन व वर्ग संबंधांच्या परिणामी जी थोडी गतिशीलता होती तीही या भू-राजस्व पद्धतीने नष्ट केली. यामुळेच राज्यातील उच्च जातीय जमीनदार शासक ब्रिटीशांचे कायम सहयोगी आणि सामाजिक आधार बनून राहिले. हेच कारण होते कि सर्वात जातीयवादी ब्राम्हणवादी शक्ती जसे हिंदू महासभा व संघ कधीच ब्रिटीशांविरोधात लढले नाहीत. उलट क्रांतिकारकांच्या विरोधात बातम्या पुरवल्या, हेर बनले शेवटपर्यंत ब्रिटीश शासनाचे विश्वासू सहयोगी बनून राहिले. पुढे जेव्हा इंग्रज देश सोडून जावू लागले तेव्हा जमीनदारांचा संपूर्ण उच्च जातीय वर्ग त्यांची विनवणी करत व हात जोडून न जाण्यासाठी मनधरणी करत होता. दुसरे कारक, जे ब्रिटीश सत्तेने आणले व ज्याने जातीव्यवस्था अधिक दृढ झाली व सोबतच तिचे कायदेशीर औपचारीकीकरण झाले आणि ते म्हणजे "एथनोग्रफिक राज्यसत्तेचा उगम" (एथनोग्राफिक: लोकसंख्येची मोजणी, वर्गीकरण इत्यादी करणारी)

लोकांची मोजणी करणे, त्यांचे वर्गीकरण करणे ब्रिटीश वासाहतिक सत्तेसाठी गरजेचे होते. ब्रिटीश अनुभववाद आणि प्रत्यक्षवाद-जी ब्रिटीश शासकांची विचारधारा होती-तिचे असे मत बनले होते कि भारतावर नेटके राज्य करायचे असेल तर त्याला नीट समजून घ्यायला हवे. १७८४ मध्ये झालेली ओरिएन्टल सोसायटी ऑफ इंडियाची स्थापना असो वा रिसले एच.एच.द्वारे केलेली जनगणना असो त्याचीच परिणीती होत. त्यांनी वसाहतिक राज्याच्या शासन सिद्धांतानुसार असंख्य सर्वे केले, संशोधने केली व अभ्यास केला. त्यांनीच अगदी पहिल्यांदा अनुसूचित जातींची व्याख्या केली व त्यांचे कायदेशीर अस्तित्व बनवले, जे अधिक कठोर व ठोस तर होतेच पण परिवर्तनासाठी अभेद्य सुद्धा होते. यामुळे जाती व्यवस्थेचे मजबुतीकरण आणि दृढीकरण झाले. या गोष्टीला आज सर्व इतिहासकार मान्य करतात. हे खरे आहे कि इंग्रजांनी काही राजवटीमध्ये पाश्चिमात्य शिक्षणाची दारे अंशतः उघडली, सोबतच ख्रिश्चन मिशनऱ्यांनीसुद्धा दलित व उत्पीडीत समूहांमध्ये थोडेफार कार्य केले. पण वसाहतिक भारताच्या तुलनेत ते खूपच अल्प ठरावे. दुसरे म्हणजे इंग्रजांनी जे सुधारकार्य केले ते दलितांच्या उत्थानासाठी नव्हते.आनंद तेलतुंबडे म्हणतात तसे— वसाहतिक सत्तेसाठी विश्वासु व इमानदार अधिकारी, कर्मचारी तयार करण्याच्या वसाहतिक प्रक्रियेचेते उप-उत्पादन होते.इंग्रजांच्या स्वत:च्या अशा गरजा होत्या आणि या उप-उत्पादनाच्या रुपात मिळालेल्या आंशिक फायद्याची तुलना दलितांच्या दमन आणि शोषणाला मिळालेल्या संरचनात्मक रुपाशी केली तर लाभापेक्षा हानी कैक पटीने जास्त आहे.

सैन्यातील दलितांच्या भरती प्रश्नावर देखील काही ऐतिहासिक तथ्ये इथे स्पष्ट करणे अत्यंत गरजेचे आहे. इंग्रजांनी सैन्यात विभिन्न समूहांना भरती केले, विशेष करून त्यांना,जे पूर्वी एखाद्या राजाच्या सैन्यात काम करत होते. महारही एक अशी जात राहिली आहे जी शिवाजींच्या काळापासून सैन्यात काम करत होती. इंग्रजांनी महारांना सैन्यात भरती तर केले पण ब्राम्हणांच्या दबावामुळे सुरुवातीला त्यांना लढाऊ पदावरून बाहेर केले व नंतर 'मार्शल रेस' (लढवय्या जमाती)चा सिद्धांत लावून त्यांची भरतीच बंद केली होती. नमूद करतो की रिपब्लिकन पँथर संघटनेने देखील आपल्या प्रकाशित केलेल्या पुस्तिकेत ही गोष्ट मान्य केली आहे. यावरून देखील वसाहतिक सत्ता व ब्राम्हणवादाची अभद्र युती समोर येते. महार सोडून इतर सर्व समूहांची भरती मात्र चालूच होती, जसे शीख, गोरखा, इत्यादी. दुसरीकडे, हि सुद्धा लक्ष वेधणारी गोष्ट आहे की इंग्रजांनी दलितांमधील एकाच भूभागातील, एकच जात (बॉम्बे आर्मीतील महार) सैन्यात भरती केली होती, इतर कुठल्याही दलित जातींना नव्हे.

ब्रिटीश शासनाच्या राजवटीचा दुसरा परिणाम उद्योगांचे सुरु होणे होय. एका वसाहतीक शासनाच्या अंतर्गत मर्यादित व नियंत्रित भांडवली विकासाच्या परिणामी जाती व्यवस्थेचे काही पैलू निश्चित कमजोर झाले. शहरी कामगार वर्गाच्या उदयानेही त्यात योगदान दिले आहे. संक्षेपात, उद्योग, विशेषतः रेल्वेचे जाळे निर्माण होणे व शहरीकरणाने जातिव्यवस्थेच्या काही पैलूंना कमजोर केले. कार्ल मार्क्सने या विकासाबाबत अगोदरच इंगित केले होते व नंतर आंबेडकरांनीही ही गोष्ट आपल्या पद्धतीने सांगितली होती. पण जर समग्रतेने ब्रिटीश वसाहतीक शासनाच्या जातिव्यवस्थेवरील परिणामांचे एकत्रित मुल्यांकन केले तर निसंशयपणे म्हणता येईल कि त्यांनी उच्च जातींच्या शासनाचे सुदृढीकरण केले. वसाहतिक सत्तेच्या हितासाठी ब्राह्मणांचे व ब्राह्मणी विचारधारेचे सहयोजन केले. दलीत व निम्न जातीची स्थिति अजून जास्त असुरक्षित केली. वसाहतिक शासनाने काही जनजातींना कायदेशीर रूप देत, गुन्हेगार जनजातीच्या रुपात वर्गीकृत केले व त्यांच्यावर घोर अन्याय केला. हे गुन्हेगार जातीचे लेबल घटनेने देखील लगेच काढले नव्हते.

स्पष्ट आहे कि भारतातील जनतेला कायम विभाजित ठेवण्यासाठी इंग्रजांनी जाती व्यवस्थेचा आणि धर्माचा वापर केला होता. इंग्रजांनी जाती व्यवस्थेला नष्ट करण्यासाठी अगदी जाणीवपूर्वक अजिबात काही खास केले नाही. अशा स्थितीत जर कोणी स्वत:ला जातीअंताचे आंदोलन म्हणत असेल (रिपब्लिकन पँथर) आणि कोरेगावच्या लढाईचे २०० वे वर्षे साजरे करत असेल तर स्वाभाविकच ते असेही म्हणत असतील कि इंग्रजांचे सैनिक हे जाती अंताचे शिपाई होते. वस्तुस्थिति आपल्या समोर आहे. अशा संघटना ना जाती अंताची कुठली सांगोपांग योजना देवू शकतात, ना त्यावर दृढपणे अंमलही करू शकतात. हताश-निराशेत धडपडणारे हे कधी भीमा कोरेगाव जयंती साजरी करतात, तर कधी संविधान वाचवा सारख्या पोकळ घोषणा देतात. आपल्या हास्यास्पद ऐतिहासिक समजदारीचा अजून एक नमुना म्हणजे, आजच्या फासीवादी राज्यसत्तेला ते नवी पेशवाई म्हणतात. पेशवाई फक्त ब्राह्मणवाद नव्हती तर एक विशिष्ट आर्थिक संबंध सुद्धा होती, ती सरंजामी उत्पादन संबंध आणि सरंजामी विखंडीत राज्यसत्तेचे प्रतिनिधित्व करत होती. ब्राह्मणवादी विचारधारेच्या आधारावर पेशवाई तिच्या सत्तेला कायदेशीर मान्यता मिळवून घेत होती. इतिहास साक्ष आहे कि उत्तर वैदिक काळानंतर जितक्या शोषक-उत्पीडक व्यवस्था आल्या त्या प्रत्येकीने स्वत:ला कायदेशीर मान्यता मिळवण्यासाठी ब्राह्मणवादी विचारधारेचा उपयोग केला. मग तो १६ जनपदांचा काळ असो कि सरंजामशाहीपूर्व व्यवस्था असोत, गुप्तवंशकालीन सामंती व्यवस्था, दिल्लीची सुलतानशाही व तिचे मुसलमान शासक (उदा. १४ व्या शतकात फिरोजशाह तुघलकाने बंगाल मधल्या एका मध्यम जातीला निम्न दर्जा देण्यासाठी फर्मान काढून तिची अवनती केली होती), मुघल शासक असो, ब्रिटीश शासन असो नाहीतर मग स्वातंत्र्योत्तर भारतातील भांडवलदार असोत; सर्व शोषक-शासक वर्गांनी जातीव्यवस्थेला आपल्या आर्थिक सामाजिक संबंधांनुसार सहयोजीत व पुनर्व्याख्यांकित केले आहे व नव्या रुपात बध्द केले आहे; पण जर आपण हे वास्तव समजून घेणार नसू व हेच मानणार असू कि ब्राह्मण संहितांनी व ग्रंथांनी जाती व्यवस्था बनवली तर आपल्याला जाती व्यवस्थेत गेल्या ३०० वर्षात झालेल्या बदलांना व्याख्यांकित करता येवू शकणार नाही. ब्राह्मणवाद हि एक अशी विचारधारा आहे कि जी सर्व शासक वर्गाला एक अतिशय विचारधारात्मक साधन उपलब्ध करून देते, कि ज्या आधारे ते त्यांचे शोषण आणि दमन न्याय्य ठरवू शकतील. पूर्वीच्या व्यवस्थांमध्ये वेगळ्या तऱ्हेने घडणारी हीच गोष्ट भांडवली समाजात एका वेगळ्या रुपात घडते. पण जोवर कुठल्याही शोषक अल्पसंख्येचे शासन भारतावर राहील, तोवर ब्राह्मणवाद आणि जातीवाद टिकून राहील, मग दर नव्या व्यवस्थेत तो स्वत:ला तद्रुरूप घडवत जाईल. जसे अमेरिकेत कोणताही शोषक-शासकवर्ग वंशवादाचा वापर त्याच्यापद्धतीने अवश्य करणार, तसे भारतातील शोषक–शाषक वर्ग ब्राह्मणवाद व जातीवाद आपल्या तऱ्हेने नक्कीच वापरणार; मग ती पेशवाई असो वा आजची भांडवली व्यवस्था, दोन्हीही बदलेल्या आर्थिक–सामाजिक संबंधानुसार, ब्राह्मणवाद व जातीवादात नक्कीच परिवर्तन आणतात व स्वत:च्या कायदेशीर विचारधारेच्या रुपात वापर चालू ठेवतात. याच्यातून आजचे फासीवादी सरकार म्हणजे नवी पेशवाई आहे असा निष्कर्ष काढणे मूर्खपणा ठरेल. आजच्या व्यवस्थेला नवी पेशवाई संबोधणे यापेक्षा अज्ञानपूर्ण, अनैतिहासिक, व मुर्खतापूर्ण गोष्ट अजून काय असू शकेल. आजच्या फासीवादी भांडवलशाही शासनाचे राजकीय, आर्थिक व ऐतिहासिक संदर्भ १८ व्या शतकाच्या उत्तरार्धातील आणि १९ व्या शतकाच्या पूर्वार्धातील पेशवाईपेक्षा अगदी भिन्न आहेत. हेच कारण आहे कि त्या काळातील जाती व्यवस्था आणि ब्राह्मणवाद आणि आजच्या काळातील जाती व्यवस्था आणि ब्राह्मणवादी जातीवाद या दोहोंच्या प्रकार्यात खूप अंतर आहे. पण अशा गोष्टी रिपब्लिकन पैंथर्स सारखे अस्मितावादी समजून घेतील, याची अपेक्षा करणे व्यर्थ आहे. हा अस्मितावाद आज फक्त नुकसान करत आहे. कुठल्याही दमित अस्मितांच्या संघर्षांच्या प्राथमिक अवस्थेत अस्मिता-निर्माणाचा एक टप्पा असतो. ज्याला आपण सामाजिक प्रवर्ग/समुदाय म्हणून स्वत:च्या अस्तित्वाविषयी जाणीव जागृतीचा टप्पा असे म्हणू. पण जर वर्ग संघर्षाची प्रक्रिया पुढे जाउन देखील एखादा दमित समुदाय अस्मिता निर्माण आणि त्याच्या सुदृढीकरणावरच थांबत असेल, तर तो त्यांच्यासाठी आत्मघात ठरेल. महत्वाचे म्हणजे कुठल्याही एका अस्मितेला मजबूत करणे इतर अस्मितांना सुदृढ केल्याशिवाय शक्य होत नाही, कारण अस्मितावादाचा पायाभूत तर्क अन्यीकरण (इतर अस्मितांची ओळख, othering) असतो. अशा तर्काचा फायदा नेहमी बहुसंख्यांकांनाच मिळतो. आंबेडकरांचे म्हणणे एका अर्थी खरेही आहे कि हिंदु समाजाची विभाजक रेषा हि स्पृश्य आणि अस्पृश्य यांमध्ये आहे. जर हि गोष्ट खरी असेल तर अस्मिता निर्माणाचा फायदा कुणाला होणार? आज पर्यंत तो कुणाला मिळत आला आहे? होय, तो उच्च वर्गातील उच्च आणि उच्च-मध्यम जातीतील लोकांनाच मिळणार आणि अस्मितावादाचा हा तर्क त्यांची मदत करणार. हि मंडळी आपल्याच जातीतील गरीब आणि कष्टकऱ्यांनाही या जातीवाद आणि जातीय श्रेष्ठतावादाच्या उन्मादात वाहून नेणार, कारण या गरीब दलितेतर जातींमधूनही जातीय पुर्वाग्रह टिकून आहेत. अशात अस्मितावाद कुणाच्या पथ्यावर पडणार हे स्पष्टच आहे. मराठा मोर्च्यांच्या निमित्ताने हेच नाही का सिद्ध झाले ? अशा जातीय मोर्चेबांधणीने दलितांचा काहीही फायदा होवू शकतो का? या साध्या तर्काला अस्मितावादी समजू शकत नाही आणि तशी आशा करणेही मूर्खपणाचे आहे.

अजुन एक वस्तुस्थिती ज्याकडे वाचकांचे लक्ष वेधू इच्छितो आणि ती म्हणजे रिपब्लिकन पँथर्सचा बौद्धिक भित्रेपणा आणि संधिसाधूपणा. हिन्दी प्रसिध्द मासिक "समयांतर" च्या नोव्हेंबर २०१७ च्या अंकात रिपब्लिकन पँथर्सचे सुधीर ढवळे यांचा, 'जाती आणि भारतातील इन्कलाब' नावाने लेख आहे. तो वाचून कुणीही समजू शकेल कि बुद्धीजीवी लोकांमध्ये ते एक बोलतात पण् इतर जनतेमध्ये गेल्यावर आपले अस्मितावादी राजकारण वाचवण्यासाठी तुष्टीकरणाची नीती वापरतात. समयांतर मध्ये ते लिहितात "इंग्रजांच्या राजवटीने ब्राह्मणवादी हिंदू व्यवस्था आणि विषमतेवर आधारीत जाती व्यवस्थेला बदलले तर नाहीच पण स्पर्शही केला नाही. उलट त्यांनी जातीव्यवस्थेला कायद्याचे अंग बनवून नवे जीवनदान दिले... म्हणजे इंग्रजांनी स्वहित साधण्याकामी तिला वापरले." (पान १५, समयांतर, नोव्हे. १७ ) आणि विशेष म्हणजे यांची अशी भूमिका सुद्धा बऱ्याच काळानंतर—म्हणजे, जेव्हा संपूर्ण देशांतील जातीविरोधी क्रांतिकारी आंदोलन व स्वतंत्र इतिहासकारांनी असे मत दिले की इंग्रजांनी जाती व्यवस्थेला मजबूत केले त्यानंतरच—बनली आहे. जाती व्यवस्थेचे अनेक आयाम कमजोर होणे हा सुद्धा एका ऐतिहासिक गतिशीलतेचा परिपाक होता. भीमा कोरेगावच्या मराठी पुस्तिकेत या महत्वपूर्ण तथ्याविषयी अजिबात उल्लेख सुद्धा नाही. कारण स्पष्ट आहे जर असा उल्लेख केला असता तर दलित जनतेने यांना हाच प्रश्न केला असता, कि मग भीमा कोरेगावने दलितांना काय दिले ?

हे नक्की कि रिपब्लिकन पँथर्स करत असलेल्या अस्मितावादी सर्कशीतून जातीअंताची योजना पुढे जाऊ शकत नाही. जाती अंताची परियोजना इतिहासाचे योग्य व अचूक मूल्यमापन करत, एक वर्ग आधारित जाती विरोधी आंदोलन उभे करुनच पुढे नेणे शक्य आहे. गेल्या अनेक दशकात याच मुलभूत गोष्टी न समजून घेतल्याने महाराष्ट्रा समवेत संपूर्ण देशात जातीअंत आंदोलन गिरक्या घेत आहेआणि आपले सर्वस्व त्यागून जाती अंताच्या लढाईत उतरलेल्या विद्यार्थी–युवक कार्यकर्त्यामध्ये हताशा आणि उबग निर्माण करत आहे. हे कुचक्र तोडणे आज अगत्याचे झाले आहे. यासाठी क्रांतिकारी साहस असणे गरजेचे आहे, याशिवाय आपल्या सारख्या जातीअंत योध्यांसमोर दुसरा कुठलाच रस्ता नाही. जर खरंच जातीअंताचा संघर्ष आपण पुढे घेवून जाऊ इच्छित असू तर आपल्याला ड्युईवादी व्यवहारवाद आणि अस्मितावादापासून फारकत घ्यावीच लागेल.

**अनुवाद : सोमनाथ केंजळे**

## भीमा कोरेगाव लढाईच्या २०० वर्ष साजरीकरणाचा सोहळा
## हताश रिपब्लिकन पँथर्सच्या अस्मितावादी' राजकारणाची पराकाष्ठा!

सत्यनारायण

# जाती-अंताची योजना अशा अस्मितावादामूळे पुढे नाही, उलट मागे जाईल!

***हा लेख जेव्हा लिहीला होता तेव्हा भीमा कोरेगावच्या लढाईला २०० वर्षे पुर्ण झाल्याचे निमित्त साजरे करण्याची तयारी सुरू होती. १ जानेवारीला झालेल्या दंगलीबाबत एक स्वतंत्र लेख आहे, जो पान १ वर आहे.***

इतिहासातील अशा लढाया ज्या उत्पीडीत वर्गाने आपल्यावर होत असलेल्या अत्याचाराविरोधात लढलेल्या असतात, त्या मानवतेचा वारसा असतात. मग भले तो वर्ग अशा लढाया हरला का असेना त्यांचं ऐतिहासिक मुल्य कायम टिकून राहतं. आपण त्या संघर्षांना स्मरत राहतो आणि त्याच्यातून प्रेरणा घेत राहतो. पण जर शासक वर्गाचेच भाग असलेले दोन गट, आपसांत लढत असतील आणि उत्पीडीत जनतेचा एक भाग जर शासक वर्गाचा हिस्सा बनून लढत असेल, तर अशा लढ्यातून आपण काय प्रेरणा घ्यायची ? मग अशा लढ्यात उत्पीडीत जनता काही अटी ठेवून अगदी तात्कालिक काही लाभ मिळवत जरी असली तरी असा लढा ऐतिहासिक प्रेरणेचा स्त्रोत कधीही असू शकत नाही.

असाच एक लढा भीमा कोरेगावचाही होता. महाराष्ट्रात रिपब्लीकन पँन्थर नावाने असलेल्या एका संघटनेने, याच भीमा कोरेगावच्या लढ्याला २०० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने एक मोठा कार्यक्रम घेतला आहे. ही संघटना लाल आणि निळ्याचे मिश्रण बनवू इच्छिते आणि मार्क्सवाद व आंबेडकरवाद यांच्या समन्वयाची पाठराखण करते. मात्र, उक्तीमध्ये जयभीम-लालसलाम आणि कृतीमध्ये अस्मितावादी राजकारण एवढीच काय ती या संघटनेची ओळख शिल्लक राहिली आहे. भीमा कोरेगावची लढाई पेशवाईच्या अंताच्या रुपात सादर करत आणि आजच्या फासीवादी सत्तेला नवी पेशवाई म्हणत, ही मंडळी भीमा कोरेगावाच्या संघर्षाची आठवण म्हणजे या नव्या पेशवाईचा पराभव करणे होय, असे मानतात. त्यांनी या औचित्याच्या प्रतिपादनासाठी एका पुस्तिकेचेही प्रकाशन केले आहे. ही पुस्तिका इतक्या अंतर्विरोधांनी भरलेली आहे कि लेखकालाच विचारावे वाटते कि जर तुम्हाला सगळं माहितीच आहे, तर मग हा आयोजनाचा उपद्व्याप कशाला करताय? या पुस्तिकेमध्ये ऐतिहासिक तर्कांऐवजी कपोलकल्पित गोष्टींचा भरपूर उपयोग केला गेला आहे. पुस्तिकेत जिथे मूळ विश्लेषणाला रद्द करतील अशी तथ्ये व सत्य सांगायची वेळ येते, तिथे डावेउजवे करत मूळ विश्लेषणाची बूज ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या पुस्तिकेतील या अंतर्विरोधांवर व कपोलकल्पनांवर यथास्थान टिपणे दिली जातील. या लेखात ही संघटना करत असलेले दावे आपण ऐतिहासिक व वर्गीय दृष्टीकोनातून समजून घेण्याचा व या लढाईने दलितांना काय दिले हे पाहण्याचाही प्रयत्न करू.

इंग्रजांनी आशिया खंडातल्या या उपमहाद्विपीय भूभागाला (जो तोपर्यंत "राष्ट्र" म्हणून अस्तिवात नव्हता तरी या पुढील लेखात आपण त्याला वसाहतिक भारत म्हणूयात) जिंकण्यासाठी प्रत्येक ठिकाणी जोड–तोड करण्याचा पुरेपूर प्रयत्न केला आहे. प्रत्येक ठिकाणी तिथल्या काही लोकांना त्यांनी जोडीला घेतले व वेगवेगळ्या राजवटीचा पाडाव करण्यासाठी त्यांचा वापर केला. भीमा कोरेगावातली लढाई १ जानेवारी १८१८ रोजी झाली होती. पण तो पर्यंत इंग्रजांनी भारताचा बराच मोठा भूभाग आपल्या ताब्यात घेतला होता. आपणा सर्वांना माहिती आहेच कि बक्सर आणि प्लासीच्या लढाई नंतरच इंग्रजांचे वर्चस्व एक वास्तविकता बनले होते. इंग्रजांची लष्करी ताकदही तशी बरीच होती. दुसरीकडे मराठा साम्राज्यही तो पर्यंत जवळजवळ संपुष्टात आले होते. पेशव्यांनी पुण्यातून पलायन केले होते. पेशवा इकडे तिकडे भटकत होता आणि पुन्हा पुण्यावर स्वारी करायच्या प्रयत्नात होता. तो जेव्हा पुण्याकडे सरकू लागला तसे त्याला थोपवण्यासाठी शिरूर मधून सैन्य धाडण्यात आले. त्या सैन्यामध्ये एकून ८३४ लोग होते, यापैकी 'बॉम्बे नेटिव इन्फेट्रीचे' ५०० सैनिक होते. यापैकी महार किती होते याचा नेमका आकडा सापडत नाही, पण अन्य उपलब्ध स्त्रोतानुसार बॉम्बे आर्मीचा ६ वा हिस्सा महार सैनिकांचा होता, म्हणजे जवळ जवळ १७ टक्के होईल. कोरेगावच्या लढाई नंतर जे स्मारक तिथे उभारण्यात आले त्यावर ४९ सैनिकांची नावे आहेत, ज्यापैकी २२ महार आहेत. (हे त्यांच्या नावाच्या मागे असलेल्या "नाक" प्रत्यया वरून समजते) म्हणजे असे कि सर्वच्या सर्व ५०० सैनिक महार नव्हते.

महार सैन्यात का भरती झाले या बाबतही या पुस्तिकेमध्ये कल्पनेचाच अधिक उपयोग करण्यात आला आहे. यांच्या मते महार सैन्यात भरती होण्यामागचे कारण पेशवे त्यांच्यावर करत असलेल्या अत्याचाराचा व अपमानाचा बदला त्यांना घ्यायचा होता. पण ही गोष्ट ऐतिहासिक तथ्य व तर्कांच्या आधारावर सिद्ध करता येत नाही. इंग्रजांनी जेव्हा भरती केली तेव्हा त्यांनी कुठल्याच महार प्रतिनिधीला बोलावून असे सांगितले नाही कि आम्ही तुम्हाला पेशव्याविरोधात लढण्यासाठी भरती करत आहोत. हा एक योगायोगच होता कि बॉम्बे आर्मी तिथे उपस्थित होती आणि पुण्याहून सैन्य यायला उशीर होणार म्हणून शिरूर आर्मीला तिथे पाठविण्यात आले. हे अगदी खरं आहे कि पेशव्यांचं राज्य जातीय अत्याचाराचं राज्य होतं, पण नंतर पेशवाईचा अंत होवूनही या परिस्थितीत काही खास फरक पडला नाही. इंग्रज व महारांचा काही घोषित अघोषित करार या बाबत झाला असता तर कदाचित इंग्रजांनी जातीअत्याचार व भेदभावासंबंधी काही विशेष केले असते. जर महारांना सैन्यात भरती झाल्याने काहीएक फायदा झालाही असला तरी तो त्यांच्या जाणीवपूर्वक घेतलेल्या निर्णयाचा परिणाम नव्हता किंवा इंग्रजानी जाणूनबुजून जातीय अत्याचाराचा नायनाट करण्यासाठी घेतलेला निर्णयाचाही परिणाम नव्हता. इंग्रजांनी देशातील अनेक भागात जातीच्या आधारावर, जातीय(एथनिक), राष्ट्रीय समूहांची सैन्यात भरती केली होती आणि त्यांच्या रेजिमेंट सुद्धा बनवल्या होत्या, जसे शीख रेजिमेंट, गोरखा रेजिमेंट, नागा रेजिमेंट, राजपुताना रेजिमेंट इत्यादी. यांपैकी कुठल्याच रेजिमेंटची निर्मिती करताना इंग्रजांचा उद्देश त्या समुदायांचे कल्याण करण्याचा कधीच नव्हता; किंवा असेही नव्हते कि हे समुदाय आपल्या उद्धाराच्या हेतूने इंग्रजांच्या सैन्यात सामील झाले होते. महार समुदायाच्या सैन्यात भरती होण्यालाही हीच बाब लागू होते. या बाबत, आनंद तेलतुंबडे लिहितात कि इंग्रजांनी असे केल्यामुळे दलितांना जर काही फायदा झाला जरी असेल तरी ते इंग्रजी राजवटीचे उपोत्पादन (बायप्रॉडक्ट) होते. निश्चितच, नंतर याच फायद्यांमुळे महार जातीतील अनेक समाजसुधारकांनी सैन्यात भरती होण्याला प्रोत्साहन दिले आणि ब्राम्हणांच्या विरोधामुळे जेव्हा भरती बंद केली गेली तेव्हा ती पुन्हा सुरु करण्यासाठी अर्ज-विनंत्याही केल्या. ठीक आहे, मुख्य विषयाकडे वळू या.

जेव्हा पेशव्याला कळाले कि ब्रिटीश सैन्य भीमा नदीच्या किनाऱ्यावर आहे तेव्हा त्याने त्याचे २००० सैनिक लढायला पाठवले, विशेष म्हणजे त्याच्याकडे २८००० सैनिक होते. काही आंबेडकरवादी इतिहासकार दावा करतात कि पेशव्याने सर्वच्या सर्व म्हणजे २८००० सैनिकांना लढायला पाठवले होते. हि गोष्ट तथ्यत: बरोबर नाही. या संघटनेनेही पुस्तिकेत २८००० सैन्याला ८३४ विरुद्ध लढवले आहे आणि याचा एक नाटकीय व काल्पनिक प्रसंगही चितारला आहे. त्यांनी लिहिले आहे कि लढाईला सुरुवात झाली तेव्हा स्टौटन पेशव्याच्या २८००० सैनिकांना बघून घाबरतो, पण आपल्या बटालियन मधल्या महार सैनिकांचे जिगर बघून लढायचा निश्चय करतो. हे खरं आहे कि त्या वेळी स्टौटन कडे दुसरा काही एक पर्याय नव्हता आणि पुण्याहून सैन्य येईपर्यंत आपल्या छोट्याश्या तुकडीला घेवूनच पेशव्यांना थोपवावे लागणार होते. त्यातही मुख्य भूमिका त्याच्याकडील हत्यारांची होती. हा एक वेगळा मुद्दा आहे कि या लढ्यात महार सैनिकही पेशव्यांच्या विरोधातील घृणा आणि असंतोषाला घेवून त्वेषाने लढले असणार. पण ज्या तऱ्हेने रिपब्लिकन पँथर्स पुस्तिकेत वाक्ये वापरते आहे ती स्पष्टपणे अस्मिता निर्मितीच्या योजनेचा हिस्सा अधिक वाटतात, ऐतिहासिक तपशील अजिबात वाटत नाही.

पेशव्यांच्या सैन्यात मुख्यत: अरब होते व मराठा, गोसावी सुद्धा मोठ्या प्रमाणात होते. १ जानेवारीला दुपारी पेशवे आणि इंग्रजांमध्ये लढाईला सुरुवात झाली. सुरुवातीला पेशव्यांचे सैन्य वरचढ ठरले. अरबांनी नदीच्या रक्षणार्थ लावलेली एकमेव गन ताब्यात घेतली व ११ इंग्रज गनर्सला ठार केले (तो पर्यंत गनर्स सारख्या महत्वाच्या पदांवर फक्त इंग्रजच असायचे.) या प्रसंगी काही गनर्सनी आत्मसमर्पणाचा सल्लाही दिला होता पण कप्तान स्टौटन ने तो ऐकला नाही. त्यानंतर लढाई पुन्हा सुरु झाली व रात्री ९.०० वाजता पेशव्याच्या सैन्याने गोळीबार थांबवला.

पाठीमागून अजून इंग्रज येण्याच्या भीतीने ते परत फिरले, पण ती जागा सोडली नाही. उलट दुसऱ्या दिवशी सुद्धा भीमा कोरेगावात ठाण मांडून बसले. इंग्रजांचे जवळजवळ २७५ सैनिक या लढ्यात मारले गेले, तर पेशव्याचे ५००-६०० असावेत. त्यानंतर जनरल स्मिथने पेशव्यांचा पाठलाग केला. पुढे रस्त्यात येणाऱ्या अनेक मराठा वतनदारांनी अगोदरच इंग्रजासमोर आत्मसमर्पण केले होते. शेवटी २ जून १८१८ रोजी पेशव्याने इंग्रजांशी तह केला व त्याबदल्यात एक लाख पौंड एवढी घसघशीत पेन्शन व अन्य सुविधा मिळवल्या.

या लढ्यातून पेशव्याला काय मिळालं हे तर वर स्पष्टच झालं आहे, पण दलितांना इंग्रजांच्या सेवेच्या मोबदल्यात काय मिळालं हे समजून घेण्यासाठी इतिहासात थोडं अजून डोकवावे लागेल. ब्रिटीशांच्या वसाहतिक राजवटीचा जातीव्यवस्थेवरील प्रभाव यावर अनेक मतप्रवाह आहेत. आंबेडकर व काही जातीविरोधी सुधारक असे मानतात कि ब्रिटीश वासाहतिक सत्तेने दलितांच्या स्थितीत सुधारणा करण्याचे काम केले आहे. त्यासाठी ते पाश्चिमात्य शिक्षण व सैन्यातील संधींचा हवाला देतात. पण समग्रतेत बघितले तर दिसते कि जातीव्यवस्था या काळात अधिक जास्त मजबूत झाली. दलितांची स्थिती राजकीय व आर्थिक अंगाने अधिकच असुरक्षित बनली. यात दोन कारक महत्वपूर्ण होते.

पहिले कारक होते, इंग्रजांचे भू-राजस्व आणि जमीनधारणा व्यवस्थेतील बदल. सुरुवातीची कायमधारा पद्धत व नंतरची रयतवाडी व

पान १५ वर




**नरेंद्र मोदीचे खास व भाजपचे अध्यक्ष असलेल्या अमित शाह विरोधातील एका खटल्यातील सीबीआय विशेष न्यायालयाचे न्यायाधीश बी.एच.लोहीयांचा १ डिसेंबर २०१४ रोजी संशयास्पद मृत्यू झाला होता. या आकस्मिक मृत्यूवर त्यांच्या कुटूबीयांनी संशय व्यक्त केला होता. त्यांच्या बहीणीने सुद्धा सांगितले होते की या खटल्याचा निकाल अमित शाह च्या बाजूने देण्यासाठी त्यांच्या भावाला १०० कोटी रुपयांची लाच सादर केली होती, जी त्यांनी नाकारली त्यानंतर त्याचा खून करण्यात आला. नुकतेच त्यांच्या मुलावर दबाव टाकून एक पत्रकार परिषद घेण्यात आली. ज्यात तो म्हणाला की आता त्यांना याबाबत काहीएक शंका नाही. विशेष म्हणजे याच मुलाने पुर्वी न्यायाधीश लोयांच्या मृत्यूची चौकशी करण्याबाबतची मागणी केली होती. फिल्मी स्टाईलमध्ये झालेल्या या पत्रकार परीषदेतून कळालेच होते की ती कुणाच्या दबावाखाली घेतली होती. हे कार्टून त्या वेळी रेखाटले होते.**

• संपादक मंडळ – सोमनाथ केंजळे, सत्यनारायण • संपादकीय कार्यालय- रूम नंबर १०४, हीरानंदानी बिल्डिंग, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई ४०००४३
मो. नं. ९१५६३२३९७६, ९६१९०३९७९३ • संकल्प प्रिंटर्स, जी-१, द्रोणगिरी कॉ. ऑ. सोसायटी, साईनाथ नगर, ठाणे फोन न. ०९०२९९१६५०५ कडून मुद्रित